


सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ८९ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


# शहरी नक्षलवादी संविधान समजू शकत नाही

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चढवला राहुल गांधींवर हल्ला

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

काही नेते शहरी नक्षलवादाची भाषा बोलतात, भारतीय संघराज्याविरुद्ध लढायची घोषणा करणारे संविधानातील भावना समजू शकत नाही. देशाची एकता आणि अखंडता काय असते, हेही समजू शकत नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज नाव न घेता लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर घणाघाती हल्ला चढवला. विकसित भारताच्या निर्मितीसाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे ग्वाही त्यांनी यावेळी दिली.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर लोकसभेत झालेल्या दोन दिवसांच्या चर्चेला उत्तर देताना मोदी यांनी गांधी घराणे, काँग्रेस तसेच आप नेते अरविंद केजरीवाल यांच्यावर जोरदार हल्ला चढवत, त्यांना आरसा दाखवला. संविधान आमच्यासाठी सर्वोपरी आहे. आम्ही विषाचे राजकारण करीत नाही, तर स्टॅच्यू ऑफ युनिटी बनवतो. संविधानात ज्या तरतुदी आहेत, ती एक भावना आहे. संविधानाला मजूबत करण्यासाठी संविधानाची भावना जगावी लागते. आम्ही ते लोक आहोत, जे संविधानाची भावना जगत असतात, असे मोदी यांनी ठामपणे सांगितले.

आमच्या कार्यकाळात देशात कुठेच घोटाळे झाले नाहीत. त्यामुळे देशाचे कोट्यवधी रुपये वाचले. या पैशाचा उपयोग आम्ही जनतेच्या सेवेसाठी केला. आम्ही वाचवलेल्या या लाखो कोटी रुपयांचा उपयोग शिशमहल बांधण्यासाठी नाही, तर देशाच्या विकासाठी केला. देशातील पायाभूत सुविधांसाठी दहा वर्षांपूर्वी १ लाख ८□० हजार कोटी रुपये ख़र्च होत होते, आज ही राशी ११ लाख कोटी रुपयांवर गेली आहे. यातून रस्ते, हायवे, रेल्वे यांच्या उभारणीतून विकासाचा पाया घातला गेला, असे ते म्हणाले.

मोदी यांनी आपल्या जवळपास १०० मिनिटांच्या भाषणातून सरकारच्या सर्व कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला तसेच विरोधी पक्षांच्या नेत्यांवर नाव न घेता हल्ला चढवला. मोदींचा यांचा कटाक्ष राजीव गांधी, सोनिया गांधी आणि राहुल गांधी तसेच आपचे अरविंद केजरीवाल यांच्यावर प्रामुख्याने होता. ◂(तभा वृत्तसेवा)

### तापात लोक असेच बरळतात...

मोदी यांच्या भाषणादरम्यान विरोधी पक्षांचे सदस्य अडथळा आणत होते. बसून टिप्पणी करीत होते, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला त्यांना मर्यादित वागण्याचे, सभागृहाची प्रतिष्ठा जपण्याचे वारंवार निर्देश देत होते, पण विरोधी पक्षांचे सदस्य त्याकडे दुर्लक्ष करीत होते. याचा संदर्भ देत मोदी म्हणाले की, जेव्हा माणसाला खूप ताप असतो, तेव्हा तो असेच काहीही बोलतात, बरळत असतात. निराशेत असतानाही माणसाचे असेच होते.

## राज्यसभा तालिकाध्यक्षपदी खा. सुनेत्रा पवार

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुनेत्रा पवार यांची राज्यसभेच्या तालिका अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पहिल्याच टर्ममध्ये त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी देण्यात आली. त्यांच्यासह आठ खासदारांची तालिका अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

**या आठ खासदारांची नियुक्ती**

सुनेत्रा पवार यांच्यासह तृणमूल काँग्रेसच्या खासदार सुश्मिता देव, भाजपाचे किरण चौधरी आणि संगीता यादव या चार महिला खासदार तसेच भाजपा खासदार घनश्याम तिवारी, डॉ. दिनेश शर्मा, द्रमुकचे पी. विल्सन आणि आम आदमी पक्षाचे साहनी या खासदारांची तालिकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाकुंभमेळ्यात

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारी महाकुंभमेळ्यात सहभागी होणार आहेत. ते उत्तरप्रदेशच्या प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभमेळ्यात जाऊन साधुसंतांचे आशीर्वाद घेऊन पवित्र नदीत स्नान करणार आहेत. महाकुंभात आतापर्यंत १३ जानेवारी रोजी पौष पौर्णिमेनिमित्त तसेच १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांतीनिमित्त, २९ जानेवारी रोजी मौनी अमावहस्येनिमित्त आणि ३ फेब्रुवारी रोजी वसंत पंचमीनिमित्त पवित्र स्नान झाले. आता १२ फेब्रुवारी रोजी माघ पौर्णिमा आणि २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त पवित्र स्नान होणार आहे. देशातील अनेक नेत्यांनीही महाकुंभात पवित्र स्नान केले आहे, यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भूतानचे राजे अशा अनेक दिग्गजांचा समावेश आहे.

### प्रवीण दराडे मंत्रालयात सहकार खात्याचे सचिव

**मुंबई** : राज्यातील १३ वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा आदेश जारी करण्यात आला आहे. प्रवीण दराडे यांची बदली सहकार आणि वस्त्रोद्योग खात्याच्या प्रधान सचिवपदी करण्यात आली, तर डॉ. प्रशांत नारनवरे यांची राज्यपालांच्या सचिवपदी बदली झाली. सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डिले यांची महिनाभरात तिसऱ्यांदा बदली करण्यात आली. राहुल कर्डिले यांची आता नांदेड जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली आहे. पंकज कुमार यांची सचिव आणि विशेष चौकशी अधिकारी (२), सामान्य प्रशासन मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. बदली झालेल्या अन्य अधिकाऱ्यांध्ये नितीन पाटील, श्वेता सिंघल, अनिल भंडारी, पी. के. डांगे, एस. राममूर्ती, अभिजित राऊत, मिलिंदकुमार साळवे, माधवी सरदेशमुख आणि अमित रंजन यांचा समावेश आहे.



### दोन बांगलादेशी घुसखोरांना अटक

**गुवाहाटी** : बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश करणाऱ्या दोन बांगलादेशी नागरिकांना आसाम पोलिसांनी श्रीभूमि जिल्ह्यात पकडले आणि शेजारील देशाच्या अधिकाऱ्यांना सोपवले, असे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सरमा यांनी सांगितले. कोणत्याही घुसखोराला राज्यात येऊ दिले जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. मुहिदा बीबी आणि मुहम्मद कौसर अशी त्यांची नावे आहेत.

**चीनचा अमेरिकेवर पलटवार**

## व्यापारयुद्ध भडकले

### कोळसा, एलएनजीसह अनेक वस्तूंवर आयातशुल्क

#### गुगलची करणार चौकशी

◆ **बीजिंग, ४ फेब्रुवारी**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनमधून आयात होणाऱ्या वस्तूंवर १० टक्क्यांपर्यंत आयातशुल्क लावण्याची घोषणा केल्यानंतर अवघ्या काही तासांतच चीनने सुद्धा जशास तसे प्रत्युत्तर देत अमेरिकेतून आयात करण्यात येणाऱ्या विविध वस्तूंवर १० ते १५ टक्के आयातशुल्क लागणार असल्याची घोषणा केली. याशिवाय गुगलची चौकशी करण्यासह इतर व्यापार संबंधित उपाययोजना केल्या जाणार असल्याचे चीनने स्पष्ट केल्याने व्यापारयुद्ध आणखी भडकण्याची शक्यता आहे.

चीनच्या वाणिज्य व व्यापार मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, अमेरिकेकडून करण्यात आलेली एकतर्फी करवाढ जागतिक व्यापार संघटनेच्या नियमांचे गंभीर उल्लंघन आहे, चीन आणि अमेरिकेच्या आर्थिक, व्यापारी हितसंबंधाला हानी पोहोचविणारे आहे. देशाचे व्यापारी हित लक्षात घेता अमेरिकेतून आयात होणारा कोळसा, द्रवरूप नैसर्गिक वायू अर्थात् एलएनजी यावर १५ टक्के अधिक कर लावण्यात येणार आहे. याशिवाय कच्चे तेल, कृषी उपकरणे, बड्या कार, पिकअप ट्रक यावर १० टक्के अधिक आयातशुल्क लावण्यात येणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

#### डब्ल्यूटीओमध्ये दाखल करणार याचिका

अमेरिकेने लावलेल्या आयात शुल्काविरोधात जागतिक व्यापार संघटना अर्थात् डब्लूटीओमध्ये याचिका दाखल करणाल असल्याचे चीनच्या वाणिज्य व व्यापार मंत्रालयाने म्हटले आहे. दरम्यान अमेरिकेने मॅक्सिको आणि कॅनडा यांच्यावरील २५ टक्के आयात शुल्क लावण्याचा निर्णय पुढील ३० दिवसांसाठी स्थगित केला. मात्र, चीनमधून आयात करण्यात येणाऱ्या वस्तूंवर मंगळवारपासूनच १० टक्के कर लावण्यास सुरुवात होणार आहे. यामुळे चिनी वस्तूंच्या किमती अमेरिकेत महागणार आहे.

## दिल्ली विधानसभेसाठी आज मतदान

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

७० सदस्यीय दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी मतदान होत आहे. निवडणूक आयोगाने यासाठी जय्यत तयारी केली आहे. निवडणूक शांततेत पार पडावी म्हणून कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. मतमोजणी शनिवारी होणार आहे.

७० जागांसाठी ६९९ उमेदवार रिंगणात आहेत. १ कोटी ५५ लाखांवर मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान सुरळीत पार पडावे म्हणून ४२ हजार सुरक्षा जवान तैनात करण्यात आले आहेत.

आप, काँग्रेस आणि बसपा सर्व ७० जागा स्वबळावर लढवत आहे. भाजपा ६८ जागा लढवत असून, दोन जागा भाजपाने जदयू आणि लोजपा या मित्रपक्षांसाठी सोडल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसनेही ३० उमेदवार उभे केले असून, असदुद्दिन ओवैसी यांचा एमआयएम १२ जागा लढवत आहे.



ईव्हीएम व अन्य सामग्री मतदान केंद्रांवर नेताना निवडणूक अधिकारी

आपला सलग चौथ्यांदा सरकार स्थापन करता येईल का, भाजपाचा २७ वर्षांचा राजकीय वनवास संपेल का तसेच १२ वर्षांनंतर काँग्रेसला सत्तेवर येण्याची पुन्हा संधी मिळेल का, याची उत्तर मतदानातून मिळणार आहे. माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, मुख्यमंत्री आतिशी, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, भाजपाचे प्रवेश वर्मा, रमेश विधुणी आणि काँग्रेसचे संदीप दीक्षित यांच्यासह अनेकांचे भाग्य उद्याच्या मतदानाने ईव्हीएममध्ये बंद होणार आहे.

१९९३ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत दिल्लीत भाजपाला बहुमत मिळाले होते. त्यानंतर १९९८, २००३ आणि २००८ अशा सलग तीन विधानसभा निवडणुकीत काँग्रेस जिंकली. २०१३ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला सर्वांत जास्त जागा मिळाल्या, पण आपने काँग्रेसच्या मदतीने सरकार स्थापन केले. २०१५ आणि २०२० च्या विधानसभा निवडणुकीत आपला स्पष्ट आणि निर्विवाद बहुमत मिळाले. ◂(तभा वृत्तसेवा)

## आता पुरस्कार वापसी होणार अशक्य

### संसदीय समितीने केली शिफारस

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

देशातील एखाद्या राजकीय मुद्यावर किंवा धोरणावर आपली नाराजी किंवा निषेध व्यक्त करण्यासाठी अनेक मान्यवर, साहित्यिक, कलाकार किंवा विविध क्षेत्रातील पुरस्कारप्राप्त दिग्गज पुरस्कार परत करण्याची भूमिका घेताना दिसतात. अशा परिस्थितीत त्या पुरस्काराचा मान राखला जात नाही, असे म्हणत मिळालेले पुरस्कार परत करणार नाही, हे आधीच संबंधितांकडून लिहून घ्या, अशी शिफारस संसदीय समितीने केली आहे. त्यामुळे निषेध करण्याचा हा मार्ग मान्यवरांसाठी बंद होणार आहे.

जदयूचे संजय झा यांच्या अध्यक्षतेखालील वाहतूक, पर्यटन व संस्कृती विषयावरील समितीकडून ही शिफारस करण्यात आली. सदर मान्यवर निषेध म्हणून त्यांचे पुरस्कार परत करतात, पण ज्या अकादमींकडून त्यांना हे पुरस्कार देण्यात आले असतात, त्यांच्याशी मात्र संलग्न राहतात किंवा त्या अकादमींसाठी काम करीत राहतात. त्यामुळे त्यांच्याकडून पुरस्कार परत देणार नाही, असे आधीच लिहून घ्यावे, अशी शिफारस या समितीने केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### धोनीची कंपनी विदेशात विकणार ईव्ही सायकली

**नवी दिल्ली** : क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीने इलेक्ट्रिक सायकल बनवणाऱ्या कंपनीत गुंतवणूक केली आहे. ई-मोटरॅड असे या कंपनीचे नाव असून, ही कंपनी युरोपमध्ये २००० पेक्षा जास्त ई-बाईक विकण्याच्या तयारीत आहे. धोनीने यात केवळ गुंतवणूकच केलेली नाही, तर तो याचा ब्रॅण्ड ॲम्बेसेडरही आहे.

# साहेब...आईचे डोळे झाकेपर्यंत १० हजार महिलांना काम द्यायचंय बघा!

## ● 'ध्येयवेड्या' उद्योजकाने कलेक्टरांसमोर व्यक्त केल्या भावना

**तभा वृत्तसेवा | अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. 0४ जानेवारी-**

मंगळवार, दि. ३ जानेवारी...सायंकाळी ५ चा सुमार... जिल्हाधिकारी कार्यालयात बीट रिपोर्टिंगसाठी गेला होतो...एक ध्येयवेडा उद्योजक भेटला...त्याच्यासोबत ५-६ बायका होत्या... जिल्हाधिकाऱ्यांची त्यांची भेट झाली...चाणाक्ष जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्याच्या धडपडी स्वभावाला हेरले अन् अनेक व्हिजीटर वेटींगवर ठेवून...आपला काही अमुल्य वेळही त्याच्यासाठी दिला...जिल्हाधिकाऱ्यांना भेटताच तो म्हणाला...मी एक पापड उद्योजक...सध्या सोलापूर शहर-जिल्ह्यातील ४ हजार ९00 महिलांच्या हाताला रोज काम देतो....अन् माझ्या वृध्द आईचे डोळे झाकेपर्यंत (जिवंत आहे तोवर तिच्या डोळ्यासम ोर) अजून ५ हजार १00 महिलांना काम द्यायचे आहे.... म्हणजेच मी १0 हजार महिलांना काम देणार आहे...फक्त मला उद्योगवाढीसाठी आपल्याकडून थोडी जागा हवी आहे...!

गुडSS, व्हेरी गुडSS म्हणत जिल्हाधिकारी साहेबांनी त्यास समोर बसवून त्याच्या भावना ऐकून घेतल्या आणि त्याची पापड उद्योगातील तळमळ पाहून या उद्योजकाला सहकार्य करण्याची ग्वाहीही दिली. २0१३ साली अवघ्या ४ महिलांना घेवून सुरु केलेल्या या पापड व्यवसायाचा आता वटवृक्ष झाला असून, सध्या ४ हजार ९00 महिला माझ्याकडे काम करतात...आणि आजपर्यंत कोणाचीही मदत न घेता मी हा व्यवसाय नेटाने टिकवून ठेवल्याचे सांगितल्यावर त्या उद्योजकांस जिल्हाधिकाऱ्यांनी शाब्बासकीही दिली. दरम्यान, काही वेळाने तो उद्योजक जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आला अन् त्याच्याशी मी विस्ताराने संवाद साधला.

वयाची पन्नासी ओलांडलेल्या त्या उद्योजकाचे नाव राजेश लक्ष्मण डोंगरे...सोलापूरच्या जुन्या लक्ष्मी विष्णू चाळीत वास्तव्य...अल्पशिक्षित पण अत्यंत हुशार उद्योजक...राजेश लहान असताना त्यांच्या आईंनी एका पापड उद्योजकांकडे अवघ्या ४ रूपये रोजगारावर काम केलेले...राजेशही आईसोबत या व्यवसायाला जोडला गेला. राजेश यांना गरिबीमुळे तसा शिक्षणात गंधही नव्हता. यामुळे शिक्षणाचा नाद सोडून २0१३ साली राजेश यांनी आयडिया लढवून गल्लीतील अवघ्या ४ म हिलांना घेवून पापड व्यवसायाचा श्रीगणेशा केला. सुरूवातीला अनेक लोक हसलेही मात्र आईंनी त्यांना खंबीर साथ दिली. बघताSS बघता राजेशकडे कष्टाळू व गरीब महिला पापड व्यवसाय करण्यासाठी वाढू लागल्या आणि बघता बघता २0२५ सालापर्यंत ४ हजार ९00 पर्यंत महिला त्यांच्या या पापड व्यवसायात काम करू लागल्या. हे त्यांचे कार्य कौतुकास्पदच आहे. कारण शहर व जिल्ह्यातील गरीब, गरजू महिलांच्या हाताला काम मिळाले. यामुळे राजेशने महालक्ष्मी महिला पापड उद्योगाचे अधिकृत लायसन्स घेवून या उद्योगात भरारी घेतली आणि सध्या त्यांचा पापड जगभरात जात आहे. पापड एक्सपोर्ट होत असल्याने शुन्यातून राजेशभाऊ कोट्याधीश बनत आहेत. सध्या शहराच्या काही भागात आणि ग्रामीण भागातही त्यांनी पापडची युनीट टाकली आहेत. यातून हजारो महिलांच्या हाताला रोज काम मिळू लागले आहे. हा व्यवसाय टिकविण्यासाठी पहाटे ४ ते सायंकाळी ९ वाजेपर्यंत त्यांना कामगारांसोबत काम करावे लागत असल्याचेही त्यांनी शेवटी आवर्जुन सांगितले.




### आज पहिल्यांदाच मागतोय शासनाकडे मदत!

पापड व्यवसायातील एका तपानंतर म्हणजेच १२ वर्षानंतर राजेश डोंगरे यांची एकच अपेक्षा आहे की, आपली आई जिवंत आहे तोवर तिच्यासमोर १0 हजार महिलांना काम द्यायचे आहे...या महिलांना काम देण्यासाठी त्यांना जागा अपुरी पडू लागल्याने आज पहिलांदाच १२ वर्षात शासकीय यंत्रणेकडे त्यांनी मदत मागितली असल्याची कबुलीही दिली. आता जिल्हाधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जिल्ह्यातील बचत गटांना काम मिळेल

राजेश यांची पापड उद्योगातील ही कहाणी ऐकल्यानंतर आणि त्यांनी त्यांच्या पापड व्यवसायात अजून ५ हजार महिलांची गरज असल्याची माहिती दिल्यावर जिल्ह्यातील बचत गटांच्या महिलांच्या हाताला या व्यवसायातून काम मिळेल, असे वाटते. यासाठी मी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्याशी लवकरच संवाद साधून महिला बचत गटांना या पापड उद्योगातून काम देता येईल का ते पाहतो.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर**




सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त



### सांगोला महाविद्यालयाचे श्रमसंस्कार शिबीर उत्साहात

**सांगोला, दि.४ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर, सांगोला महाविद्यालय व ग्रामपंचायत मेडशिंगी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर मेडशिंगी, ता.सांगोला येथे दि.२५ ते ३१ जानेवारी या कालावधीत संपन्न झाले. याशिबिरा मध्ये विद्यार्थ्यांनी श्रमदानांतर्गत ग्रामस्वच्छता तसेच अप्रूपा नदीवर पूल व रस्ता तयार करण्याचे काम केले. सदर शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी सांगोला नगरपालिकेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी विद्यार्थ्यांनी सात दिवसात केलेल्या कामाची पाहणी करून कौतुक केले. या प्रसंगी ॲड.गजानन भाकरे यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबन व देशप्रेम या विषयी मार्गदर्शन केले. जगनाथ भगत, सरपंच उमा इंगवले, डॉ.अर्जुन मासाळ, प्रतापसिंह इंगवले, प्रभाकर कसबे व विद्यार्थी यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.उदयबापू घोंगडे यांनी जीवना मध्ये यशस्वी होण्यासाठी श्रम साधनेचे महत्व पटवून दिले. यावेळी रामलिंग झाडबुके, सुनील शिंदे, डॉ.दत्तात्रय साळुंखे, मधुकर बनसोडे, नितीन इंगोले उपस्थित होते. सदर शिबिर प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, डॉ.राम पवार यांचे मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी डॉ. नवनाथ शिंदे, डॉ.सदाशिव देवकर, महादेव काशीद यांनी संयोजन केले. सूत्रसंचालन प्रा.विकास उबाळे यांनी केले.



### शिवसेना पक्षाचे महाराष्ट्र सचिव संजय मोरे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि.४ जानेवारी-**


शिवसेना पक्षाचे सचिव संजय मोरे यांचा अक्कलकोट तालुका कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे यांच्या हस्ते स्वामी समर्थांची प्रतिमा पुष्पगुच्छ शाल देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा कामगार सेना जिल्हाध्यक्ष सायब्बण्णा तेगेळ्ळी, अक्कलकोट कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, अक्कलकोट शिवसेना शहर महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई हावनूर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### श्री अंबिकादेवी यात्रेनिमित्त आज जंगी कुस्त्यांचे मैदान

**सांगोला, दि.४ जानेवारी-**

सांगोला शहर आणि तालुक्याचे ग्रामदैवत असलेल्या श्री अंबिकादेवी यात्रा निमित्त आज बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी जंगी कुस्ती मैदानाचे आयोजन केले असल्याची माहिती कोर्ट रिसिव्हर, सांगोला यांनी दिली. बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी दु.४ वा. पासून या जंगी कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे. या कुस्ती मैदानासाठी राज्यभरातून आणि सोलापूर जिल्ह्यातून नामांकित मल्ल सहभागी होणार आहेत. तरी सांगोला शहर आणि तालुक्यातील कुस्ती शौकिनांनी कुस्त्यांचे मैदान अनुभवण्यासाठी क्रीडा संकुल मैदान, सांगोला येथे उपस्थित राहावे असे आवाहन श्री अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती तथा कोर्ट रिसिव्हर, सांगोला यांनी केले आहे.




### गादेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची सांगता

**पंढरपूर, दि.४ फेब्रुवारी-**

श्री पांडुरंग शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, उमा महाविद्यालय पंढरपूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष श्रमसंस्कार शिबिराचा सांगता समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड हे होते. या कार्यक्रमांमध्ये गावकऱ्यांच्या वतीने अरुण मोलाणे व रणजीत बागल यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास गादेगावच्या सरपंच सीमा बागल, उपसरपंच श्रीमती अलका कोळी, विष्णू रेडे, पद्माकर बागल, भीमराव फाटे, रवींद्र बागल, विष्णू बागल, ग्रामविकास अधिकारी जयंत खंडागळे इत्यादी मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक एस. डी. खिलारे यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.व्ही. एन. कावरे यांनी केले व आभार प्रा. संजय कारंडे यांनी मांनले. या कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एन. एस लोखंडे , प्रा. डॉ. आनंद ढवन, प्रा. समाधान भगरे, प्रा. सुवर्णा हजारे, प्रा.एस. के. शिंदे, प्रा. रेणुका देवडीकर शिक्षकेतर कर्मचारी तुकाराम लोखंडे व शंकर रोंगे तसेच स्वयंसेवक विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बी. एफ. दमाणी अन् स्नेहसाधना योग वर्गाची बाजी

**● 'शिवस्मारक' च्या सांघिक स्पर्धेत रथसप्तमीच्या मुहूर्तावर विद्यार्थ्यांचे लयबद्ध सूर्यनमस्कार : तबल १५ शाळांचा सहभाग**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे आयोजित सांघिक सूर्यनमस्कार स्पर्धेत बी. एफ. दमाणी प्राथमिक विद्यामंदिर आणि स्नेहसाधना योग वर्ग या संघांनी विविध गटातून प्रथम क्रमांक मिळवला. मंगळवारी रथसप्तमीच्या मुहूर्तावर शिंदे चौक येथील शिवस्मारकच्या पटांगणात या स्पर्धा उत्साहात झाल्या.



या स्पर्धेचे उद्घाटन शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून झाले. याप्रसंगी शिवस्मारकचे कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, सचिव गंगाधर गवसने, संचालिका माधवी कुलकर्णी, संचालक वरदराज बंग, व्यवस्थापक मल्लिनाथ होटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. सूर्यनमस्काराच्या विविध मंत्रांच्या ध्वनिफितीसोबत १५ शाळांच्या तसेच खुल्या गटातील सहा संघातील एकूण ५३६ विद्यार्थी - विद्यार्थिनींनी सांघिक सूर्यनमस्काराचे सादरीकरण केले. विजेत्या संघांना योगगुरु स्नेहल पेंडसे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास ५ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह, द्वितीय विजेत्या संघास ३ हजार रुपये व सन्मानचिन्ह, तृतीय विजेत्या संघास २ हजार रुपये व सन्मानचिन्ह देण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि जगद्गुरु संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचे वंशज ह.भ. प. शिरीष महाराज मोरे लिखित 'शिवराज्याभिषेक' हे पुस्तक देण्यात आले. शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने यांनी सूत्रसंचालन तर कोषाध्यक्ष धनंजय कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

**या स्पर्धेचा निकाल :** शालेय गट : प्रथम : बी. एफ. दमाणी प्राथमिक विद्यामंदिर, द्वितीय कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळा, तृतीय (विभागून) : सनराइज पब्लिक स्कूल बी.बी. दारफळ, रामदास नरसय्या इप्पाकाल प्राथमिक शाळा. खुला गट : प्रथम : स्नेहसाधना योग वर्ग, द्वितीय : अवंती शिक्षण संस्था, तृतीय : समर्थ स्पोर्ट्स अकॅडमी.

# नोकरीपेक्षा उद्योजक बनण्याकडे लक्ष केंद्रित करा!

**सोलापूर विद्यापीठातील राज्यस्तरीय कार्यशाळेत उद्योजक राम रेड्डी यांचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ जानेवारी-**

विद्यार्थ्यांनी एखाद्या कल्पना व प्रकल्पांना घेऊन पुढे जावे, त्यावर काम करावे. दुसऱ्यांच्या हाताखाली काम करण्यापेक्षा छोटे-मोठे उद्योग, व्यवसाय उभा करून उद्योजक बनण्याकडे विद्यार्थ्यांनी लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन बालाजी अमाईन्सचे कार्यकारी संचालक डी. राम रेड्डी यांनी केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामार्फत पीएम उषा योजनेअंतर्गत 'उद्योजकता जोपासणे' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेचे उद्घाटन राम रेड्डी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, स्पेनका वॉटरचे सुहास आदमाने, विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाचे प्रभारी संचालक डॉ. आर. एस. मेंते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

उद्योजक राम रेड्डी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी रेडीमेड जॉबच्या मागे न लागता स्वतः उद्योजक होण्यासाठी विद्यार्थी दशेपासूनच काम करावे. कष्ट, संयम, जिद्द व संघर्षाच्या बळावर उद्योग, व्यवसायात निश्चित यश प्राप्त होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी एखाद्या उद्योगाचे व्यवस्थितरित्या अभ्यास करून उद्योग सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे. त्याचबरोबर कुटुंबाचीही मदत विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. प्र-कुलगुरू प्रा. लक्ष्मीकांत दामा मार्गदर्शन केले.

# सोहाळे अन् येणकी ग्रामस्थांचे वहिवाट रस्त्यासाठी आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

मोहोळ तालुक्यातील कुरुल- ते सोहाळे पाटी, येणकी यारस्त्यावरील अतिक्रमण काढण्याच्या मागणीसाठी सोहाळे आणि येणकीच्या ग्राम स्थानी संयुक्तपणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.



कुरूल ते सोहाळेपाटी आणि सोहाळेपाटी ते येणकी या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केल्याने रस्ता गायब झाला आहे. या वाढलेल्या अतिक्रमणामुळे शेतकरी आणि ग्रामस्थांना नाहक त्रास होत आहे. वारंवार तक्रारी करून सुद्धा संबंधित विभागाचे अधिकारी याकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे वहिवाट रस्त्याच्या मागणीसाठी सोहाळे आणि येणकीच्या ग्रामस्थांनी हे अतिक्रमण हटविण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. या आंदोलनात सोहाळे ग्रामपंचायतीचे सदस्य बाळासाहेब नाईकनवरे, मारुती गुंड, गणेश दूबे, चंद्रकांत नाईकनवरे, अमर जगताप, ज्ञानेश्वर पवार सहभागी झाले आहेत.




# प्राणी क्लेष प्रतिबंधक कायद्याची जिल्ह्यात अंमलबजावणी करा

**उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा २०१५ प्राणी क्लेष कायदा १९६० वाहतूक नियम मधील तरतुदीचे पालन करणे गरजेचे असून, प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध आहे. बैलगाडीतून साखर कारखान्याकडे ऊस वाहतूक करताना बैलांवर होणाऱ्या क्रुरतेस प्रतिबंध आहे. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणेने जिल्ह्यात प्राणी क्लेश कायद्याच्या नियमांची अंमलबजावणी करून सुव्यवस्था राखण्याच्या सुचना उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठकीत दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे जिल्हा प्राणी क्लेष प्रतिबंधक समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा वन अधिकारी कार्यालयाचे गोवर्धन चोपडे, महानगरपालिकेचे डॉ. सतिश चौगुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विजय पाटील, उपशिक्षणाधिकारी स्वाती हवेले, पोलीस निरिक्षक नामदेव शिंदे, पोलीस निरिक्षक बाळासाहेब भरणे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, डॉ.विशाल येवले, प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर विभागाचे आर. एस. राठोड, इंदेश्वर शुगर बार्शीचे व्यवस्थापकीय संचालक ए.एस. जाधव उपस्थित होते. प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या मसुदा आणि पॅक १९६५ च्या नियम ६ नुसार जनावरांना दिवसभरातून नऊ तासाहून अधिक काळ वाहतूक करु देऊ नये तसेच तापमान ३७ अंश सेल्सियस पेक्षा जास्त असेल अश्या ठिकाणी दुपारी १२.०० ते ३.०० वेळेमध्ये विश्रांती देण्यात यावी, अशा सुचनाही बैठकीत दिल्या. प्राण्यांना कुरतेने वागविण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९६० या कायद्यांतर्गत प्राण्यांची पायी वाहतूक नियम २००१च्या नियम १२नुसार सुर्योदयापूर्वी किंवा सुर्यास्तानंतर कोणत्याही व्यक्तीने जनावरांची पायी ने-आण करु नये तसेच जनावरे (बैल) ३० किमी किंवा ८ तास व खाण्यापिण्यासाठी चार किलोमीटर प्रति दोन तास यापलीकडे प्राण्याची पायी ने-आण करता येणार नाही, असे अधिसूचित केले आहे. तसेच बैलगाडा शर्यतीचे आयोजन करताना परवानगी घेऊन करावी विना परवानगी शर्यतीचे आयोजन करु नये असे आवाहनही उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी केले आहे.

# वळसंग हद्दीत विनापरवाना सुरु असलेला डांबर, खडी प्लँट बंद करण्याची मागणी

**दक्षिण तहसीलदारांना दिले निवेदन**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ०४ जानेवारी-**

मागील दीड ते दोन वर्षापासून वळसंग हद्दीत गट नंबर ३६ या ठिकाणी वळसंग वाडा हॉटेलला लागून प्रगती इन्फ्रा नावाने विना परवाना अवैद्यरित्या डांबर, खडी प्लॅन्ट सुरु आहे. त्यामुळे त्या परिसरातील एक ते दीड किलोमीटरपर्यंत धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. हा प्लॅन्ट पुणे येथील उद्योजकाचा असून, याची चौकशी करून विना परवाना सुरू असलेला हा प्लॅन्ट बंद करावा, अशी मागणी दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमूद केले आहे की, आम्ही सर्वजण दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथील कायमचे रहिवाशी आहोत. आमची वळसंग हद्दीत वडिलोपार्जित शेतजमीन आहे. शेती हेच आमचे उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन आहे. मात्र मागील दीड ते दोन वर्षापासून वळसंग हद्दीत गट नंबर ३६ या ठिकाणी वळसंग वाडा हॉटेलला लागून प्रगती इन्फ्रा नावाने विना परवाना अवैद्यरित्या डांबर, खडी प्लॅन्ट सुरु आहे. त्याच्या धुळीचा आम्हाला प्रचंड त्रास होत आहे. कालबाह्य झालेली यंत्रणा या प्लॅन्टवर वापरली जात असून, यामुळे मोठ्या प्रमाणात धूळ निर्माण होवून आजूबाजूला असलेल्या आमच्या शेती पिकाचे नुकसान होत आहे.

पिकांवर मोठ्या प्रमाणात धूळ पडत असल्याने शेतात कोणतेच पीक घेता येत नाही. दुष्काळी परिसर असलेल्या वळसंग परिसरात कधी नव्हे ते यावर्षी उजनीचे पाणी दाखल झाले आहे. त्यामुळे पावसावर आधारित शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आता कुठे दिलासा मिळालेला असताना या बेकायदा डांबर, खडी प्लॅन्ट च्या धुळीने शेतकरी उद्ध्वस्त होत आहे.अक्कलकोटला जाणाऱ्या-येणाऱ्या भाविकांकडून मिळणाऱ्या चार पैशांवर काही कुटुंब जगत आहेत. वळसंग आणि परिसरातील जवळपास ५० ते ६० कुटुंबाला वळसंग वाडा या हॉटेलच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झालाय. मात्र प्रगती इन्फ्राच्या या धुळीमुळे या हॉटेल परिसरात धुळीचे साम्राज्य पसरत असल्याने हॉटेल व्यवसायही या धुळीमुळे धोक्यात आला आहे. त्यामुळे येथील शेतकरी आणि हॉटेल व्यवसायीकांचे होणारे नुकसान विचारात घेऊन या सुरु असलेला बेकायदा डांबर, खडी प्लांट बंद करण्यात यावा. अन्यथा आम्हाला या विरोधात आंदोलन करावे लागेल किंवा आत्महत्यासारखं टोकाचे पाऊल उचलावे लागेल. असाही इशारा देण्यात आला आहे.

# मराठी भाषा जागरातून सकारात्मक ऊर्जा मिळाली : उपायुक्त लोकरे

**मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

मराठी भाषेचा प्रवास उल्लेखनीय आहे. या भाषेचा वारसा हरवत नाही. प्रत्येक जण नव्याने शोधत अन् मांडत असतात. संत साहित्याचे मराठी भाषेत मोठे योगदान आहे. मराठी भाषेमध्ये प्रशासकीय लोकांनीही चांगले योगदान दिले आहे. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यातून जागर झाला आणि या जागरातून सकारात्मक ऊर्जा मिळाली. सुंदर, रचनात्मक आयुष्य जगण्यासाठी हा एक प्रयत्न होता, असे प्रतिपादन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले.



सोलापूर महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली -उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर महापालिकेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषद, जुळे सोलापूर, महाराष्ट्र साहित्य परिषद दक्षिण सोलापूर, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरिय शाखा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, महापालिका पत्रकार संघ यांच्या सहकार्याने दि. २० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप इंद्रभुवन इमारतीच्या मागील बाजूस झाला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर मसाप जुळे सोलापूर अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, कार्यवाह गिरीश दुनाखे, मसाप दक्षिण सोलापूर कार्याध्यक्ष प्रशांत बडवे , अ.भा. मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखा अध्यक्ष विजय साळुंखे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सहकुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, दैनिक संचारचे वरिष्ठ उपसंपादक प्रशांत जोशी, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान, यावेळी पंधरवड्यानिमित्त आयोजित विविध सत्रातील प्रमुख वक्ते, नाट्य व नृत्य मधील सहभागी कलाकार , आयोजक संस्था पदाधिकारी यांच्यासह मान्यवरांचा प्रशस्तीपत्रक देऊन यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वतीने पंधरवडा यशस्वीतेबद्दल उपायुक्त आशिष लोकरे यांचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवरांची समयोजित भाषणे झाली.

उपायुक्त आशिष लोकरे यांनी यावेळी मराठी भाषेचा प्रवास मांडला. मोडी भाषेचेही आता वर्ग सुरू आहेत. मराठी भाषेचा प्रवास उल्लेखनीय असाच आहे. ग्रामीण जीवनातील ओव्या, अभंग आणि भूपाळी यांची सर कशालाही येणार नाही मात्र नव्या पिढीला त्याचा विसर पडत आहे. त्याचा जागर होणे गरजेचे आहे. पंधरवडा निमित्त विविध चांगले कार्यक्रम घेता आले. गीत रामायण भरत नाट्य या कार्यक्रमाने चार चांद लावले. विविध कार्यक्रमातून सकारात्मक ऊर्जा मिळाली. महापालिका लोकांसाठी आहे. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आहे. मराठी भाषेत प्रशासकीय लोकांचेही योगदान आहे. ते भविष्यातही राहील. आपले आयुष्य मशीन सारखे झाले आहे. आयुष्यात साचलेपणा आल्याने तो झटकण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला, असेही उपायुक्त आशिष लोकरे म्हणाले.

प्रास्ताविक नाट्य परिषदेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांनी केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार यांनी केले. तर मसापचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले. यावेळी मिळकतकर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक रजाक पेंढारी, कामगार कल्याण जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, प्रा. देविदास गायकवाड, प्रा. डॉ. सारीपुत्र तुपेरे, प्रा. नानासाहेब गव्हाणे, मारुती कटकधोंड , रेणुका बुधाराम यांच्यासह साहित्यिक आणि विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी नागरिकांनी, साहित्य प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डॉ. कोटणीस स्मारकातील ॲम्पी थिएटर माफक दरात भाड्याने देणार

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या उद्घाटन प्रसंगी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारकातील छोटे म्पीथिएटर महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विविध उपक्रमासाठी देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली होती. या संदर्भात महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्याशी चर्चा केली. त्यांनी हे डॉ. कोटणीस स्मारकातील म्पीथिएटर माफक दराने भाडे स्वरूपात देण्याची तयारी दर्शवली असल्याचे उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# कृषीमंत्री असताना धनंजय मुंडेकडून १६१ कोटींचा घोटाळा

## अधिक दराने युरिया बॅग्जची खरेदी

## अंजली दमानियांचे पुराव्यानिशी आरोप

## आता राजीनामा घ्यावाच लागेल



**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि.४ फेब्रुवारी -**

गेल्या दोन महिन्यापासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांच्या अडचणीत आणखी वाढल्या आहेत. मागील सरकारमध्ये कृषिमंत्री असताना त्यांनी विविध योजनातून तब्बल१६१ कोटी ६८ लाखाचा घोटाळा केला आहे, असा खळळजनक आरोप जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. त्याबाबतचे पुरावे सादर करी त त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता मुंडे यांचा तातडीने राजीनामा घ्यावा, अशी मागणी केली.

त्यांच्या आरोपामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून महायुती सरकार आता त्याबाबत काय भूमिका घेते?, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिलेले आहे. मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या व वाल्मीक कराड यांच्या कृष्णकृत्याचा विषय लावून धरलेल्या दमानिया यांनी सोमवारी जाहीर केल्याप्रमाणे आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन मुंडे यांच्यावर पुरावे सादर करीत गंभीर आरोप केले. त्या म्हणाल्या,''एक कृषी मंत्री शेतकऱ्यांचे किती पैसे खातो हे सगळ्यांना समजले पाहिजे. सरकारने डीबीटी ही योजना काढली होती. १२ एप्रिल २०१८ रोजी शासनाने अध्यादेश काढून मुख्यमंत्र्यांना ६२ आयटम्सची लिस्ट आहे जे डीबीटी खाली येणार आहे. त्या ६२ आइटमला जोडण्याची मुभा मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. 'आपल्याकडे काही विक्रमी उत्पादन केले. त्यात १००० कोटींचा आकडा आला.१२ मार्च २०२४ शासनाने एक जीआर काढून त्याचे नियंत्रण सर्व कृषी अधिकाऱ्याकडे दिले.

वर्षभराच्या कालावधीत या व्यक्तीने अफाट पैसा खाल्ला असेल तर त्यांना मंत्रीपदावर ठेवण्याची गरज आहे का, याचा मुख्यमंत्र्यांनी गंभीर विचार करावा. तसेच भगवानगडाने मुंडेंना दिलेला पाठिंबा काढून घ्यावा, मुंडेंच्या राजीनाम्यासाठी मागणी करावी ,अशी मागणीही केली. लवकरच पुरावे घेऊन आपण भगवानगडावर जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

### ९२ रूपयाची बॉटल २२० रुपयाने खरेदी

१८४ लिटरची नॅनो युरियाची बॉटल ९२ रुपयांची आहे. पण कृषीमंत्री मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जे टेंडर काढले गेले. त्याला तब्बल २२० रुपयांना ही बॉटल विकत घेतली गेली. कृषीमंत्री यांनी १९ लाख ६८ हजार ४०८ बॉटल्स या दुपट्टीपेक्षा जास्त किंमतीने बॉटल्स विकत घेतल्या. जर ५०० रुपयांच्या बॉटलचा बाजारभाव २६९ रुपये पण ५९० रुपयांना त्याची खरेदी केली आहे. या दोन गोष्टींचा एकूण घोटाळा ८८ कोटींचा आहे.

६ लाख १८ हजार कॉटन स्टोरेज बॅग घेतल्या. आयसीएआय नावाची संघटना त्यांनी काही दिवसापूर्वी २० बॅगा ५७७ रुपयांना घेतल्या. पण मुंडेंनी टेंडरमधून १२५० रुपयांना त्या घेतल्या. ३४२ कोटीच्या टेंडरमध्ये १६० कोटी अधिक गेले असल्याचे त्यांनी सांगितले.

बॅटरी स्प्रेअर हा आधीपासून चरळवलच्या वेबसाइटवर मिळतोय आत्ताच्या घटकेला २४५० रुपयांना घेतला जातोय. पण कृषीमंत्री मुंडे यांनी ३४३६ रुपयांनी ते खरेदी केली .एक हजाराच्यावर बॅटरी स्प्रेअरवर कमवले आहेत. जवळपास २ लाख ३६४२७ बॅटरी स्प्रेअर विकत घेतले आणि त्याची किंमत ३ हजारवर आहे. जुलै २३ ते नोव्हेंबर २४ एका वर्षात या व्यक्तीने शेतकऱ्यांचा इतका अफाट पैसा खाल्ला असेल तर अशा लोकांना त्या पदावर राहण्याची त्यांचे मंत्रीपद ठेवण्याची खरेच गरज आहे का. याचा विचार मुख्यमंत्र्यांनी केला पाहिजे, असा आरोपही दमानियांनी केला आहे. एकूण १६१.६८ कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे, असे दमानियांनी यांनी सांगितले.

# आयुष्मानमुळे वैद्यकीय खर्चाचे १.२० लाख कोटी वाचले

## पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

सरकारी खर्चात बचत करीत त्याचा फायदा देशातील सर्वसामान्य लोकांना मिळेल, असा आम्ही प्रयत्न केला. आयुष्मान योजना देशात लागू झाल्यामुळे वैद्यकीय खर्चावरचे लोकांचे १ लाख २० हजार कोटी रुपये वाचले. जनऔषधी केंद्रांतून औषधी घेतल्यामुळे जनतेचे ३० हजार कोटी रुपये वाचले. प्रत्येक घरात शौचालय बांधल्यामुळे प्रती घर ७० हजार रुपयांची बचत झाली, असे मी नाही, तर युनिसेफचा अहवाल सांगतो, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावरील चर्चेला मोदी उत्तर देत होते.

या देशात ज्यांचा जन्म झाला नाही, असे १० कोटी लोक सरकारच्या कल्याणकारी योजनांचा फायदा लाटत होते. अशा लोकांना हुडकून आम्ही बाहेर केले. असे करून आम्ही सरकारचे ३ लाख कोटी रुपये वाचवले.

### 'त्याचे' उत्तर सर्वांनाच माहीत आहे

समस्या फक्त ओळखून होत नाही, तर ती सोडवण्याचा उपायही शोधावा लागतो. आमचा प्रयत्न समस्या सोडवण्याचा आहे. आपल्या देशात एक पंतप्रधान झाले, मिस्टर क्लीन म्हणून ते ओळखले जाते. दिल्लीतून एक रुपया निघतो आणि गावात १५ पैसे पोहोचतात, असे ते म्हणाले होते. तेव्हा गल्लीपासून दिल्लीपर्यंत एकाच पक्षाची सत्ता होती. त्यामुळे उरलेल्या ८५ पैशांची हातसफाई कोण करीत होते, याचे उत्तर सगळ्यांनाच माहिती होते, असा चिमटा मोदी यांनी कुणाचेही नाव न घेता काढला. सरकारी खर्चात बचत आणि बचतीतून विकास, जनतेचा पैसा जनतेसाठी हे आमचे सूत्र आहे, असे ते म्हणाले. देशाचे एक पंतप्रधान सतत २१ व्या शतकाच्या गोष्टी करायचे, पण त्यावेळी देश २० व्या शतकातील गरजाही पूर्ण करू शकत नव्हता, असा टोलाही मोदी यांनी काढला. ■

कल्याणकारी योजनांचे फायदे देशातील गरजू लोकांनाच मिळतील, अशी काळजी घेतली, असे मोदी यांनी सांगितले.

काही नेत्यांचा जोर आपल्या घरचे बाथरूम अत्याधुनिक कसे राहील, यावर असतो, पण आमचा आग्रह प्रत्येक घराला नळाचे पाणी कसे देता येईल, यावर होता. १२ कोटी घरांना आम्ही नळाचे पाणी दिले, गरिबांसाठी घर कसे बांधता येईल, याचा विचार केला. जे नेते गरिबांच्या झोपडीत फोटोसेशन करतात, त्यांना गरिबांबद्दल बोलले तर कंटाळवाणेच होणार. आमच्या सरकारने गरिबी हटावच्या घोषणा पाच-पाच दशकं दिल्या नाही, तर गरिबांची प्रामाणिकपणे सेवा केली, असे मोदी यांनी स्पष्ट केले.

◀(तभा वृत्तसेवा)

# रा. स्व. संघ जनकल्याण समितीतर्फे आरोग्यविषयक जागृती मोहीम

## रविवारी 'सेवा भवन दौड़'

**पुणे, ४ फेब्रुवारी**

'सेवा भवन' या पुण्यातील प्रकल्पातर्फे 'सेवा भवन दौड' या मूत्रपिंडाच्या स्वास्थ्याविषयी जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवा भवन दौड़'चा प्रारंभ रविवारी सकाळी सहा वाजता होईल. या उपक्रमापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीच्या आरोग्यविषयक जनजागृती मोहिम `चाही प्रारंभ होणार आहे.

समितीचे कार्यवाह प्रमोद गोऱ्हे आणि 'सेवा भवन' प्रकल्पाचे कार्यवाह पलाश देवळणकर यांनी ही माहिती दिली. या 'दौड़'चे पाच किलोमीटर आणि दहा किलोमीटर असे दोन टप्पे आहेत. या शिवाय 'चॅरिटी रन' हा उपक्रमही केला जाणार आहे. 'जनकल्याण समिती'तर्फे आरोग्यविषयक जागृती मोहीम सुरू केली जात असून,




या मोहिमेचा प्रारंभ 'सेवा भवन दौड़' या उपक्रमापासून केला जाणार आहे. या मोहिमेत प्रामुख्याने तज्ज्ञ डॉक्टरांची आरोग्यविषयक व्याख्याने, विविध विषयांवर चर्चासत्र, आरोग्य शिबिरे, जिज्ञासूंचे शंका-समाधान, महिलांसाठी संवादसत्र, योग, स्वास्थ्य, जीवनशैली याबाबतचे मार्गदर्शन आदी कार्यक्रमांचे आयोजन 'जनकल्याण समिती'तर्फे 'सेवा भवन'मध्ये केले जाणार आहे.

'सेवा भवन' या प्रकल्पात अल्प दरात डायलिसिसची सुविधा आहे. पुण्यात उपचारांसाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची निवास, भोजन आदी व्यवस्थाही अल्प शुल्कात केली जाते. या उपक्रमात १८ वर्षांवरील महिला आणि पुरुषांना सहभागी होता येणार आहे. त्यासाठी नोंदणी आवश्यक असूनण ८२७५३९६३९७ या क्रमांकावर संपर्क साधून नोंदणी करता येईल.




# मोनालिसाची क्रेझ वाढली

## फोटो असलेल्या टी-शर्टची १५०-२०० रुपयांना विक्री

महाकुंभात मणी आणि हार विकताना व्हायरल झालेल्या महेश्वरच्या मोनालिसाची क्रेझ सोशल मीडियावर वाढली आहे. मोनालिसाचा फोटो असलेले टी-शर्ट मेळ्यात चांगली विक्री होत आहेत. संगम परेड ग्राऊंडवरील त्रिवेणी मार्गावरील मीना बाजारातील एका दुकानात असे टी-शर्ट विकले जात असल्याचे दिसून आले.

इथे हे टी-शर्ट २०० रुपयांत विकले जात होते. दुकानदार गौरवने सांगितले की, यावेळी मेळ्यात मोनालिसाच्या टी-शर्टची क्रेझ आहे. मोनालिसा पाहण्यासाठी लोक येत आहेत. पूर्वी आम्ही आमच्या सेल्स काऊंटरवर असे टी-शर्ट ठेवत नव्हतो, पण मागणी वाढली तेव्हा आम्हाला मोनालिसाचा फोटो असलेले टी-शर्ट प्रिंट करावे लागले.

आता लोक तिचा फोटो असलेले टी-शर्ट घालून सेल्फी काढत इंस्टाग्रामवर ते पोस्ट करीत आहे, जे वेगाने व्हायरल होत आहे. वापरकर्ते विविध कमेंट करीत आहेत. एकाने लिहिले, 'आयुष्य असे असावे'. काहींनी लिहिले, 'कदाचित मीही हार विकायला आलो असतो'. ■

# उत्तरप्रदेशातील अर्थव्यवस्थेचा 'महाकुंभ'



महाकुंभासाठी उत्तरप्रदेश सरकारने मागील तीन वर्षांपासून तयारी सुरू केली होती. त्यानुसार २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ६२१.५ कोटी, २०२३-२४ मध्ये २,५०० कोटी, २०२४-२५ मध्ये २,५०० कोटी, तर केंद्र सरकारकडून २,१०० कोटींची विशेष तरतूद अशाप्रकारे एकूण ७७२१.५ कोटींचा निधी खास महाकुंभासाठी देण्यात आला. २०१९ मधील अर्ध कुंभमेळ्याचा अनुभव गाठीशी असताना त्यापेक्षाही उत्तम नियोजन या महाकुंभासाठी करण्यात येत आहे.

अर्ध कुंभमेळ्यात प्रयागराजमध्ये २४ कोटी भाविक आले होते आणि त्यातून १.२ लाख कोटींची उलाढाल झाली होती. त्या तुलनेत यंदा ही उलाढाल निश्चितच वाढणार आहे.

४५ दिवसांच्या या महाकुंभात ठरावीक कालावधीसाठी मोठ्या प्रमाणात होणाऱ्या आर्थिक उलाढालीमुळे एक तात्पुरती अर्थव्यवस्थाच निर्माण होते. अर्थशास्त्रीय भाषेत त्यास पॉप-अप इकॉनॉमी म्हटले जाते. एका अहवालानुसार, विविध देशांमध्ये इकॉनॉमीचा ट्रेण्ड जगभरात वाढत आहे. त्याच पद्धतीने महाकुंभासाठी दीड महिन्यांच्या कालावधीसाठी स्वतंत्र अर्थव्यवस्था उभी राहिली आहे. पंचतारांकित हॉटेल्स, टेंटसिटी, खाण्या-पिण्याचे, धार्मिक साहित्यविक्री, वाहतूक, आरोग्य तसेच अन्य सेवा-सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

**शाही स्नानाचे विशेष महत्त्व**

महाकुंभात प्रत्येक शाही स्नानाला दोन ते तीन कोटी, दररोज साधारतः ७० ते ८० लाख अशाप्रकारे दीड महिन्यांच्या कालावधीत ४० ते ५० कोटींपर्यंत भाविक येण्याची शक्यता आहे. प्रत्येक भाविकाने महाकुंभासाठी किमान पाच हजार रुपये खर्च केले, तरी एकूण भाविकांचा खर्च हा दोन ते सव्वादोन लाख कोटींपर्यंत जाईल. त्यामुळे उत्तरप्रदेश सरकारच्या तिजोरीत विविध प्रकारचे कर, भाडेपट्टी आणि इतर माध्यमातून सुमारे २५ हजार कोटींची, जीडीपीत किमान एक टक्क्याची वाढ होईल, असा अंदाज ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सने (सीएआयटी) व्यक्त केला आहे.

हिंदू धर्मीयांमधील सर्वांत मोठा धार्मिक सोहळा असलेला महाकुंभमेळा सध्या गंगा, यमुना आणि सरस्वती नदीच्या त्रिवेणी संगमावर अर्थातच प्रयागराजमध्ये सुरू आहे. भारतात प्रयागराज, उज्जैन, हरिद्वार आणि त्र्यंबकेश्वर (नाशिक) येथे दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो; परंतु यंदाचा प्रयागराजमधील महाकुंभ सर्वार्थाने वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. उत्तरप्रदेश सरकारने या भव्यदिव्य सोहळ्यासाठी केलेल्या तयारीमुळे दररोज लक्षावधी, तर शाही स्नानाच्या दिवशी दीड ते दोन कोटी भाविकांच्या गर्दीचे नियोजन केले जात आहे. मकर संक्रांतीपासून महाशिवरात्रीपर्यंत म्हणजेच ४५ दिवस चालणाऱ्या या महामेळ्यात ४० ते ४५ कोटी भाविक प्रयागराजमध्ये येतील आणि त्या माध्यमातून सुमारे दोन लाख कोटींची उलाढाल होईल, असा अंदाज आहे. ■

# भूतान नरेशांचे संगमावर स्नान

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभात मंगळवारी भूतानचे राजे जिग्मे खेसर नामग्याल वांगचुक यांनी संगमात स्नान केले. यावेळी त्याच्यासमवेत मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ होते. दोघांनी गंगेची पूजा आणि आरती केली. यानंतर वांगचुक यांनी अक्षयवटाचे दर्शन घेतले.

भूतानचे राजे वांगचूक मंगळवारी लखनौहून विमानाने बामरौली विमानतळावर पोहोचले. येथे त्यांचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी स्वागत केले. अरैल घाटावरून ते होडीने प्रयागराजमधील संगम घाटावर पोहोचले. येथील संगमात त्यांनी स्नान केले. यानंतर वांगचूक यांनी योगींसोबत पक्ष्यांना खायला दिले आणि त्यांचा फोटोही काढले. ■





**हिंदी येत नाही, पण संस्कृत श्लोक पाठ**

# एकमेव आश्रम, जिथे सर्व नऊ महामंडलेश्वर विदेशी

साई माँचा आश्रम प्रयागराज महाकुंभाच्या सेक्टर १७ मधील निर्मोही आखाड्याशी जोडलेला आहे. या आश्रमाला शक्तीधाम या नावाने ओळखले जाते. त्यांचे ४० हून अधिक देशांत भक्त आहेत. येथे नऊ महामंडलेश्वर आहेत, सर्व विदेशी आहेत. एक वगळता बाकीच्यांना हिंदी येत नाही, पण सर्वांना श्लोक चांगले पाठ आहेत. अनंत हे एकमेव महामंडलेश्वर आहेत, जे हिंदी बोलू शकतात. अनंतदास महाराज यांचा जन्म अमेरिकेत झाला. त्यापैकी काही अमेरिकेत डॉक्टर होते, तर काही जपानमध्ये शिक्षक होते. हे सर्वजण आपापल्या देशांमध्ये ब्रह्मचर्य पाळून सनातन धर्माचा प्रचार करीत आहेत.

आश्रम भव्य पद्धतीने बांधला गेला आहे. साई माँचे पोस्टर्स गेटवर आणि आजूबाजूला लावलेले आहेत. आम्ही आत पोहोचलो, तेव्हा विदेशी भाविकांचा एक गट तिथे उभा होता. काही वेळाने संपूर्ण गट गंगेत स्नान करण्यासाठी निघाला. आम्ही आत बोललो तेव्हा कळले की, सर्व महामंडलेश्वरही सोबत गेले होते. यावेळी आम्ही तिथल्या लोकांशी साई माँ आणि आश्रमाबद्दल बोललो.

साई माँ यांचे पूर्ण नाव मीराबाई सर्वानंदमयी लक्ष्मी देवी साई माँ मिश्रा आहे. मॉरिशसमध्ये जन्म. फ्रान्समध्ये वाढल्या आणि आता अमेरिकेत राहतात. विष्णू-स्वामी वंशाच्या अखिल भारतीय श्री पंच निर्मोही अणी आखाड्याशी संबंधित आहेत. २०१९ मध्ये साई माँने निर्मोही अणी आखाड्यातून ९ विदेशी शिष्यांना महामंडलेश्वर बनवले होते. त्यात तीन महिला आणि सहा पुरुष आहेत. ■

## चित्रपट वार्ता

### 'हेरा फेरी ३' चित्रपटात झळकणार तब्बू?



**मुंबई** : तब्बू 'हेरा फेरी ३' या चित्रपटातही दिसू शकते. अलिकडेच तिने स्वतः याबद्दल संकेत दिले आहे. तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली, ज्यात म्हटले आहे की, चित्रपटातील कलाकार तिच्याशिवाय अपूर्ण आहेत. खरेतर, तब्बूने तिच्या इंस्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट केली होती, ज्यात अक्षय कुमार आणि दिग्दर्शक प्रियदर्शन दिसत आहे. त्याच्या कॅप्शनमध्ये तिने लिहिले की, 'हेरा फेरी ३'मधील कास्टिंग माझ्याशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. यासोबतच तिने दिग्दर्शक प्रियदर्शन यांनाही टॅग केले. तब्बूच्या या पोस्टनंतर चाहत्यांना आशा आहे की, कदाचित 'हेरा फेरी ३' मध्ये सर्व जुन्या स्टार्सचे पुनरागमन होऊ शकते. ■

### पहिल्यांदाच पोलिसाच्या भूमिकेत अंकुश चौधरी



**मुंबई** : मराठी सिनेसृष्टीत आपल्या अभिनयाने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करणारा आणि 'स्टाईल आयकॉन' म्हणून ओळखला जाणारा लोकप्रिय अभिनेता अंकुश चौधरी त्याच्या वाढदिवसानिमित्त चाहत्यांना पहिल्यांदाच एका दमदार पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. पोस्टरमध्ये अर्जुनचा करारी आणि धाडसी लूक दिसत असून, प्रेक्षकांसाठी हा चित्रपट म्हणजे एक पर्वणी ठरणार आहे. व्हिस्ट्रोमॅक्स सिनेमा, ड्रिमविव्हर एंटरटेनमेंट निर्मित 'पीएसआय अर्जुन'चे भूषण पटेल दिग्दर्शक आहेत, तर विक्रम शंकर आणि ध्रुव दास निर्माते आहेत. यापूर्वी प्रेक्षकांनी अंकुशला रोमँटिक, ॲक्शन हिरोच्या अंदाजात पाहिले आहे. मात्र, या चित्रपटात अंकुश वेगळ्याच भूमिकेत दिसणार आहे. ■

### 'दंगल'नंतर सान्याची अवस्था बिकट



**मुंबई** : दंगल गर्ल म्हणून ओळखली जाणारी सान्या मल्होत्राला या चित्रपटामुळे खऱ्या अर्थाने ओळख मिळाली. नंतर तिने अनेक चांगल्या भूमिकाही केल्या. मात्र, प्रत्यक्षात 'दंगल'चा तिच्या वैयक्तिक जीवनावर बराच परिणार झाला होता. याविषयी एका मुलाखतीत तिने सांगितले की, 'दंगल'चे सकारात्मक परिणाम बरेच झाले. मला ओळख मिळाली, काम मिळाले. मात्र, निगेटिव्ह परिणामही झाला. माझे केस वाढत नव्हते. त्यासाठी मी बरेच उपाय केले. उलटी झोपायचे, शिवाय चंपी केली. त्यामुळे माझी स्थिती फारच बिकट झाली होती. ■

### ...म्हणून मोहन जोशींनी सोडले बॉलिवूड!



**मुंबई** : मराठीतील अनेक कलाकार हिंदीतही बरेच गाजले. तिथे भरपूर काम केले. त्यापैकी मोहन जोशी आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत त्यांनी हिंदी सिनेसृष्टीला रामराम केला. याविषयी त्यांनी सांगितले की, हिंदी सिनेसृष्टी जितकी चकचकीत दिसते तितकी नाही. अनेक कलाकारांना इंडस्ट्रीने उतारवयात वाऱ्यावर सोडले. भगवानदादांना शेवटच्या दिवसात पुरस्कार दिला, तेव्हा ते म्हणाले होते की, हाच पुरस्कार मला आधी दिला असता तर माझ्या औषधाचा खर्च निघाला असता. त्यामुळे या सिनेसृष्टीबद्दल माझ्या मनात तेढ निर्माण झाली आहे. तोचतोपणा येऊ लागला. ती माणुसकी सोडलेली लोक आहेत. उगवत्या सूर्याला नमस्कार करण्याची तेथे पद्धत आहे. त्यामुळे या इंडस्ट्रीत काम करायचे नाही, असे ठरवले. ■

## अग्रलेख...

# वाघांच्या रक्षणाचे आव्हान

*''निर्वनो वध्यते व्याघ्रो निर्व्याघ्रं छिद्यते वनम् ।*
*तस्माद्व्याघ्रो वनं रक्षेद्वनं व्याघ्रं च पालयेत् ॥''*

असा एक श्लोक आहे. त्याचा अर्थ असा की, जंगले आणि त्यातील वाघ या दोघांनाही संपवू नका. वाघांना जंगलातून बाहेर जावे लागेल, अशी परिस्थिती निर्माण करू नका. वाघांशिवाय जंगल नाही आणि जंगलाशिवाय वाघ नाही. जंगल हे वाघांचे आश्रयस्थान आहे आणि वाघ हा जंगलाचा संरक्षक आहे. हे शहाणपण आपल्याकडे कित्येक शतकांपूर्वी होते. आता वाघ केवळ पर्यटनाचा विषय उरलेला आहे. त्याचे जंगल संरक्षणासंदर्भातील महत्त्व अद्याप पुरेशा प्रमाणात आपल्या लक्षात आलेले दिसत नाही. त्यामुळेच विसाव्या शतकात वाघांच्या शिकारी वाढल्या. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी 'प्रोजेक्ट टायगर' सुरू करण्यात आला. त्याला चांगले यश मिळाले. तरीही वाघांची संख्या पूर्ववत् झालेली नाही. ती नजीकच्या भविष्यात होण्याची शक्यताही दिसत नाही. कारण जंगलांचे क्षेत्र कमी होत चाललेले आहे आणि शिकारी टोळ्यांचा उच्छाद वाढू लागला आहे. वाघांच्या शिकारीसाठी कुख्यात असलेली बहेलिया टोळी पुन्हा सक्रिय होणे आणि तिने आणखी शिकार करणे ही घटना एकूणच वन्यजीव संरक्षण यंत्रणांसाठी आव्हानात्मक ठरू लागली आहे. वाघ सर्वांना आवडतो. पर्यटकांना तो विशेषकरून आवडतो. आपले कुठलेही जंगल पर्यटन वाघाचे दर्शन घेतल्याविना पूर्ण होत नाही. हा आपला वन भ्रमणाचा आनंद कायम टिकायचा असेल तर वाघाच्या रक्षणाकडे सरकारसह आपल्या सर्वांनाही लक्ष द्यावे लागणार आहे. वाघ हे वनांच्या परिसंस्थेच्या संतुलनासाठी महत्त्वाचे आहेत. शिकारी टोळ्यांमुळे त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झालेला आहे. भारतात तीन हजारांवर वाघ आहेत आणि त्यातले अंदाजे पाचशे महाराष्ट्रात आहेत. जगभरात जेवढे वाघ आहेत, त्यातील ७० टक्के भारतात आहेत. अर्थात, जगभरातील वाघांची संख्या चार-सव्वाचार हजार असावी. म्हणजे वाघांच्या संख्येच्या बाबतीत भारत समृद्ध आहे. वाघ आहे म्हणून जंगले टिकली आहेत आणि ती टिकली म्हणून जंगल पर्यटन टिकले आहे. शंभरेक वर्षांपूर्वी लाखावर वाघ होते असे म्हणतात. त्या तुलनेत सध्या शिल्लक असलेली वाघांची संख्या नगण्य आहे. शिकारी रोखल्या नाहीत तर त्यांची संख्या आणखी रोडावेल.

वनांच्या परिसंस्थेत वाघांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. शिकारी म्हणून ते हरिण आणि रानडुक्कर यांसारख्या शाकाहारी प्राण्यांच्या संख्येचे नियमन करतात, अतिचराई रोखतात आणि जंगलांचे आरोग्य सुनिश्चित करतात. आपली जंगले कार्बन शोषून घेण्यासाठी आवश्यक आहेत. आपल्या पर्जन्यचक्राचे नियमनही त्यामुळे चांगले होते. जंगलांमुळे जैवविविधतेला आधार मिळतो. वाघांच्या संख्येत घट झाल्यास जंगलांमध्ये शाकाहारी प्राण्यांची संख्या वाढेल आणि जंगलांतील वनस्पतींचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल. त्याचा परिणाम जंगलांच्या एकूण अस्तित्वावर होऊ शकतो आणि त्याचा फटका मानव जमातीलाही बसू शकतो. कारण आपण उत्सर्जित करीत असलेला कार्बन शोषण्याची दुसरी कोणतीही व्यवस्था आपल्याकडे नाही. वाघांच्या शिकारी प्रामुख्याने त्यांच्या अवयवांच्या वापरासाठी होतात. देशात आणि विदेशातही वाघांच्या अवयवांना मागणी आहे. उदाहरणार्थ चीनमध्ये काही पारंपरिक औषधांसाठी वाघांची हाडे आणि कातडी यांचा वापर होतो. अनेक देशांमध्ये पारंपरिक औषध पद्धतींच्या प्राबल्यामुळे अवैध बाजारपेठेत वाघांच्या अवयवांची मागणी अद्याप फार मोठी आहे. त्या मागणीने एक आंतरराष्ट्रीय काळा बाजार जन्माला घातला आहे आणि बहेलिया टोळीसारखे शिकारी त्यांचे पुरवठादार बनले आहेत.

वाघांच्या संवर्धनासाठी वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत २००५ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (एनटीसीए) ची स्थापना करण्यात आली. व्याघ्र प्रकल्पांचे प्रभावी संवर्धन आणि व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी धोरणे विकसित करण्याची जबाबदारी एनटीसीएची आहे. वाघांची संख्या कायम राखण्यासाठी राज्यांनी करावयाच्या उपायांबद्दल एनटीसीए सल्ला देत असते. तरीही व्यापक कॅनव्हॉसवर देशातील वाघांच्या संरक्षणाचे चित्र पाहिले तर ते पूर्णपणे समाधानकारक नाही. जाणकारांचे म्हणणे असे की, वाघांचे संरक्षण नेमके कुणी करायचे, याबद्दल अनेकदा ढकलाढकलीचा कार्यक्रम होतो आणि त्यामुळे शिकारी टोळ्यांचे फावते. विविध यंत्रणांमध्ये समन्वय नसला तर त्यांचा उच्छाद सुरू होतो. तो आता पुन्हा सुरू झालेला दिसत आहे. त्यामुळे आता कायमचे सावध झाले पाहिजे आणि वाघांच्या संरक्षणासाठी कंबर कसली पाहिजे. यंत्रणा आहेत, माणसे आहेत आणि त्यांच्याकडे तंत्रज्ञानही आहे. त्यांच्याच मेहनतीमुळे वाघांच्या शिकारी थांबल्या होत्या, ही देखील वस्तुस्थिती आहे. २०१३ मध्ये २० ते २५ वाघांची शिकार झाली तेव्हा सर्वांचे डोळे उघडले होते. त्यातही बहेलिया टोळ्यांचा हात होता. २०२३ मध्येही काही घटना घडल्या. अलिकडे या टोळीचा म्होरक्या अजित राजगोंड ऊर्फ अजित पारधी याला वाघाच्या शिकारीच्या प्रकरणात अटक झालेली आहे. अर्थात, तो एकटा हा सारा व्याप सांभाळत नसणारच. शिकारी टोळ्यांची पाळेमुळे खूप खोल आहेत. ज्या जंगलातून लाकडाचा एक ओंडका बाहेर नेणे अशक्य आहे, तेथून अख्खा मृत वाघ किंवा त्याचे अवयव बाहेर पडतात ते त्यामुळेच. एकेका वाघाच्या अवयवांचा व्यवहार ३०-४० लाखांचा असतो. या टोळ्यांमध्ये अख्खीच्या अख्खी कुटुंबे सामील असतात. ती जंगलालगतच्या गावांजवळ किंवा गावांमध्ये डेरा टाकतात. कधी वनोपज, कधी जडीबुटी विकतात. काही वेळा खेळण्यांची दुकाने थाटतात. गावकऱ्यांशी संवाद सुरू करतात. वाघांची माहिती घेतात. जमेल तशी जंगलात चक्कर टाकून आणि अन्य माध्यमांतून वाघांच्या जाण्या-येण्याचे रस्ते आणि पाणवठे यांची माहिती घेतात. साधारणतः पाणवठ्याच्या जवळ ते जमिनीत सापळे पुरतात. एकदा वाघ त्या सापळ्यात अडकला की, त्यांच्या क्रौर्याची परिसीमा होते. असे म्हणतात की, सापळ्यात अडकलेल्या वाघाच्या जबड्यात ते ओंडका कोंबतात किंवा फेकतात आणि त्याला गुदमरून टाकतात. अखेर वाघाचा मृत्यू होतो आणि टोळ्यांचे पुढचे काम सुरू होते. एक म्होरक्या पकडण्यावर तपास यंत्रणांनी थांबू नये. एकच टोळी असेल किंवा त्याच समूहाच्या अनेक टोळ्या असतील, असाही पूर्वग्रह असता कामा नये. देशभरातील वाघांवर हे संकट आले असेल तर त्यामागे मोठे सिंडिकेट असले पाहिजे आणि त्याच्या मागे मोठे हात आणि तेवढीच मोठी डोकी असली पाहिजेत. त्यांना रोखायचे असेल तर पारंपरिक पद्धत पुरेशी नाही. शिकारींचा मागोवा घेण्यासाठी ड्रोन, कॅमेरा ट्रॅपसह आता आर्टिफिशियल इंटेलिजन्ससारख्या टूल्सचा वापर सुरू झाला पाहिजे. त्याहून महत्त्वाचे आहे ते जंगलांच्या भोवती असलेल्या गावांमध्ये राहणाऱ्या लोकांना या प्रयत्नांत सहभागी करून घेणे. त्यांच्याकडून परिसरातील टोळ्यांच्या ठावठिकाण्यांची, हालचालींची माहिती मिळू शकते. त्यापुढचा टप्पा आहे वाघांच्या किंवा अन्य वन्यजीवांच्या संरक्षणात गुंतलेल्या प्रत्येकाला कठोरतम शिक्षा होण्याचा. त्यासाठी आवश्यक असेल तेथे कायद्यात बदल करावा आणि फास्ट ट्रॅक सुनावणी करून कठोरतम शिक्षा दिली जावी. आंतरराष्ट्रीय काळ्या बाजारातील मागणी हाही एक विषय आहे, जो यासंदर्भात हाताळला पाहिजे. वन्यजीवांच्या अवयवांची तस्करी रोखण्यासाठी जागतिक वन्यजीव संरक्षण संघटनांशी सहकार्य मजबूत केले पाहिजे. इंटरपोल आणि जागतिक संवर्धन संस्थांशी माहितीची देवाणघेवाण केल्यास शिकाऱ्यांच्या नेटवर्कचा मागोवा घेण्यास आणि ती नष्ट करण्यास मदत होऊ शकते. वाघांना चांगले अधिवास प्रदान करण्यासाठी आणि मानवी अतिक्रमण कमी करण्यासाठी व्याघ्र अभयारण्यांचे व्यवस्थापन सुधारणे गरजेचे आहे. वाघांचे दीर्घकालीन अस्तित्व सुनिश्चित करणे ही केवळ आजच्या पर्यावरणाची गरज नाही. येणाऱ्या पिढ्यांसाठी जंगले राखायची असतील, त्यांना स्वच्छ हवेत श्वास घेण्याची व्यवस्था कायम राखायची असेल तर वाघांचे संरक्षण करणे ही सरकार व समाज अशा दोघांचीही जबाबदारी आहे. ▮

## प्रासंगिक

# तालिबानीकरणाच्या वाटेवर बांगलादेश?

**राहुल गोखले**

बांगलादेशमध्ये दोन ठिकाणी होणारे स्थानिक स्तरावरील फुटबॉल सामने आयत्या वेळी रद्द करावे लागले. एवढ्या विधानातून त्यातील धग जाणवणार नाही. तेव्हा त्याचा तपशील नमूद करणे गरजेचे. हे सामने होणार होते ते स्थानिक महिला संघांमध्ये. मात्र, अशा रीतीने महिलांनी फुटबॉल खेळणे हे इस्लामविरोधी आहे, अशी दडपशाही करीत धर्मांध शक्तींनी सामनास्थळी हल्ला चढविला. परिणामतः महिला फुटबॉलपटूंची सुरक्षा धोक्यात आली आणि सामने रद्द करण्यावाचून आयोजकांसमोर पर्याय राहिला नाही. या घटनांनी बांगलादेश कोणत्या वळणावर आहे, याची प्रचीती येऊ शकते आणि म्हणूनच त्या घटनांची दखल घेणे आवश्यक आहे.

यातील एक सामना होणार होता तो दिनजापूर येथे. मात्र, तो सामना सुरू होण्याअगोदर अर्धा तास धर्मांध झुंडीने तेथे हल्ला चढविला आणि हिंसाचारास सुरुवात केली. हा सामना रद्द करावा, अशी त्या झुंडीची मागणी होती. हिंसाचारात अनेक जण जखमी झाले; पण त्यापेक्षा दुर्दैवी भाग म्हणजे महिला फुटबॉलपटूंना सुरक्षित ठिकाणी हलवावे लागले आणि सामना रद्द करावा लागला. काही तास उलटत नाहीत तोवरच जोयपूरहट येथे त्याच प्रकारची घटना घडली. तेथे आंतरजिल्हा महिला फुटबॉल सामना रंगणार होता. मात्र जवळच्याच मदरशाच्या प्रमुखाच्या नेतृत्वाखाली शेकडो जणांनी सामना स्थळी जाऊन निदर्शने केली आणि सामना रद्द करावा, यासाठी दबाव आणला. ज्याच्या नेतृत्वाखाली या झुंडीने हा हल्ला चढवला तो अबू बक्कर सिद्दिकी याने तर 'महिलांनी फुटबॉल खेळणे इस्लामविरोधी आहे' अशी दर्पोक्ती केली. मदरशातील विद्यार्थ्यांबरोबरच त्या झुंडीत अन्य धर्मांध संघटनांचे कार्यकर्तेही सामील होते. त्यांनी सामनास्थळाची नासधूस केली; 'गोल'साठीच्या जाळ्या उद्ध्वस्त केल्या आणि सामन्याचा आनंद घेण्यासाठी तिकिटे काढून आलेल्या प्रेक्षकांना पळवून लावले. अखेरीस सामना रद्द झाला.

या दोन्ही घटनांनंतर बांगलादेशच्या मोहमद युनूस सरकारने हल्लेखोरांना शिक्षा देण्यात येईल, अशी घोषणा केली असली, तरी ती किती निरर्थक आहे, याची प्रचीती लगेचच आली. एवढ्या दोन गंभीर घटना घडून गेल्यानंतरदेखील कोणावरही साधा गुन्हाही दाखल करण्यात आलेला नाही, हे त्याच उदासीनतेचे द्योतक. गेल्या वर्षीच्या मध्यास बांगलादेशात उफाळलेल्या जनउद्रेकानंतर तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना परागंदा होऊन भारताच्या आश्रयाला यावे लागले होते; तर मोहम्मद युनूस यांनी सल्लागार म्हणून शासन-प्रशासनाची सूत्रे हाती घेतली होती. तथापि, त्यानंतर बांगलादेश हा कट्टरवाद्यांच्या हातात जाऊ लागला, याचा प्रत्यय देणाऱ्या अगणित घटना घडल्या. आताच्या या दोन घटना दोन बाबी अधोरेखित करतात. एक, आपले सरकार समावेशक आणि सर्वांना मुक्त वातावरण देणारे असेल हे युनूस यांचे आश्वासन कुचकामी ठरले आहे. दोन, धर्मांध हे तेथील हिंदूंनाच लक्ष्य करीत आहेत असे नाही; तर आता त्यांची वाटचाल बांगलादेशच्या तालिबानीकरणाकडे सुरू झाली आहे. तेव्हा युनूस यांनी कितीही आश्वासने दिली तरी आता घडत असलेल्या घटनांना त्यांचे सरकारच कारणीभूत आहे. कारण धर्मांधांना त्यांनी दिलेली मोकळीक.

वास्तविक बांगलादेशात फुटबॉल हा अतिशय लोकप्रिय खेळ आहे. महिला फुटबॉलपटूंनी त्या देशाला अनेकदा अभिमानाचा अनुभव दिला आहे. २०२२ साली बांगलादेशच्या महिला संघाने दक्षिण आशिया फुटबॉल फेडरेशनच्या स्पर्धेत नेपाळच्या संघाला पराभूत करीत अजिंक्यपद पटकाविले होते. २०२४ च्या ऑक्टोबर महिन्यात बांगलादेश महिला संघाने त्याच विजयी कामगिरीची पुनरावृत्ती केली. विजयी संघ स्वदेशी परतला तेव्हा महिला फुटबॉलपटूंच्या स्वागतासाठी जनसागर लोटला होता. चाहत्यांनी या फुटबॉलपटूंची भव्य मिरवणूक काढली होती. फुटबॉल हा त्या देशात केवळ लोकप्रिय आहे असे नाही तर एका अर्थाने त्या देशाच्या अस्मितेचे ते प्रतीक आहे, याचेच ते द्योतक. महिला फुटबॉलपटूंना त्या देशात वलय लाभले आहे. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांतील अनेक महिलांची फुटबॉलपटू होण्याची आकांक्षा असते. मात्र, धर्मांधांनी आता एका पाठोपाठ एक सामने असे दोनदा बंद पाडल्याने या नवोदित फुटबॉलपटूंमध्ये धास्तीची आणि निराशेची भावना निर्माण झाल्यास नवल नाही.

ज्या घटना घडल्या त्या स्थानिक स्तरावर होत्या असे म्हणून त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही; कारण अशा घटनांमधून धर्मांधांची भीड एकदा चेपली की ते लोण देशभर पसरण्यास वेळ लागत नाही. वेळीच लगाम हाच त्यासाठी प्रभावी उपाय असतो. मात्र युनूस त्या दृष्टीने काही करतील, हे दिवास्वप्न ठरेल. याचे कारण मुदलात असे वातावरण देशात तयार व्हावे, यात त्यांचेच सर्वाधिक योगदान आहे. युनूस यांना जरा जरी चिंता असती तर त्यांनी आजवर घेतलेले अनेक निर्णय मुदलात घेतलेच नसते. सत्तेची सूत्रे हाती आल्यावर त्यांनी अनेक धर्मांधांना तुरुंगातून सोडून दिले. जमात-ए-इस्लाम पक्षावरील बंदी उठविली. हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात त्यांनी कुठलीही ठोस भूमिका घेतली नाही; हल्लेखोरांवर कारवाई करणे दूरच राहिले. या सगळ्याची परिणती म्हणजे धर्मांध शिरजोर ठरू लागले आहेत. त्याचेच प्रतिबिंब महिला फुटबॉल सामने रद्द करण्याची वेळ येण्यात पडले. मात्र, येथे प्रश्न केवळ फुटबॉल सामन्यांचा नाही. तालिबानीकरणाची सुरुवात अशाच घटनांतून होत असते हा धोका ओळखणे हे निकडीचे.

महिलांच्या स्वातंत्र्यावर गदा आणायची; त्यांच्या हक्कांची पायमल्ली करायची; त्यांच्या कर्तृत्वाला पंख फुटू द्यायचे नाहीत आणि त्यांना घराच्या चार भिंतींत डांबून ठेवायचे हीच तालिबानीकरणाची व्यवच्छेदक लक्षणे. अफगाणिस्तानमध्ये तीन वर्षांपूर्वी अमेरिकी लष्कर माघारी गेल्यानंतर तेथे महिलांची झालेली घुसमट याच तालिबानीकरणाचे विदारक वास्तव दाखविते. संयुक्त राष्ट्र संघाच्या ताज्या अहवालाप्रमाणे गेल्या तीन वर्षांत तेथे महिलांचा सार्वजनिक जीवनातील संचार जवळपास संपुष्टात आला आहे. तेथे सरकार किंवा प्रशासन कोणते निर्णय घेते, यात महिलांना कोणतेही स्थान नाही, अशी तेथील ९८ टक्के महिलांची कैफियत आहे. एवढेच काय; आपल्या कुटुंबात निर्णयप्रक्रियेत महिलांना असणारे स्थानदेखील कमालीचे घटले आहे. शिक्षणापासून महिलांना वंचित ठेवण्यात आले आहे. या सगळ्याचा परिणाम म्हणजे मानसिक आरोग्यावर परिणाम झालेल्या महिलांचे प्रमाण तेथे वाढत आहे. पुढील काही वर्षांत अफगाणिस्तानमध्ये महिला शिक्षण आणि आरोग्य सुविधांपासूनच दूर राहतील असे नाही; तर लहान वयात गरोदर राहणाऱ्या महिलांची संख्या वाढेल आणि त्याचा परिणाम २०२६ पर्यंत गरोदर महिलांच्या मृत्यूचे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते.

बांगलादेशसाठी हा इशारा आहे. धर्मांध शक्तींना वेसण न घालता युनूस सरकारने केवळ कृतिशून्य इशारे देण्याचा शहाजोगपणा केला तर बांगलादेश अफगाणिस्तानच्या वाटेवर गेल्याखेरीज राहणार नाही. महिला फुटबॉलपटूंचे सामने धर्मांधांच्या दडपशाहीसमोर नमते घेत रद्द करावे लागले, हे घातक वळण आहे. प्रश्न महिला फुटबॉल सामन्यांच्या मैदानांच्या विध्वंसाचा नाही; घटनेच्या पायमल्लीचा आणि एका संस्कृतीच्या विध्वंसाचा आहे. बंगाली संस्कृतीवर आधारलेल्या आणि महिलांच्या सबलीकरणाला पाठबळ देणाऱ्या राष्ट्राचे रूपांतर तालिबानीकरण झालेल्या राष्ट्रात झाले तर युनूस यांना इतिहास कधीही माफ करणार नाही. ▮

९८२२८२८८१९

## वेध

# खरंच... बोलतो का मराठी?

**विजय निचकवडे**

''बाबा, मी खूप 'कोशिश' केली पण् 'शायद' काही तरी चुकले म्हणून असं झालं...'' हे ऐकताना मराठी भाषेचा प्रकर्षाने व्यवहारात वापर, हा विषय कितपत अंगवळणी पडतो, हा प्रश्नच आहे. आज मराठी बोलल्यास शिक्षा करणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा बघितल्यानंतर खरंच राज्य शासनाने जारी केलेला शासकीय कामकाजात माय मराठीचा अधिकाधिक आणि सक्तीचा वापर करणारा आदेश प्रभावी ठरेल का? आज मराठी माणसांना आणि भाषेला इंग्रजी आणि हिंदीने पछाडले आहे. हे कुणामुळे झाले याचे चिंतन-मंथन होण्याची गरज आहे. आज इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रचंड पीक आले आहे. मराठी शाळा ओस पडत असताना, इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून जीवाचा आटापिटा करणारे पालक पाहावयास मिळतात. विद्यार्थ्यांची क्षमता, त्यांची इच्छा याचा विचार न करता आपला मुलगा इंग्रजी माध्यमाच्या सीबीएसई शाळेत शिकतो, हे सांगण्याचा आनंद मिळविण्यासाठीही काही पालकांची धडपड असते. यातूनच मग मराठी बाजूला जाऊन हिंदी, इंग्रजीचे भूत लहानपणीच डोक्यात जाते. हिंदी, इंग्रजी भाषा चुकीच्या का? तर मुळीच नाही. सर्वच भाषांचं ज्ञान हे असायलाच हवं. पण शाळेत मराठीत बोलला म्हणून विद्यार्थ्यांना शिक्षा करणाऱ्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा असतील तर अशा शाळांना मराठीचे महत्त्व पटवून देण्याची गरज आहेच ना?

केवळ औपचारिकता म्हणून आज इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठीचे शिक्षण दिले जाते. केवळ ४५ मिनिटांत जे काही मराठी मुलांच्या कानावर पडेल, तेवढेच. बाकी शाळेच्या आवारात असेपर्यंत होणारे व्यवहार हे हिंदी किंवा इंग्रजीत होणार असतील तर त्या मुलांच्या मनात मराठीविषयी प्रेम खरंच जागृत होईल का, हा प्रश्नच आहे. शाळेतून घरी आलेला विद्यार्थीही मग तुटक्या-फुटक्या मराठीत हिंदीचे कालवण करून बोलतो. मराठी भाषेला केंद्राने अभिजात भाषेचा दर्जा दिला. अनेक वर्षांपासूनची मागणी अखेर पूर्ण झाली. हा क्षण आम्हा मराठी लोकांसाठी गौरवाचा आहे. पण



हा गौरव केवळ मनात असून नाही तर कृतीतून दिसावा, हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. राज्य शासनाने एक शासनादेश जारी करून शासकीय कार्यालय प्रक्रियेत माय मराठीचा अधिकाधिक व सक्तीने वापर व्हावा, असा निर्णय घेतला. यासाठी शासकीय, निमशासकीय, महापालिका कार्यालयांमध्ये मराठी बोलणे अनिवार्य केले. मराठी भाषेत बोलण्याबद्दल दर्शनी भागात फलक लावण्याचा निर्देश दिला. शालेय, तंत्रशिक्षण आणि अन्य क्षेत्रांत काही शिफारशीही प्रस्तावित आहेत. एवढेच नाही, तर शासकीय अनुदानातून खरेदी केल्या जाणाऱ्या संगणकाच्या कळफलकावर रोमन लिपीसोबतच मराठी देवनागरी असणेही अनिवार्य केले आहे. शासनाने त्यांच्या परीने सर्वकाही केले. परंतु याने खरंच लोकांच्या मनात मराठीचा अभिमान जागृत होईल का? आज मराठी आकडेमोड करताना मराठीत कोणत्या आकड्याला इंग्रजीत काय म्हणतात, याचा विचार मुलांना करावा लागतो. मराठीत नाही, इंग्रजीमध्ये सांगा असे म्हणण्याची वेळ त्यांच्यावर येते. मग खरंच संगणकाच्या कळमुद्रा मराठीत छापून मराठीचा सन्मान होईल, असे वाटते. लहानपणापासून मराठीशिवाय इंग्रजी, हिंदी भाषेचे मुलांच्या मनात शिरविले जाणारे भूत जोपर्यंत निघणार नाही, तोपर्यंत पाट्या लावूनही काही उपयोग नाही. घरात हिंदी बोलणाऱ्या मुलासोबत पालक जोपर्यंत मराठीत बोलणार नाहीत, हिंदीतून एखादी गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना मराठीतूनच जोपर्यंत ठामपणे उत्तर दिले जाणार नाही, तोपर्यंत मराठी खरंच 'माय' होऊ शकणार नाही. केवळ मराठीचा अभिमान बाळगून 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरंच धन्य ऐकतो मराठी' ही सुरेश भटांची कविताच गाण्यात आम्ही धन्यता मानणार असू तर ठीक आहे. माय मराठीवर आपल्या आईसारखे प्रेम असेल तर इतर भाषिकांचे जेवढे प्रेम त्यांच्या भाषेवर आहे, तेवढेच आपल्याला मराठीवर दाखविणे गरजेचे आहे. आज दक्षिण भारतातील अनेक राज्यांमध्ये त्यांच्याच भाषेत संवाद साधला जातो. तुम्हाला तुमच्या कुवतीप्रमाणे तो समजून घ्यावा लागतो. हाच बाणा जर आम्ही बाळगू तरच मराठीचा अभिमान बाळगण्याचा अधिकार आम्हाला असेल. नाही तर 'खरंच' बोलतो का मराठी? असे म्हणण्याची वेळ येईल. ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# ईशावास्योपनिषद : याज्ञवल्क्यांचे ज्ञानकर्म समुच्चया तत्त्व

**प्रा. दिलीप जोशी**

खरं सांगायचं तर 'ईशावास्योपनिषद' हा सर्वप्रथम असलेला, सर्वांत महत्त्वाचा आणि सर्वांत छोटा उपनिषद आहे. शुक्ल यजुर्वेदाचे एकूण ४० अध्याय आहेत. त्यातील सर्वांत शेवटचा ४० वा अध्याय म्हणजे 'ईशावास्योपनिषद' होय. त्यामुळे वैदिक संहितेत अंतर्भूत असणारे हे एकमेव उपनिषद आहे. मंत्र भागात समावेश असल्यामुळे याला 'मंत्रोपनिषद' असेही म्हणतात. या उपनिषदाची सुरुवात 'इशावास्य मिदं सर्वं' या मंत्राने असल्यामुळे याला 'ईशावास्योपनिषद' किंवा 'ईशोपनिषद' म्हणतात.

योगीश्वर याज्ञवल्क्य या उपनिषदाचे कर्तेऋषी असल्याचे विद्वानांचे मत आहे. कारण बृहदारण्यक उपनिषद आणि ईशोपनिषदाचे कर्ते एकच असून बृहदारणक्य उपनिषदात योगीश्वर याज्ञवल्क्य यांचा प्रभाव आहे. शिवाय हे उपनिषद शुक्ल यजुर्वेदाचा मंत्रोपनिषद असल्याने याज्ञवल्क्य हे शुक्ल यजुर्वेदाचे द्रष्टे ऋषी असल्याने ईशोपनिषदाचे कर्ते ऋषी आहेत. हा उपनिषद म्हणजे अथर्वण महर्षींनी आपल्या मुलाला म्हणजे दध्यांग याला दिलेला उपदेश आहे. म्हणून याला 'दध्यांगथर्वन संवाद' म्हणतात. दध्यांग म्हणजे दधीची ऋषी जे अथर्वण ऋषी आणि माता चितीचे पुत्र आहेत. या उपनिषदात कोणतीही कथा किंवा कहाणी नाही. या उपनिषदात केवळ १८ मंत्र आहेत. हे उपनिषद पद्य उपनिषद आहे. भगवान श्रीकृष्णाने सांगितलेली गीता म्हणजे ईशोपनिषदच आहे. यातील एकूण १८ मंत्रांपैकी पहिले सात मंत्र 'ईशविद्या' म्हणून ओळखले जातात. या उपनिषदात कर्म आणि ज्ञान यांचा समन्वय हा मुख्य भाग आहे. संपूर्ण विश्वालाच पूर्णब्रह्म संकल्पिले आहे.

ईशा म्हणजे ईश्वर आणि वास्य म्हणजे वास असलेले, व्याप्त असलेले 'व्याप्तं येन चराचराम.' विश्वव्यापक परमात्माच जगत् रूपाने नटलेला आहे. शांकर मत 'ब्रह्म सत्य जगन्मिथ्या' म्हणत असल्याने ते या उपनिषदाशी वरपांगी मतभिन्नता दर्शवीत असले, तरी दोन्ही मतांतील नवनीत एकच आहे.

*ईशा वास्यमिदं सर्वं, यत्किंच जगत्यां जगत् ।*
*तेन त्यक्तेन भुंजीथा, मा गृधः कस्य स्विद्धनम् ॥१॥*

हे सर्व जग ईश्वरमय असून, त्याचा त्यागपूर्वक भोग घ्यावा. म्हणजे ईशोपनिषद उपभोगाला विरोध करीत नाही, पण तो उपभोग विवेकपूर्ण असावा. म्हणूनच तर छत्रपती शिवरायांना जगाचे उपभोगशून्य स्वामी म्हणतात. जगद्गुरू तुकाराम महाराजांचे वर्णन 'प्रपंच रचना सर्वही भोगोनी त्यागिली' असे करतात. जे आपल्याजवळ नाही त्याचा त्याग सहज शक्य आहे, पण प्राप्त असलेल्या बाबींचा त्याग कठीण आहे. भोगाचा विवेक यालाच म्हणतात.

*अप्राप्त विषय विरागी, बहुत देखिले योगी ।*
*परी प्राप्त सर्वांगणा त्यागी, धन्य विरागी पुरूरवा ॥*

प्राप्तामध्येही अप्राप्ताची प्रचीती किती गोड आहे नं. ज्ञान आणि आचार व्यवहार याचा समन्वय महत्त्वाचा. इथे त्याग सांगितला, पण तो अहंकाराचा, स्वार्थाचा त्याग सांगितला. अजून एक महत्त्वाचे की, इथे आत्मा स्थिर असला तरी मनापेक्षा वेगवान सांगितला आहे. तो इंद्रियांनाही अप्राप्य आहे. तोच जगाच्या आत आणि बाहेरही सर्वव्याप्त आहे. त्यानेच जगाला ज्ञान दिले आहे. कर्म श्रेष्ठ की ज्ञान, असा प्रश्न जेव्हा उपस्थित झाला तेव्हा योगीश्वर याज्ञवल्क्य यांनी 'ज्ञानकर्म समुच्चया तत्त्व' प्रतिपादित केले. हे ज्ञानकर्म समुच्चया तत्त्व म्हणजे ईशावास्योपनिषद होय.

या संसारात राहूनच पण संसार स्वतःला चिकटू न देता जीवनक्रम ठेवायचा, अविद्येचा हळूहळू त्याग करायचा आणि ब्रह्मप्राप्तीसाठी विद्याभ्यास सांगणारा हा व्यावहारिक उपनिषद आहे. विद्या आली की अविद्या आपोआप गळून पडते. याच उपनिषदात कर्मप्रशंसा आहे, अज्ञान निंदा आहे आणि आत्मस्वरूपाचे वर्णनदेखील आहे.

*वस्तु सर्वाणि भुतानी, आत्मन्नेवानु पश्यति ।*
*सर्व भूतेषु चात्मानं, ततो न विजुगुप्सते ॥*

जो विद्यावान सर्व जग स्वतःमध्ये पाहतो, जगात स्वतःला पाहतो, कशाचाच तिरस्कार करीत नाही. माझा आत्मा आणि जगातील सर्वांचा आत्मा एकच आहे हे जाणतो तोच यथार्थ पुरुष आहे.

*अंधं तमः प्रविशंति येऽ विद्यामुपासते ।*
*ततो भूय इव ते तमो य उ विद्यायाः रताः ॥*

काही लोक गल्लत करतात. त्यांना वाटते ज्ञान म्हणजेच विद्या. ते कर्माला अविद्या समजतात. पण हे सत्य नसून केवळ ज्ञान असूनही चालत नाही आणि केवळ कर्म असूनही चालत नाही. उदा. यज्ञकर्म ही कर्मक्रिया आहे आणि उपनिषद हे ज्ञान आहे. केवळ यज्ञकर्म करून चालणार नाही किंवा केवळ उपनिषदांचे ज्ञान चालणार नाही. केवळ विद्या म्हणजे अज्ञानरूपी अंधार कोठडीतच प्रवेश आहे आणि केवळ कर्म म्हणजेही अज्ञानच होय. या दोन्हीचा समन्वय या उपनिषदात आहे. खरं सांगायचं तर ऐहिक सुखाचा त्याग सामान्यांसाठी तसा कठीणच आहे. म्हणून हा उपनिषद ऐहिक सुखाला विरोध करीत नाही, पण आलेली सुखे इष्टमार्गांनी यावीत याबद्दल ईशोपनिषद ठाम आहे. ज्या मनुष्याला व्यक्त आणि अव्यक्त ब्रह्म कळले तो अमर झाला. मनुष्य कितीही मोठा असला, तरी माणूस म्हणून त्याच्या मर्यादा आहेतच. त्याच्या सर्व शक्ती सीमित आहेत. अशावेळी तो परब्रह्म परमात्माच गंतव्यासाठी साहाय्यभूत होतो.

*हिरण्मयेन पात्रेन् सत्यस्यापिहीतं मुखम् ।*
*तत्त्वं पुषन्नपावृणु, सत्यधर्माय दृष्टये ॥*

आदित्यमंडलातील त्या सत्याचे म्हणजे ब्रह्माचे मुख ज्योतिर्मय अशा सुवर्णांनी झाकले आहे. त्या सत्याची ओळख व्हावी, त्या ब्रह्माचे दर्शन सत्यधर्मी मनुष्याला व्हावे म्हणून हे महेशा तुम्ही ते झाकलेले द्वार उघडा. कारण मनुष्याच्या मर्यादा आहेत.

*अन्धं तमः प्रविशन्ति येऽसम्भूतिमुपासते ।*
*ततो भूय इव ते तमो य उ सम्भूत्यां रताः ॥*

इथे ईशोपनिषदात असूर्या लोकाची संकल्पना आहे. म्हणजे जिथे सूर्यकिरण पोहोचू शकत नाहीत, त्याला 'गर्भलोक' असेही म्हणतात. जी माणसे अविद्याप्रभावाने जगतात त्यांना मृत्यूनंतर हा अंधतम लोक म्हणजे असूर्यालोक प्राप्त होतो. अर्थात गर्भलोकात जावे लागते म्हणजे पुन्हा जन्म घ्यावा लागतो. ते टाळण्यासाठीच ईशोपनिषदातील ज्ञानकर्म समुच्चया तत्त्व महत्त्वाचे आहे. ईशावास्योपनिषद हा लहान कलेवर असलेला, पण प्रचंड विद्या समाविष्ट असलेला अद्भुत, प्रसिद्ध आणि प्रथम उपनिषद आहे. सर्व जगाचा चालक आणि मालक ईश्वरच आहे. म्हणून मनुष्याने त्याने सांगितलेल्या सात्त्विक आणि नैतिक मार्गावरच मार्गक्रमण केले पाहिजे, हाच उपदेश ईशोपनिषदात आहे. ▮

९८२२२६२७३५

### अतिरेकी भूतदया मानवी जीवास अपायकारक

सध्या प्राणिमित्रांच्या प्राणी-प्रेमाला भरती आल्याचे पाहायला मिळत आहे. शहरातील कोणत्याही रस्त्यांवर पाहा तुम्हाला एक तरी प्राणी-प्रेमी रस्त्यांवरील भटक्या कुत्र्यांना दूध, बिस्किटे, पाव, शिळे अन्न खायला घालताना दिसतीलच. काही पक्षिप्रेमी कबुतरांना शेव खाऊ घालताना हमखास नजरेस पडतात. प्राणिमात्रांवर प्रेम करा या वचनाप्रमाणे हे प्राणी-प्रेमी रस्त्यांवरील भटक्या कुत्र्यांना खायला देत असतात. मात्र त्यांच्या याच वृत्तीमुळे शहरात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत चालली आहे. काही हॉटेलवाले तसेच चिनी खाद्यपदार्थ विक्रेते त्यांच्याकडील शिळे अन्न भटक्या कुत्र्यांना देत असतात. रस्त्यांवरील ही भटकी कुत्री टोळ्यांनी फिरताना दिसतात. टोळीने फिरणारी ही भटकी, चावरी कुत्री गरोदर स्त्रिया, शाळकरी विद्यार्थी, वृद्ध नागरिक, दिव्यांग व्यक्ती यांच्यासाठी तापदायक ठरू लागली असून भटक्या कुत्र्यांनी हल्ला करून अनेकांना जखमी केले आहे. काही प्राणी पालक मंडळी आपल्या घरी पाळलेली कुत्री, मांजरी सार्वजनिक ठिकाणी, उद्यानात नेतात व तेथे प्राणी घाण करून ठेवतात. मांजराच्या अंगावरील गळणारे केस, कबुतरांची पिसे मानवी आरोग्यास अत्यंत धोकादायक असतात हे माहीत असूनही हे प्राणी-प्रेमी या प्राण्यांचे लाड करतात. प्राणी-प्रेमींच्या या अतिरेकी लाडाचा त्रास शहरातील इतर नागरिकांना होत आहे. जर या प्राणी- प्रेमींना भटक्या कुत्र्यांना खाऊ घालायचे असेल तर त्यांनी दत्तक घेऊन घरी न्यावे. प्राणिमित्रांची अतिरेकी भूतदया मानवी जीवाला अपायकारक ठरत आहे. भूतदया असावी. परंतु, सोबतच इतर जीवांच्या जगण्याच्या हक्काकडेही दुर्लक्ष होता कामा नये.



**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

### गणेश जयंती उत्सव

सकल सृष्टीची देवता, विघ्नहर्ता, बुद्धीची देवता गणपती. माघ शुद्ध चतुर्थीला गणेश जयंती साजरी करण्यात येते. बुटी ले-आऊट, लक्ष्मीनगर येथे देखील हा उत्सव मोठ्या थाटात साजरा होतो. काही वर्षांपूर्वी फक्त मूर्ती आणि वर छप्पर असे स्वरूप होते. गेल्या काही वर्षात सामान्य जनतेच्या साह्याने तेथे एक सुंदर मंदिर तयार झाले. भाविकांनी मुक्त हस्ते मदत केली. विश्वस्त मंडळ तयार झाले आणि त्याला मोठे स्वरूप प्राप्त झाले. गणेश जयंतीचा उत्सव मोठ्या प्रमाणात येथे साजरा होतो. त्यात शेकडो लोक सहभागी होतात. गणेश जयंतीनिमित्त विद्युत रोषणाई, रांगोळ्यांची सजावट अतिशय आकर्षक असते. अनेक भाविक महाप्रसादाचा लाभ घेतात. तसेच चैत्राच्या नवरात्रात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच अनेक सार्वजनिक उत्सवात स्तुत्य उपक्रम राबविण्यात येतात. रामाच्या नवरात्रात गुढी पाडव्याच्या दिवशी सुंदर असा दीपोत्सव असतो. यामागे भाविकांच्या श्रद्धा असते. आपल्या संस्कृतीची जपणूक केली जाते आणि एकजुटीचे दर्शन येथे घडते.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

●● ●●

### पक्षाला लागली घरघर...

मनसे या पक्षाचे सर्वेसर्वा राज ठाकरे यांनी पक्ष कार्यकर्त्यांचा मुंबई येथे मेळावा घेतला. नेहमीप्रमाणे प्रचंड गर्दी होती. येत्या काळात राज्यातील महानगरपालिकाच्या निवडणुका अपेक्षित आहेत, त्या संदर्भात पक्षाची दिशा, धोरण, कार्यकर्त्यांचे संघटन, त्यात फेरबदल इत्यादी विषयांवर त्यांनी नेहमीप्रमाणेच मार्गदर्शन केले. मागील विधानसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाला कमी मते मिळाल्यामुळे त्यांना आश्चर्य वाटत होते.

निवडणूक होऊन ६८ दिवस लोटल्यावर त्यांनी पराभवाची मीमांसा करावी, हे आकलनाच्या बाहेर आहे. आता पक्ष चालवायचा म्हणजे कार्यक्रम तर आखला पाहिजे. त्यांच्या इंजिनाची देखभाल, दुरुस्ती, तेलपाणी, इत्यादी कार्यक्रम हे कोणत्याही निवडणुकी आधी अपेक्षितच आहेत. त्याचीच तजवीज करण्यासाठी ही सभा आयोजित केली होती. राज ठाकरे यांना आश्चर्य असे वाटते की त्यांच्या सभेला नेहमी प्रचंड गर्दी होत असताना निवडणुकीत त्यांच्या उमेदवारांचे डिपॉझिट जप्त का होते?

वस्तुतः ठाकरे परिवारातील नेते मंडळी ही फक्त बोलघेवडी, बोलण्यात व दुसऱ्याच्या नाकदुऱ्या काढण्यात पटाईत असल्यामुळे सभेला आलेल्यांचे मनोरंजन होते, हे त्यांना कळत नाही की त्यांना हे माहीत असून ते दाखवीत नाहीत, असा प्रश्न पडतो. कोणताही प्रश्न हा वक्तृत्वाने, चांगल्या भाषणाने चालत नसतो. त्यास ध्येय, धोरण आणि त्याबाबत निष्ठा ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांचे पाठबळ आवश्यक असते. निवडणुकीची वेळ आली की बुलेटप्रूफ गाडीतून, कमांडोच्या संरक्षणात पंचतारांकित हॉटेलमध्ये पत्रपरिषद घेणाऱ्या पक्षाची जागा कुठे, काय व कशी आहे, हे सुजाण मतदारच ठरवीत असतात, हे राज ठाकरे यांना कायम स्मरणात ठेवावे लागेल. ▮

**संजय पाठक**/नागपूर

## संक्षिप्त वृत्त



### महिलांनी संसारासोबत आरोग्याचीही काळजी घ्यावी : डॉ. जानवी माखिजा

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
महिलांनी संसारा सोबत आरोग्याचे ही काळजी घेणे गरजेचे आहे असे मत कृष्णा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जान्हवी माखिजा यांनी व्यक्त केले. कृष्णा फॉऊंडेशनच्या वतीने महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने या उपस्थित होत्या. यावेळी डॉ. राखी माने यांनी महिलांना आरोग्य संदर्भात महत्वाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात संगित खुर्ची (प्रथम क्रमांक- शुभांगी प्रसाद खोबरे, द्वितीय - पल्लवी वैद्य), संगीत बॉल (प्रथम - पल्लवी वैद्य), तळ्यात मळ्यात (प्रथम - पल्लवी वैद्य) या सारखे खेळ घेऊन विजेत्यांना बक्षिसे डॉ. राखी माने यांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात जवळपास १५६ महिलांचा सहभाग नोंदवला होता. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनील दावड़ा, राज माखिजा, युक्ता माखिजा, प्रशांत अपराध, सुनिता दळवी, माधवी, स्वाती, आशा मुरजानी, दिव्या मुरजानी, स्वाती, कीर्ति, मीना, अंजली, अनुपमा गोस्की, मीनाक्षी, ऋषी माखिजा, भारती माखिजा, रति माखीजा, संस्थेचे संचालक यांचे सहकार्य लाभले.



### शिवाजी नाईट कॉलेज विजेता; महाविद्यालयीन बेसबॉल स्पर्धेत कामगिरी

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन बेसबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. सी. बी. खेडगी महाविद्यालय अक्कलकोटने आयोजित केलेल्या या स्पर्धेतील अंतिम सामन्यात छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजने सोनी महाविद्यालयावर ६-० होमरनने विजय प्राप्त केला. या विजयी संघास प्रा. संतोष गवळी, प्रा. सचिन गायकवाड, मारुती घोडके, माजी खेळाडू प्रशांत कदम यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडू आणि मार्गदर्शक यांचे मराठा समाजसेवा मंडळाचे अध्यक्ष मनोहरपंत सपाटे जनरल सेक्रेटरी प्रा. महेश माने आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर पवार यांनी अभिनंदन केले. विजयी संघ : रफिक सय्यद, आदित्य बडवणे, दत्तात्रय पवार, ओम झिपरे, संकेत सोनकडे, श्रीकांत जाधव, गणेश बंडगर, संदेश शिरसाट, जुनेद शेख, अतुल गोसावी, रमेश धोडमनी, शिराज तांबोळी.



### व्हॅलेंटाईन स्कूलमध्ये रथसप्तमीनिमित्त सूर्यनमस्कार

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये रथसप्तमी निमित्त विध्यार्थ्यांकडून सूर्यनमस्कार घेण्यात आले. क्रीडा शिक्षक शिवाजी आवताडे, संतोष पाटील व लावण्या दुस्सा यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम झाला. यावेळी मुख्याध्यापिका जी.एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर पर्यवेक्षिका, सुनिता मंद्रुपकर, नागमणी पेगडा, सपना इंदापूरे व अरुणा चिलवेरी, वरलक्ष्मी पलगंटी हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, उपसचिव नागेश शेंडगे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



### गांधी व्हिजन फीचर्सतर्फे महात्मा गांधींना अभिवादन

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
आसरा चौक येथील सुरवसे कनिष्ठ महाविद्यालय येथे गांधी व्हिजन फीचर्सच्या उपस्थितीत महात्मा गांधींचा पुण्यतिथी दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या उज्ज्वला साळुंखे होत्या. प्रमुख वक्ते प्राचार्य डॉ. सोपान जावळे यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनावर सूक्ष्म विवेचन आपल्या भाषणात केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या 'रघुपति राघव' या प्रार्थनेनंतर गांधी व्हिजन फीचर्स चे अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री यांनी 'वैष्णव जनतो' हे भजन सादर केले. अतिथी परिचय प्राचार्य गंगाधर घोंगडे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. पुकाळे मॅडम यांनी व आभार प्रदर्शन सदस्य पत्रकार महावीर दुरुगकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी सुनील व्हसाळे, अब्दुल रजाक बागवान, मनोज व्हटकर तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींची उपस्थिती होती.


# जिल्ह्यातील शिधापत्रिकाधारकांना आधार प्रमाणीकरण ई-केवायसी अनिवार्य

**गावोगावी सुरू केले कॅम्प**

**ई-केवायसी केली नाही तर धान्यही नाही**

**जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत जिल्ह्यातील रास्तभाव धान्य दुकानांमधून अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यात येते. या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण ई केवायसी करण्याच्या शासनाच्या सूचना आहेत. त्यानुसार सर्व शिधापत्रिकाधारकांनी आधार प्रमाणीकरण ई-केवायसी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे. दरम्यान, लाभार्थ्यांचे ई-केवायसी करण्याकरिता गावोगावी कॅम्प आयोजीत केले आहे. या करिता शिधापत्रिकेतील अर्थात कुटुंबातील सर्व लाभार्थ्यांनी आपल्या नजीकच्या रास्तभाव धान्य दुकानांमध्ये प्रत्यक्ष आधार कार्ड दाखवून, अंगठयाचा ठसा देऊन आधार प्रमाणीकरण ई-केवाससी करावयाचे आहे. अन्यथा ई केवायसी न केल्यास धान्यही मिळणार नाही, असा इशारा जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी आज (दि. ०४) दिला आहे.




सदरील ई-केवायसी प्रक्रिया दि. १५ फेब्रुवारीपर्यंत करावयाची असल्याने लाभार्थ्यांनी जवळच्या रास्तभाव धान्य दुकानामध्ये अथवा कॅम्पमध्ये जाऊन आपल्या अंगठयाचा ठसा व आधार नंबर देऊन ई-केवायसी करावी. ई-केवायसी केले नाही, तर दि. १५ फेब्रुवारीनंतर धान्य दिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. त्यामुळे सर्व लाभार्थ्यांनी कॅम्पचा लाभ घ्यावा. या संदर्भात सर्व लाभार्थी व रास्तभाव धान्य दुकानदार यांना दि. १५ फेब्रुवारीपूर्वी १००% कामकाज पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी केले आहे. तसेच जिल्हयातील सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांनी प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेस अन्नदिन साजरा करुन लाभार्थ्यांना धान्य वाटप सुरु करावे. कोणत्याही परिस्थितीमध्ये दर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी सर्व लाभार्थ्यांना धान्य वाटप पूर्ण करावे, अशा सक्त सूचना देण्यांत येत आहेत.

**वन नेशन वन रेशनकार्ड योजनेसाठीही ई-केवायसी**

वन नेशन, वन रेशनकार्ड अंतर्गत राज्यातील लाभार्थी नजीकच्या कोणत्याही रास्तभाव दुकानामध्ये जाऊन अन्नधान्याची उचल करीत आहेत. त्या लाभार्थ्यांनी त्याच दुकानामध्ये ई-केवायसी करुन घ्यावी, अन्यथा आपल्या गावी रास्तभाव धान्य दुकानात जाऊन ई-केवायसी करावी. अन्यथा त्यांनाही धान्य मिळणार नाही.

**ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत कामगारांना तातडीने शिधापत्रिका वितरीत**

केंद्र शासनाच्या ई-श्रम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थलांतरीत, असंघटीत कामगार ज्यांच्याकडे अद्याप रेशनकार्ड नाही, अशा कामगारांना प्रचलित निकषानुसार विशेष मोहिमेंतर्गत तातडीने शिधापत्रिका वितरीत करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. ई-श्रम पार्टलवर नोंदणीकृत स्थलांतरीत असंघटीत कामगारांसाठी ही मोहीम जिल्हयातील सर्व तहसिल कार्यालयामध्ये सुरु आहे. त्यानुसार ज्या व्यक्तीनी स्वतःचे नाव ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत केलेले आहे. मात्र अद्याप कोणत्याही प्रकारच्या शिधापत्रिकेचा लाभ नाही, अशा व्यक्तींनी आवश्यक त्या कागदपत्रांसह जवळच्या तहसिल कार्यालयमध्ये संपर्क करुन शिधापत्रिका प्राप्त करुन घ्यावी असेही आवाहन जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी केले आहे.

मनोरमा परिवार अंतर्गत
महिला उद्योजक नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर
मनोरमा कॉम्प्लेक्स, अवंती नगर, जुना पुना नाका, सोलापूर
ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना
९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९१ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना
अधिक महितीसाठी संपर्क
कु. अरुंधती पद्माकर नायडू चेअरमन (मो. ९०२८७१७२७२)
सौ. मंजुश्री विजय कालेकर व्यवस्थापिका (मो. ९८८१४५५११९)

## मुलांना बोरन्हान घालण्याची परंपरा कायम

**सदाशिवनगर :** संक्रांती पासून रत्सप्तमी पर्यंत ५ वर्षाखालील लहान मुलांना बोर न्हान घालण्याची परंपरा आजही कायम आहे.लहान मुलांच्या उत्तम आरोग्यासाठी , शिशु संस्कारासाठी तसेच बदलत्या ऋतूत मुलावर परिणाम होऊ नये .यासाठी या ऋतूतील फळे बोर,शेंगा, ऊस, सुटे पैसे इ फळे डोक्यावर टाकून न्हान घातले जाते.बाळास हलव्याचे दागिने घालून ,बाळास काळया रंगाचे कपडे घातले जातात.याकार्यक्रमासाठी लहान मुलांना,महिलांना बोलावले जाते.त्यामुळे माणसा माणसा मधील अंतर कमी व्हावे सर्व एकत्रित येऊन विचारांची देवाण व्हावी हा उद्देश आहे.त्याच बरोबर या ऋतूतील फळे खाल्ल्याने थंडीच्या दिवसात उष्णता निर्माण होते हे मागचे शास्त्रीय कारण आहे.

## 'सक्षम'तर्फे दिव्यांगांचा १० मे रोजी मोफत सामुदायिक विवाह सोहळा

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
सक्षम सामाजिक संस्थेच्या वतीने सालाबाद प्रमाणे याही वर्षी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त मोफत सामुदायिक विवाह १० मे २०२५ रोजी दिव्यांग जोडप्यांचा मोफत सामुदायिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती सक्षम संस्थेचे कार्याध्यक्ष सचिन हुंडेकरी यांनी दिली. शेळगी येथील लोकमंगल बँक जवळील मातोश्री हॉल येथे हा विवाह सोहळा होणार आहे. या सोहळ्यात जोडप्याना स्वयंरोजगारासाठी फिरते स्टॉल, कॉम्पुटर, छोटी झेरॉक्स मशीन, लॅपटॉप, प्रिंटर या पैकी एक वस्तू, मणी मंगळसूत्र, जोडवे, रॅक आणि संसार उपयोगी भांडी देण्यात येणार आहेत. या विवाह सोहळ्याकरिता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही, असे महेश कासट यांनी सांगितले. इच्छुक वधू-वरांनी नाव नोंदणीसाठी प्रशांत हिबारे (९१५६३७४८४९), डॉ. जगदीश पाटील (९८९०९९५४६७), अॅड. अमोल कोटीवाले (९८९०९१०९६०), महेश कासट (९९२२७५८८६८), सिद्धाराम नागशेट्टी (९०२८८०९९२९), युवराज यलशेट्टी (९९७०४३४०३८), महेश मग्रूमखाने (९२७१७७७७०५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सक्षम संस्थेचे संस्थापक प्रशांत हिबारे यांनी केले आहे.



## सोलापुरात अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अधिवेशन

**विविध विषयांवर मार्गदर्शन; जीवनगौरव पुरस्कारांचे होणार वितरण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अधिवेशन शनिवार दि. ८ व ९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६.३० या वेळेमध्ये सोलापुरातील हिराचंद नेमचंद दिगंबर जैन धर्मशाळा, श्राविका आश्रम समोर, सम्राट चौक, सोलापूर येथे आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती संयोजन समिती सदस्य बाहुबली दुरूगकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, खा. डॉ. अजित गोपछडे उपस्थित राहणार आहेत. अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन होणार आहे. जैन अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी, आ. विजयकुमार देशमुख, आ. दिलीप सोपल, खा. ओमराजे निंबाळकर, केंद्रीय अल्पसंख्यांक आयोग सदस्य फुलचंद जैन, माजी मंत्री राजेंद्र दर्डा, प्रकाश आवाडे उपस्थित राहणार आहेत. अधिवेशनामध्ये द्वितीय सत्र हे महिला संसद: ध्येय एक दिशा अनेक- नव्या पिढीतील नारीशक्ती अविष्कार यावर महिला प्रकोष्टच्या ईशा कोळेकर मार्गदर्शन करणार आहेत. तिसरे सत्र 'शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचे मनोगत व डॉ. नरेंद्र भुसारी यांचे युवा करियरवर मार्गदर्शन, चौथ्या सत्रांमध्ये सायंकाळी महाआरती व जैन सैतवाळ कलावंतांचा कलाविष्कार हा शिवरंजनी प्रस्तुत संगीत रजनी, रविवार दि. ९ फेब्रुवारी रोजी पाचव्या सत्रामध्ये सकाळी ८ ते १ या वेळेमध्ये प्रभात फेरी, पुष्पवृष्टी, पादुका पूजन व पंचारती ओवाळणी, सहाव्या सत्रामध्ये 'स्वदेशी एवं उद्यमिता... उद्योजकतेची मनोभूमिका यावर यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन होणार आहे. याचे उदघाट्न प्रिसिजन उद्योग समूहाचे यतीन शहा करणार आहेत तर अध्यक्षस्थानी उद्योजक रवींद्र कोंडेकर असतील. सातव्या सत्रांमध्ये प्रज्ञावंत मेळावा, सद्यस्थितीतील युवकांसमोरील आव्हाने व संधी या विषयावर कर्नाटक येथील सनदी अधिकारी अजय कोरडे यांचे मार्गदर्शन तसेच डॉ. वर्षा जबडे , डॉ. वर्षा कस्तुरकर, प्रा. डॉ. सुनीता सांगोले यांचा सत्कार होईल. आठव्या सत्रामध्ये दुपारी २ ते ३.३० या वेळेमध्ये अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिलीप घेवारे यांच्या अध्यक्षतेखाली खुले अधिवेशन पार पडणार आहे. नवव्या सत्रामध्ये ज्येष्ठ नागरिक जीवन गौरव पुरस्कार व समारोप यामध्ये समाजातील उल्लेखनीय यश प्राप्त केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा खा. प्रणिती शिंदे यांच्या हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अधिवेशनाचे प्रमुख संयोजक व अखिल दिगंबर जैन सैतवाळ संस्थेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. राजेश फडकुले व स्वागतध्यक्ष प्रकर्ष संगवे यांनी केले आहे. यावेळी वैभव आहेरकर, प्रा. निलेश एखंडे, अरुण धुमाळ, अनंतकुमार रणदिवे, अशोक भालेराव आदी उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांच्या निर्देशाप्रमाणे यंदा १०० टक्के निधी खर्ची!

**जिल्हा नियोजन विभागाची माहिती**

**मागणीपैकी ४० टक्केच रक्कम शासनाकडून अदा**

**निवडणुकांचाही निधीला फटका**

**२०२५-२६ सालासाठी असा केला आराखडा**

कृषी व संलग्न सेवा- रुपये ५०.२६ कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना-रुपये ६० कोटी, जलसंधारण विभागाच्या योजना - रुपये ५५ कोटी, ऊर्जा विकास -रुपये ६० कोटी, शिक्षण विभागाच्या योजना - रुपये ३९ कोटी, महिला व बाल विकासाच्या योजना - रुपये १९.८५ कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण-रुपये ६३.१५ कोटी, नगर विकासाच्या योजना-रुपये १०६ कोटी, रस्ते व परिवहन - रुपये ६८.२० कोटी, पर्यटन, तिर्थक्षेत्र, गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास - रुपये ४६.२० कोटी, पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण रुपये-२१.८५ कोटी.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**
जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ८३ टक्के, अनुसूचित जाती उपयोजना ५१ टक्के व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २७% असा एकूण ७८ टक्के निधी जानेवारीअखेर खर्च झालेला आहे. तर उर्वरित मंजूर निधी माहे फेब्रुवारी २०२५ अखेर पर्यंत खर्च करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा नियोजन विभागातून मिळाली. दरम्यान, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या निर्देशाप्रमाणेच १०० टक्के निधी मार्गी लागणार असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

दरम्यान, गतवर्षी मागणीपैकी ४० टक्केच निधी प्राप्त झाला असून, लोकसभा, विधानसभा निवडणुकांमुळे हा निधी कमी मिळाल्याचे सांगण्यात येते.

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री गोरे यांनी सन २०२४-२५ चा १००% निधी खर्च करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी अधिक गतीने काम करावे. ज्या यंत्रणांनी अद्याप प्रशासकीय मागणीसाठी आवश्यक कार्यवाही केली नाही त्यांनी ती तातडीने पूर्ण करावी अशा सक्त सुचना दिल्या होत्या. त्यानुसार संबंधित सर्व यंत्रणांकडून २५९ कोटी १५ लाखाचा निधी खर्ची जात आहे. गतवर्षी ७०२ कोटीचा जिल्हा वार्षिक योजना आराखड्यास तत्कालिन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मान्यता दिली होती. तर जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण ८६१.८९ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १५२ कोटी तर आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ५.४४ कोटी अशा एकूण १ हजार १९ कोटी ३३ लाखाच्या प्रारूप आराखड्यास राज्य समिती समोर सादर करण्यासाठी समितीने मान्यता दिल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. तर शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण करीता ६६१.८९ कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे. तसेच शिक्षण, आरोग्य, रस्ते विकास, नगरविकास, जनसुविधा यासारख्या महत्वाच्या बाबींकरीता २०० कोटींची अतिरिक्त मागणीचा पुरक आराखडा सादर केला आहे. गतवर्षी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता-अर्थ संकल्पीय तरतूद- ७०२ कोटी, प्रशासकीय मान्यता रक्कम- ६२०.९० कोटी, प्राप्त एकूण निधी- २८०.८० कोटी, एकूण वितरीत निधी - २५९.१५ कोटी केला असून, उर्वरित निधीही येत्या महिनाखेर खर्ची पडणार आहे. म्हणजेच यंदा १०० टक्के निधी खर्ची पडणार आहे. गतवर्षी मागणी केलेल्या निधीपैकी अवघा ४० टक्केच निधी मिळाला आहे. गतवर्षी लोकसभा, विधानसभा निवडणुका असल्यानेही या निधीवर परिणाम झाला आहे. निवडून आलेल्या नवीन खासदार आणि आमदारांनीही विविध विकास कामासाठीच्या निधीची मागणी केली असून, त्यांच्याही निधीतून जिल्हा विकासाची कामे मार्गी लागणार आहेत. तर आगामी २०२५-२६ साठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता राज्य शासनाने घातलेली आर्थिक मर्यादा- ६६१.८९ कोटी, यंत्रणांची मागणी-१६१०.९० कोटी, मर्यादेत तयार करण्यात आलेला प्रारुप आराखडा किंमत- ६६१.८९ कोटी, प्रस्तावित अतिरिक्त मागणी-२०० कोटी, एकूण आराखडा-८६१.८९ कोटीचा जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे.

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
निविदा सूचना
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम), मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित फर्म/कंत्राटदारांकडून ई-निविदा आमंत्रित करतात. निविदा सूचना क्रमांक: 03-2025-SrDENS. कामाचे नाव: वाडी स्थानकावर जलद पाणी पिण्याची सुविधा विकसित करणे. कामाची अंदाजे किंमत: 4,84,83,578.98. बयाणा रक्कम: 3,92,400/-. काम पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने. देखभाल कालावधी: २४ महिने निविदा वेबसाइटवर www.ireps.gov.in अपलोड करण्याची शेवटची तारीख आणि वेळ 24/02/2025 दुपारी: 15.00 वाजेपर्यंत www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ 24/02/2025 15.30 वाजता. संभाव्य निविदाकारांना सूचित केले जाते की त्यांनी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटवर वारंवार भेट द्यावी. यासाठी जारी केलेले बदल/शुध्दिपत्र निविदा वेबसाइट: www.ireps.gov.in.
डीआरएम (W)
सोलापूर
Sai/SUR/40
अपने जानवरों को रेल लाइन से दूर रखे

जाहिर पब्लिकेशन
बदल अर्ज क्र. १६६३/२२
किरकोळ अर्ज क्र. १६६४/२२
सोलापूर येथील मे. धर्मादाय उप आयुक्त साहेब / सहाय्यक धर्मादाय आयुक्त साहेब यांच्या न्यायालयात
ब्रह्मानंद मोरे प्रतिष्ठान, कुरनुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर रजि नं. एफ ८४९४ सोलापूर या संस्थेचे उद्देशात, घटना नियम नियमावली वाढ व बदल करण्या बाबत घटना दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. **अर्जदार श्री. बाबासाहेब पांडूरंग मोरे** यांनी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय येथे दाखल केलेले आहे. सदर संस्थेच्या उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ करण्यात आले आहे. सदर प्रकरणामध्ये कुणालाही कुठल्याही विश्वस्तांना किंवा सभासदांना जर हरकत घ्यायचे असेल त्यांनी सदरची जाहिर पब्लिकेशन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसाच्या आत स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत सदर अर्जास उत्तर देणे कामी मे. कार्यालयात हजर व्हावे अन्यथा सदरचे मे. कार्यालय हे वर नमुद संस्थेचे संस्थेच्या उद्देशात, घटना नियम नियमावली मध्ये बदल व वाढ बाबतचे प्रकरण एकतर्फी चालवुन सदरचा अर्ज निकाली काढतील. त्यानंतर कोणतेही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
हे जाहिर पब्लिकेशन केले ता. ०३/०२/२०२५
शिक्का
सही/-
एस. एस कुमठेकर
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर विभाग, सोलापूर

खरेदीपुर्व जाहीर नोटीस
तमाम लोकांना या खरेदीपुर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि व सब डि सोलापूर पैकी शहर सोलापूर येथील (दक्षिण कसबा) म्यु.घर नं. ७७४ यांसी सिटी सर्व्हे नं. ८१५ व ८१६/१ या मिळकतीची दक्षिण कसबा येथील घरजागा एकूण क्षेत्र ७३.६ चौ.मी. इतकी घरजागा असे यांसी चतुःसीमा पुर्वेस - बोळ वजा रस्ता, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - सि.स.नं. ८१४ उत्तरेस - सि.स.नं. ८१६/२ येणेप्रमाणे चतुःसीमामध्ये वर्णन केलेली घरजागा व त्यातील तंदगभूत वस्तू व वहिवाटीच्या सर्व हक्कासह.
वर नमुद घरजागा ही नीरज रमनलाल झंवर, रा. सोलापूर यांच्या रजि. खरेदी मालकीची असून, सदर घरजागा ही त्यांनी आमच्या अशिलास विक्री करण्याचे ठरवून तसा इसारापोटी काही रोख रक्कम स्विकारून, सदरची घरजागा ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे हमी त्यांनी आमच्या अशिलांस दिली आहे. तरी सदर वर नमुद घरजागेबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार, दान, बक्षिसपत्र, लिज, लिन, पोटगी हक्क, मृत्युपत्र, कुलमुखत्यारपत्र, कोर्ट दावे, सावकारी व पतसंस्था देणे-घेणे इत्यादी असल्यास त्यांनी ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रासह हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल हे पुढील व्यवहार पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलावर व घरजागेवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपुर्व जहीर नोटीस दिली ता. ०५/०२/२०२५
सही/-
अॅड. सचिन एच. इंगळगी
बी.एस्सी., एल.एल.बी,
ऑफिस - १५९, प. मंगळवार पेठ,
सोलापूर मो. ९९२२८८३३५९

जाहीर प्रसिद्धीकरण
वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज
दि. कि. अर्ज नं. ८१/२०२४ नि.नं.३४
पुढील नेमलेली तारीख १७/०३/२०२५
बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु. डिव्ही. साहेब यांचे कोर्टात
(श्रीमती रेवती प्र. बगाडे सो. कोर्ट)
**श्री. जयंत यशवंत कुलकर्णी,** उ. वय ५८ वर्षे, धंदा- शेती, रा. पांडे चौक, सोमवार पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अर्जदार
- विरुद्ध -
१) **श्री. हेमंत यशवंत कुलकर्णी,** उ. वय ५६ वर्षे, धंदा- शेती, रा. पांडे चौक, सोमवार पेठ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **वंदना श्रीकांत जोशी,** उ. वय ६५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. कुमार प्राईडपार, सेनापती बापट रोड, पुणे
३) **निता हर्षवर्धन पोतनीस,** उ. वय ६३ वर्षे, धंदा- घरकाम, रा. महादेव पार्क, कोथरुड, पुणे
४) **सुषमा रविंद्र पाठक,** उ. वय ४९ वर्षे, धंदा- घरकाम, रा. रुईकर कॉलनी, कोल्हापूर — सा. वाला
अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट कलम २ प्रमाणे
यात अर्जदार कळवितो ते खालीलप्रमाणे-
ज्याअर्थी, यातील अर्जदार व सा.वाला नं. १ ते ४ यांची आज्जी नामे गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी या दि. २४/०३/१९९२ रोजी मौजे रातंजन, ता. बार्शी, जि. सोलापूर येथे मयत झालेल्या आहेत. मयत गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी यांचे अर्जदार व सा.वाला नं. १ ते ४ हे नातू व नाती असल्याने त्यांचा सांभाळ व मृत्युनंतर अंत्यविधी वगैरे सर्वकाही अर्जदार व सा.वाला यांनी केलेला आहे. मयत गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी यांना अर्जदार व सा.वाला नं. १ ते ४ यांचे शिवाय इतर कोणीही वारस नाही. अर्जदार व सा.वाला व कै. गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी यांचे नावे डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी कासारी येथे जमीन गट नं. २०५ या गटापैकी क्षेत्र ०० हे. ४० आर आकार रु. ००.६६ पैसे आहे. याची चतुःसिमा- पूर्वेस- बोरे यांची जमीन, दक्षिणेस- जगताप, पश्चिमेस- शेळके व उत्तरेस- शेळके यांची जमीन. येणेप्रमाणे आतील तदंगभूत वस्तु व हक्कासह.
त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत कै. गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी यांना इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १७/०३/२०२५ रोजी याकामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा. हजर राहून कागदपत्रानिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचेही काही म्हणणे/हरकत न आल्यास सदरील अर्जदार व सा.वाला यांना सदरील गंगुबाई ऊर्फ गंगाबाई शंकरराव कुलकर्णी यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे, हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले. तारीख : ०३/०२/२०२५
सही/- कनिष्ठ लिपीक
(कोर्टाचा गोल शिक्का)
सही/- सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय खेळांमध्ये अनमोलने पटकावले सुवर्णपदक



**डेहराडून :** भारताची उदयोन्मुख बॅडमिंटनपटू अनमोल खरबने मंगळवारी येथे झालेल्या ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या महिला एकेरीच्या अंतिम फेरीत अव्वल मानांकित अनुपमा उपाध्यायला सरळ गेममध्ये हरवून सुवर्णपदक जिंकले. आशियाई संघ अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाची सदस्य असलेली हरियाणाची १८ वर्षीय अनमोलने जागतिक क्रमवारीत ४३ व्या स्थानावर असलेल्या अनुपमाचा २१-१६, २२-२० असा पराभव करून सुवर्णपदक जिंकले. गेल्या वर्षापासून अनमोलने सातत्याने चांगली कामगिरी केली आहे. डिसेंबरमध्ये झालेल्या गुवाहाटी मास्टर्स सुपर १०० स्पर्धेत ती उपविजेती राहिली. तिने गेल्या वर्षी बेल्जियम आणि पोलिश आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विजेतेपद जिंकले.

### रोसारियो चॅलेंजरच्या उपांत्यपूर्वमध्ये सुमित नागल

**नवी दिल्ली :** भारतीय टेनिसपटू सुमित नागलने स्थानिक खेळाडू रेन्झो ऑलिव्होच्या खडतर आव्हानावर मात करून अर्जेंटिनाच्या रोसारियो येथे सुरू असलेल्या २०२५ रोसारियो चॅलेंजरच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. स्पर्धेत आठव्या क्रमांकावर असलेल्या नागलने सोमवारी ऑलिव्होवर ५-७, ६-१, ६-० असा विजय मिळवण्यासाठी त्याच्या कणखरपणाचे आणि संयमाचे उत्तम प्रदर्शन केले. २७ वर्षीय भारतीय खेळाडूचा पुढील सामना चायनीज तैपेईच्या त्सेंग चुन-हसिन आणि बोलिव्हियाच्या ह्यूगो डेलियन यांच्यातील सामन्यातील विजेत्याशी होईल.

### सूर्यकुमारही रणजी चषकामध्ये खेळणार

**नवी दिल्ली :** भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव २०२४-२५च्या रणजी चषकाच्या सामन्यात मुंबईकडून खेळेल. त्याच्याशिवाय शिवम दुबेदेखील खेळताना दिसतील. दोन्ही खेळाडूंना उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यासाठी मुंबईच्या १८ सदस्यीय संघात समाविष्ट करण्यात आले आहे. दोघांनीही या स्पर्धेच्या हंगामात प्रत्येकी एक सामना खेळला आहे. ४२ वेळा विजेता राहिलेल्या मुंबईचा सामना उपांत्यपूर्व फेरीत हरयाणाशी होईल. हा सामना ८ फेब्रुवारीपासून चौधरी बन्सीलाल क्रिकेट स्टेडियम, लाहली येथे खेळला जाईल. दरम्यान, रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल आणि ऋषभ पंत यांनीही या हंगामात रणजी ट्रॉफी खेळली.ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्राविरुद्धच्या रणजी ट्रॉफीच्या पहिल्या टप्प्यातील सामन्यात सूर्या संघाचा भाग होता. महाराष्ट्राविरुद्धच्या सामन्यात सूर्याला पहिल्या डावात फक्त ७ धावा करता आल्या आणि दुसऱ्या डावात तो फलंदाजीला आला नाही. तर, दुबे जम्मू आणि काश्मीर विरुद्ध खेळल्या गेलेल्या सामन्याचा भाग होता. या सामन्यात भारताचा कसोटी आणि एकदिवसीय कर्णधार रोहित शर्मा आणि सलामीवीर यशस्वी जयस्वाल देखील उपस्थित होते. मुंबई संघाने हा सामना गमावला.

### सॅमसनच्या खराब कामगिरीवर अश्विन चिंतित

**नवी दिल्ली :** भारताचा माजी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनने टी-२० चा तडाखेबंद फलंदाज संजू सॅमसनच्या खराब फॉर्मबद्दल चिंता व्यक्त केली. जर त्याला सध्याच्या कठीण परिस्थितीतून बाहेर पडण्याचा मार्ग सापडला नाही तर तो नैराश्यात जाण्याचा इशारा अश्विनने दिला आहे. उजव्या हाताच्या बोटाला फ्रॅक्चर झाल्यामुळे महिनाभर बाहेर असलेला ३० वर्षीय सॅमसन इंग्लंडविरुद्धच्या नुकत्याच संपलेल्या पाच सामन्यांच्या मालिकेत फक्त ५१ धावा करू शकला. या काळात तो इंग्लंडच्या वेगवान आणि शॉर्ट पिच चेंडूंविरुद्ध संघर्ष करताना दिसला. त्याच्याविषयी अश्विन म्हणाला, जर संजू फलंदाज म्हणून अशाच प्रकारे बाद होत राहिला तर नकारात्मकता त्याच्यावर वरचढ ठरू शकते. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सातत्याने संघर्ष करणाऱ्या सॅमसनला अश्विनने सल्ला दिला की, त्याच्या अवचेतन मनात कोणत्याही शंका येऊ नयेत. या संदर्भात, त्याने अलिकडेच झालेल्या बीसीसीआय पुरस्कार सोहळ्यात सचिन तेंडुलकरने दिलेल्या सल्ल्याचा उल्लेख केला. सचिन तेंडुलकर म्हणाला होता की, कोणत्याही प्रकारच्या शंका तुमच्या अवचेतन मनात येऊ देऊ नका कारण जर असे झाले तर फलंदाजी करणे खूप कठीण होईल.

### जलतरण स्पर्धेत कर्नाटकचे वर्चस्व

**हल्दवानी :** कर्नाटकचे स्टार जलतरणपटू श्रीहरी नटराज आणि धिनीधी देसिंगू यांनी मंगळवारी ३८ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रत्येकी नऊ सुवर्णपदकांसह आपल्या मोहिमेचा शेवट केला. या खेळात कर्नाटकचे वर्चस्व कायम ठेवत क्रीडा स्पर्धेतील जलतरण स्पर्धेत कर्नाटकने २२ पदके जिंकली. चौदा वर्षीय देसिंगूने महिलांच्या १०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत ५७.३४ सेकंदांच्या विक्रमी वेळेसह सुवर्ण पदक जिंकले. तिने २०२३ च्या गोव्यात नोंदवलेला ५७.८७ सेकंदांचा तिचा मागील राष्ट्रीय विक्रम मोडला. नटराजने पुरुषांच्या १०० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत ५०.६५ सेकंद वेळेसह विजय मिळवला.

# इंग्लंडविरुद्ध नियोजन आवश्यक राहील

### उपकर्णधार शुभमन गिलने साधला संवाद





भारतीय खेळाडू क्षेत्ररक्षणाचा सराव करताना

◆ **नागपूर, ४ फेब्रुवारी**

सध्याचा भारतीय संघ समतोल आहे, याबद्दल शंका नाही. परंतु इंग्लंड संघाशी कमकुवत समजून चालणार नाही. गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी होणारा सामना जिंकायचा असेल तर उत्तम नियोजन आवश्यक राहील, असे प्रतिपादन भारतीय संघाचा उपकर्णधार शुभमन गिल याने केले. सरावानंतर पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना तो उत्तरे देत होता.

अनुभवी खेळाडूंनी आखून दिलेल्या नियोजनानुसार कृती करावी लागेल, असे त्याने सांगितले. तब्बल ६ वर्षानंतर नागपुरातील जामठा स्टेडियमवर भारत आणि इंग्लंड यांच्यात गुरुवार, ६ फेब्रुवारी रोजी एकदिवसीय सामना होत आहे. भारतीय क्रिकेट संघाने आज दुपारी १ ते ४ दरम्यान सराव केला. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत शुभमनने पत्रकारांशी मनमोकळ्या गप्पा केल्या.

सामना दिवस-रात्र खेळला जाणार आहे. नागपूरची धावपट्टी रात्री मंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे चेंडू हळू येईल, असे तो म्हणाला. नागपूरचा रणजी खेळाडू करुण नायरच्या संघातील निवडीविषयी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याचे त्याने टाळले. करुण नायर चांगला खेळाडू आहे, याबद्दल दुमत नाही. परंतु सध्याचा भारतीय संघ समतोल आहे. त्यामुळे कुणाला वगळायचे, हा मोठा प्रश्न आहे. निवड समिती याबद्दल निर्णय घेईल, असेही तो म्हणाला.

**भारतीय संघाचा कसून सराव**

मंगळवारी दुपारी भारतीय संघातील खेळाडू विराट कोहली, रोहित शर्मा, हार्दिक पांड्या, अर्शदीप सिंग, ऋषभ पंत, यशस्वी जयस्वाल यांनी फलंदाजीचा सराव केला. जिंकण्याच्याच इराद्याने मैदानात उतरायचे, हा खेळाडूंचा उद्देश सरावादरम्यान दिसला. सरावातही यशस्वी जयस्वालने जोरदार फटकेबाजी केली. (तभा वृत्तसेवा)

## भारत-पाकिस्तान लढतीसाठी दीड लाख लोक रांगेत

### तासाभरात संपली सामन्याची तिकिटे

**चॅम्पियन्स चषक २०२५**



◆ **नवी दिल्ली, ४ फेब्रुवारी**

२३ फेब्रुवारी रोजी चॅम्पियन्स चषक २०२५ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना क्रिकेट चाहत्यांसाठी एखाद्या उत्सवापेक्षा कमी नाही. क्रिकेट चाहत्यांसाठी हा जणू महाकुंभ असतो. तिकिटे विक्रीसाठी खुली होताच दुबईतील या ऐतिहासिक सामन्याची तिकिटे अवघ्या एका तासात संपली. एवढेच नाही तर या सामन्याची तिकिटे खरेदी करण्यासाठी दीड लाखांहून अधिक चाहते रांगेत उभे होते.

भारत-पाकिस्तान सामना नेहमीच क्रिकेट विश्वात एक ऐतिहासिक आणि रोमांचक वळण घेऊन येतो. विशेषतः चॅम्पियन्स चषकामध्ये या सामन्याचे महत्त्व आणखी वाढले आहे. चाहते बऱ्याच दिवसांपासून या सामन्याची वाट पाहत होते आणि तिकीट विक्री सुरू होताच चाहत्यांनी अक्षरशः उड्या मारल्या. तिकिटांची प्रचंड मागणी असल्याने तिकिटे पोर्टलवर उपलब्ध झाल्यानंतर काही मिनिटांतच विकली गेली. जेव्हा भारत-पाकिस्तान सामन्याची तिकिटे पोर्टलवर प्रसिद्ध झाली तेव्हा दीड लाखांहून अधिक लोक तिकिटे खरेदी करण्यासाठी रांगेत उभे होते. यावरून क्रिकेटप्रेमींना हा सामना पाहण्याची किती उत्सुकता होती हे स्पष्ट होते. वाट पाहण्याचा कालावधी एक तासाहून अधिक काळ चालला, पण अखेर सर्व तिकिटे विकली गेली. (वृत्तसंस्था)

# १०० वी कसोटी खेळून निवृत्त होणार दिमुथ करुणारत्ने

◆ **गॅले, ४ फेब्रुवारी**

श्रीलंकेचा माजी कर्णधार दिमुथ करुणारत्ने त्याचा १०० वा कसोटी सामना खेळल्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. गुरुवारपासून येथे सुरू होणारा श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील दुसरा आणि शेवटचा कसोटी सामना हा त्याचा १०० वा कसोटी सामना असेल.

श्रीलंकेच्या सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक असलेल्या ३६ वर्षीय करुणारत्नेने त्याच्या जवळजवळ १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दीत आतापर्यंत ९९ कसोटी सामन्यांमध्ये ४० च्या सरासरीने ७,१७२ धावा केल्या आहेत, ज्यात १६ शतके आणि ३४ अर्धशतके आहेत. त्याने ५० एकदिवसीय सामन्यांमध्ये एक शतक आणि ११ अर्धशतकांसह १,३१६ धावा केल्या आहेत.

कसोटी खेळाडूसाठी वर्षातून फक्त चार कसोटी खेळणे आणि स्वतःचा फॉर्म कायम ठेवण्यासाठी स्वतःला प्रेरित ठेवणे खूप कठीण आहे, असे २०१२ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणाऱ्या करुणारत्नेने सांगितले. जागतिक कसोटी विश्वचषक सुरू झाल्यापासून गेल्या दोन-तीन वर्षांत, आम्ही खूप कमी द्विपक्षीय मालिका खेळल्या आहेत. माझा सध्याचा फॉर्म, माझे १०० कसोटी सामने पूर्ण करणे आणि जागतिक क्रीडा स्पर्धा (२०२३-२५) चे सध्याचे चक्र पूर्ण होणे ही देखील इतर कारणे आहेत. मला वाटले की निवृत्तीची हीच योग्य वेळ आहे.

करुणारत्ने आता त्याच्या कुटुंबासह ऑस्ट्रेलियात स्थायिक होण्याची योजना आखत आहे. तो म्हणाला, आतापर्यंत मी जे काही साध्य केले आहे त्यावर मी समाधानी आहे. (वृत्तसंस्था)

### चेन्नई ओपनमधून रामनाथन, करण आणि मुकुंद बाहेर

**चेन्नई :** रामकुमार रामनाथन, करण सिंग आणि मुकुंद शशिकुमार या भारतीय त्रिकुटासह तिसऱ्या मानांकित दुजे अजडुकोविचला मंगळवारी येथे चेन्नई ओपन एटीपी चॅलेंजरच्या पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत पराभव पत्करावा लागला. अव्वल मानांकित बिली हॅरिस आणि लॉयड हॅरिस यांनी त्यांच्या मोहिमेची विजयी सुरुवात केली. स्वीडनच्या एलियास यमेरने जागतिक क्रमवारीत १५८ व्या क्रमांकावर असलेल्या अजडुकोविचविरुद्ध निराशाजनक कामगिरी केली. जागतिक ३३२ व्या क्रमांकावर असलेल्या यमेरने ६-२, ६-७, ६-२ असा विजय मिळवला. तथापि, एसडीएटी टेनिस स्टेडियमवर भारतीय एकेरी खेळाडूंसाठी हा दिवस चांगला नव्हता कारण मुख्य ड्रॉमधील तिन्ही खेळाडू पहिल्या फेरीतच बाहेर पडले.

# प्रज्ञानंदचे मायदेशात जल्लोषात स्वागत

### टाटा स्टील बुद्धिबळ विजेता



◆ **चेन्नई, ४ फेब्रुवारी**

नेदरलँण्ड्समध्ये टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धा जिंकणारा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदचे मंगळवारी मायभूमीत परतल्यानंतर जोरदार स्वागत करण्यात आले.

तमिळनाडू सरकार आणि राष्ट्रीय महासंघाचे अधिकारी तसेच शेकडो चाहते त्याचे स्वागत करण्यासाठी विमानतळावर उपस्थित होते.

चेन्नई येथील १९ वर्षीय प्रज्ञानंदने रविवारी टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. त्याने भारताचाच माजी विश्वविजेता डी. गुकेशचा पराभव केला आणि प्रथमच टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. हा त्याच्या कारकीर्दीतील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय आहे.

माध्यमांशी बोलताना प्रज्ञानंद म्हणाला, मी ही स्पर्धा जिंकू शकलो याचा मला खूप आनंद आहे. भारतातील तामिळनाडूतील दोन खेळाडूंमध्ये टायब्रेकर खेळला गेला हे पाहून खरोखर आनंद झाला. आम्ही दोघांनीही चांगली कामगिरी केली. गुकेशने चांगले खेळल्याबद्दल डी. गुकेशचेही अभिनंदन केले.

टाटा स्टील बुद्धिबळाचे विजेतेपद पटकावणारा प्रज्ञानंद हा विश्वनाथन् आनंदनंतर दुसरा भारतीय खेळाडू ठरला. आनंद २००३, २००४ आणि २००६ मध्ये या स्पर्धेचा विजेता होता. तेव्हा ती कोरस बुद्धिबळ स्पर्धा म्हणून ओळखली जात असे. (वृत्तसंस्था)

# महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील परत करणार गदा

### पंचांच्या निर्णयावरून वाद पेटला

◆ **मुंबई, ४ फेब्रुवारी**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेतील पंचांच्या निर्णय वादावरून दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी आता आपला महाराष्ट्र केसरीच्या दोन्ही गदा येत्या २ दिवसात कुस्तीगीर परिषदेला परत देण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

दुहेरी महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्यावर २००९ साली महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत अन्याय झाला होता अशी पै. काका पवार यांनी एका वृत्तवाहिनीच्या शोमध्ये कबुली दिली. यानंतर चंद्रहार पाटील यांनी आपल्या दोन वेळच्या महाराष्ट्र केसरीच्या गदा महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेला परत देण्याचा निर्णय घेतला आहे.

आपल्याला ठरवून तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होऊ दिले नसेल हे आता सिद्ध होत आहे. अशा पद्धतीने कुस्ती स्पर्धांमध्ये अनेक वर्षांपासून राजकारण होत आहे. त्याचा फटका पैलवानांना बसतो आहे.

त्यामुळे आपण महाराष्ट्र केसरीच्या दोन जिंकलेल्या गदा परत करणार असल्याचे चंद्रहार पाटील यांनी नुकतेच सांगितले. पंचांच्या निर्णयामुळे आपल्याला पराभवाला समोर जावे लागले. त्यामुळे पंच कमिटीने माझ्या पराभवाच्या गोष्टी मान्य केल्या. तर त्याचं मला समाधान वाटेल, असेही चंद्रहार पाटील म्हणाले. पंचांच्या एका निर्णयामुळे शिवराज राक्षेचं आयुष्य खराब झाले, असा आरोपही चंद्रहार पाटील यांनी केला. (वृत्तसंस्था)

# राज्य युवा पुरस्कारासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज आमंत्रित

◆ **सोलापूर, ४ फेब्रुवारी**

सन २०२३-२४ या वर्षात राज्य स्तरावर राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागांच्या क्षेत्रीय विभागस्तरांनुसार प्रत्येक विभागातील १ युवक, १ युवती व नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे स्वरूप युवक-युवती यांना रोख ५० हजार रुपये, तर संस्थेस १ लाख रुपये तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे.

राज्य युवा पुरस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणाऱ्या पेन्नवीण गत तीन वर्षांमध्ये केलेल्या कामगिरीचे मूल्यांकन विचारात घेण्यात येणार असून, राज्य युवा पुरस्कारासाठी अर्ज १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय किंवा संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. राज्यातील जास्तीत जास्त युवा विकासाचे कार्य करणाऱ्या संस्था यांनी पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे आयुक्त यांनी केले आहे. (तभा वृत्तसेवा)

# खेळाडूंना प्रोत्साहनासाठी मुख्यमंत्री धामी स्टेडियममध्ये

### १० हजार खेळाडू, ३५ क्रीडा प्रकार, ३६७४ पदके



खेळाडूसोबत संवाद साधून भोजन करताना मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी

◆ **डेहराडून, ४ फेब्रुवारी**

डेहराडून महाराणा प्रताप क्रीडा स्टेडियममध्ये राष्ट्रीय खेळांचे विविध क्रीडा स्पर्धा सुरू आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी स्टेडियमला भेट दिली आणि खेळाडूंसोबत संवाद साधून भोजनाचा आनंद घेतला.

उत्तराखंडने ३८ व्या राष्ट्रीय खेळांचे आयोजन करून इतिहास घडवला आहे. देशभरातील सुमारे दहा हजार खेळाडू ३५ क्रीडा प्रकारांमध्ये ३६७४ पदकांसाठी स्पर्धा करत आहेत. दरम्यान, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी पोहोचले आणि त्यांनी खेळाडूंशी संवाद साधला.

३८ व्या राष्ट्रीय खेळांमध्ये, उत्तराखंडने पाच दिवस चाललेल्या वुशू मार्शल आर्ट्स स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून एका सुवर्णपदकासह १२ पदके जिंकून सर्व विक्रम मोडले आहेत. राज्याच्या निर्मितीनंतर आता सहा राष्ट्रीय खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या खेळात राज्यातील खेळाडूंना इतकी पदके मिळाली आहेत असे कधीच घडले नाही.

राष्ट्रीय खेळ सुरू होताच, राज्यातील खेळाडू इतर खेळांच्या तुलनेत, विशेषतः वुशूमध्ये पदकतालिकेत आघाडीवर राहिले. उत्तराखंडची ज्योती वर्मने कांस्यपदक जिंकून राज्याला पहिले पदक मिळवून दिले. यानंतर, अचीम तापस्ने सुवर्णपदक जिंकल्याने खेळाडूंचा उत्साह द्विगुणित झाला. एलाम इटाली चानू, फॅब्रिस देवी आणि हर्षित शर्मा यांनी रौप्य पदके जिंकून राज्याला राष्ट्रीय पदक तालिकेत पहिल्या ११ मध्ये स्थान मिळवून दिले. (वृत्तसंस्था)

# योगासन स्पर्धेत महाराष्ट्राच्या महिलांना सुवर्ण

### रुपेश सांगेने पटकावले रौप्यपदक



◆ **अल्मोडा, ४ फेब्रुवारी**

महाराष्ट्राच्या महिलांनी उत्कृष्ट समन्वय दाखवीत ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील योगासन सांघिक सुवर्णपदकाची बाजी मारली. सुवर्णासह एक रौप्य व एक कांस्यपदक देखील जिंकले.

हेमवतीनंदन बहुगुणा स्टेडियमवर आयोजित करण्यात आलेल्या योगासन स्पर्धेमध्ये सुहानी गिरीपुंजे, छकुली सेलोकर, तन्वी रेडीज, रचना अंबुलकर पूर्वा किनरे यांनी ११२.१३ गुण नोंदवत सुवर्णपदक जिंकले. या खेळाडूंनी त्यांना दिलेल्या मर्यादित वेळेमध्ये अतिशय विलोभनीय रचना सादर केल्या. त्यामुळे परीक्षकांनी त्यांना सर्वोत्तम गुण बहाल केले. प्रेक्षकांनी त्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन केले. पुरुषांच्या कलात्मक वैयक्तिक विभागात सोलापूरचा रुपेश सांगे याने रौप्य पदक पटकावले. अटीतटीच्या लढतीत त्याने देखील सुरेख रचना सादर केल्या होत्या. अखेर त्याला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. रुपेश सांगे याने ११७.८८ गुणांची कमाई केली. सुहानीने पारंपरिक योगासनामध्ये कांस्यपदक पटकावीत आपल्या नावावर आणखी एक पदक नोंदविले. नागपूरच्या या खेळाडूने या क्रीडा प्रकारात ६०.५८ गुणांची नोंद केली. (वृत्तसंस्था)

# बॅडमिंटन स्पर्धेत मिश्र दुहेरीत रौप्य



◆ **देहराडून, ४ फेब्रुवारी**

क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या जोडीला रुपेरी यशावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या दीप रामभिया व अक्षया वारंग या जोडीने बॅडमिंटनमधील मिश्र दुहेरीत के. सतीश कुमार व आद्या वरीयथ या तामिळनाडूच्या अग्रमानांकित जोडीला चिवट लढत दिली. मात्र, हा सामना तामिळनाडूच्या जोडीने २१-११, २०-२२, २१-८ असा जिंकला.

परेड ग्राऊंडमधील हॉलमध्ये संपलेल्या मिश्र दुहेरी अंतिम सामन्यात तामिळनाडूच्या सतीश व आद्या या जोडीने आजपर्यंत अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अव्वल दर्जाची कामगिरी केली असल्यामुळे त्यांचे पारडे जड मानले जात होते. दीप व अक्षया हे प्रथमच या स्पर्धेत एकत्र खेळत होते. तरीही त्यांनी अंतिम फेरीत स्थान मिळविताना अतिशय चांगला खेळ केला. महाराष्ट्राच्या जोडीचे राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील पहिलेच पदक आहे. (वृत्तसंस्था)

# वॉटरपोलोत महाराष्ट्राच्या दोन्ही संघांना रौप्य

### महिला गटात केरळ, पुरुष गटात सर्व्हिसेसला सुवर्ण



◆ **हल्दवानी, ४ फेब्रुवारी**

गतविजेत्या महाराष्ट्राच्या पुरुष वॉटरपोलो संघाला ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अगदी अखेरच्या क्षणी सुवर्णपदकाने हुलकावणी दिली अन् त्यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. महाराष्ट्राच्या महिला संघाने देखील रौप्य पदक पटकावले. पुरुष गटात सर्व्हिसेस संघाने सुवर्णपदकाला गवसणी घातली, तर महिला गटात केरळने सुवर्णपदकावर नाव कोरले.

पुरुष गटाची सुवर्ण पदकाची लढत अतिशय थरारक झाली. एक-एक गोलसाठी रंगलेल्या पाठशिवणीच्या खेळात मध्यंतरापर्यंत महाराष्ट्राकडे ६-५ अशी निसटती आघाडी होती. मात्र, त्यानंतर सर्व्हिसेसला मिळालेल्या दोन पेनल्टीने महाराष्ट्राचा घात केला. तब्बल १४ मिनिटांनंतर सर्व्हिसेसने प्रथमच ८-८ बरोबरी साधली. मग महाराष्ट्राने पुन्हा ९-८ अशी आघाडी मिळविली. त्यानंतर सर्व्हिसेसने अखेरच्या मिनिटाच्या खेळ शिल्लक असताना महाराष्ट्राला ९-९ असे गाठल्याने लढतीत प्रचंड दबाव निर्माण झाला. नेमकी याच वेळी सर्व्हिसेसला पेनल्टी मिळाली अन् या संधीचे सोने करीत त्यांनी १०-९ फरकाने सुवर्णपदकावर नाव कोरले.

महिला गटाच्या अंतिम लढतीत केरळच्या बलाढ्य संघापुढे महाराष्ट्र संघाची दमछाक झाली. केरळने सुरेख पासेस आणि भन्नाट गोल करत प्रारंभीच आघाडी घेतली. हाफ टाईमपर्यंतच केरळचे ८-४ अशी मोठी आघाडी घेतली होती. त्यानंतर वेगळे काही घडले नाही. केरळच्या गोलरक्षकाने महाराष्ट्राचे अनेक गोल अडवले. परिणामी शेवटी महाराष्ट्राला ७-११ गोल फरकाने पराभव पत्करावा लागल्याने रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. (वृत्तसंस्था)

## संक्षिप्त वृत्त



### विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयास नॅककडून बी ग्रेड

**टेंभुर्णी, दि. ४ फेब्रुवारी-**

श्री. विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव (टे.) तालुका माढा संचलित विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी या म हाविद्यालयाला नॅक पुनर्मूल्यांकनात बी++ ग्रेड मिळाल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र कदम आणि आयक्यूएसी समन्वयक डॉ. नेताजी कोकाटे यांनी दिली. बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद या केंद्रिय समितीकडून महाविद्यालयाच्या दुसऱ्या पुनर्मूल्यांकनासाठी २३ व २४ जानेवारी रोजी त्रिसदस्यीय समितीने विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालयास भेट दिली. यावेळी अभ्यासक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सोयी- सुविधा, विद्यार्थी सहाय्यता, व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्य आणि विविध उपक्रम आदी घटकांच्या आधारे झालेल्या मूल्यांकनात महाविद्यालयाने २.९४ हा सीजीपीए (उच्च) प्राप्त केला आहे. महाविद्यालयास बी ++ मानांकन प्राप्त झाल्यानंतर प्राचार्य डॉ. महेंद्र कदम म्हणाले की, या यशासाठी श्री विठ्ठल शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे आणि सर्व पदाधिकारी यांचे मार्गदर्शन झाले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, सर्व विद्यार्थी, माजी विद्यार्थी व पालक यांचे सहकार्य झाल्यामुळेच महाविद्यालयास हे यश मिळवता आले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार बबनराव शिंदे, माजी आमदार संजयमामा शिंदे, संस्थेचे अध्यक्ष विक्रमसिंह शिंदे, रणजीतसिंह शिंदे तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी व टेंभुर्णी येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी महाविद्यालयाचे प्राचार्य महेंद्र कदम, नॅक समन्वयक डॉ.नेताजी कोकाटे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.



### कर्मवीर सार्वजनिक वाचनालयात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे जयंती साजरी

**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**


छत्रपती शिवाजी महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्याची प्रेरणा घेवून बार्शी सारख्या ग्रामीण भागात आपल्या काही निवडक सहकाऱ्यांना सोबत घेवून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी क्रांती निर्माण केली, मामांच्या असीम त्यागामुळेच शैक्षणिक क्षेत्रात बार्शीचे नाव महाराष्ट्राच्या नकाशावर सोनेरी अक्षराने कोरले गेलेले आहे, असे विचार वृक्षमित्र सुनिल फल्ले यांनी व्यक्त केले. येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयामध्ये. बार्शी तालुक्यात शिक्षणाची गंगा घरोघरी पोहचविणारे थोर शिक्षण महर्षी कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे यांची १२२ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्यवाह मधुकांत ठोकळ होते. यावेळी ग्रंथालयाचे उपाध्यक्ष धैर्यशील देशमुख, समाजसेवक सुहास सुतार, चंद्रकांत वडेकर, सतीश पाचकुडवे, उदय पोतदार, प्रेम अग्रवाल, राहुल लोंढे, केतन चवरे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. प्रथमता प्रमुख मान्यवरांचे हस्ते कर्मवीर मामासाहेब यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार व्यक्त केले.



### महाकुंभमेळ्यात महेश इंगळे, प्रथमेश इंगळेंचे शाही अमृतस्नान

**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

वसंत पंचमीच्या मंगल पर्वाचे औचित्य साधून महाकुंभमेळ्यातील शेवटचा शाही अमृत स्नानसोहळा उत्तर प्रदेश मधील प्रयागराज येथील 'गंगा यमुना सरस्वती' नद्यांच्या त्रिवेणी संगमावर ब्रह्म मुहूर्त योग साधून लाखो साधुसंतांच्या दिव्य सानिध्यात व करोडो भाविकांच्या उपस्थितीत शाही स्नान मोठ्या भक्ती भावात पार पडला. श्री तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे विश्वस्त अध्यक्ष महेश इंगळे, प्रथमेश इंगळे मित्र परिवारांच्या सदस्यांनी हजेरी लावली शाही स्नान मध्ये सहभाग घेतला. हरिद्वार येथील श्री पंच दशनाम जुना आखाड्याचे स्वरयोग पीठाधिश्वर श्री.श्री.श्री.१००८ महामंडलेश्वर स्वामी चरणश्रित गिरी महाराज व आत्मवंदना जी गिरी यांच्या दिव्य सान्निध्यात शाही स्नान झाले. यावेळी संतोष पराणे, अंकुश केत, श्रीकांत झिपरे, बाळासाहेब एकबोटे, सुनिल पवार, सुरेश वाले, श्रीशैल गवंडी, संजय पवार, मनोज इंगुले, सागर गोंडाळ, दर्शन घाटगे, ज्ञानेश्वर भोसले, तुषार मोरे, धनराज स्वामी, स्वामीनाथ मुसळे आदी मित्र परिवार सदस्य यांनी गिरी महाराजांच्या आखाडा नियोजनानुसार विविध धार्मिक कार्यक्रमात सहभाग घेतला.



### 'आदर्श'मध्ये कॅन्सरविषयक मार्गदर्शन

**कुर्डूवाडी, दि. ४ फेब्रुवारी-**


अहिल्यानगर येथील आरंभ पॅलेटिव्ह कॅन्सर केअर सेंटर व आनंद साधना प्रकल्प कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमानाने आदर्श पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांना कॅन्सरविषयक जनजागृती करण्यात आली. यावेळी आरंभ कॅन्सर केअर सेंटरचे प्रेसिडेंट प्रदीप काकडे, आनंद साधना प्रकल्पाचे अजित कुलकर्णी, हनुमंत कदम उपस्थित होते. अध्यक्षस्थानी डॉ. माढेकर व डॉ. विवेकानंद पाटील होते.

# भक्तीसागर येथे दिंडी धारकांसाठी प्लॉटस्‌ची नोंदणी सुरु

## आतापर्यंत १६५ दिंड्याची नोंदणी; प्रांताधिकारी सचिन इथापे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी -**

माघ यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरा होत आहे. माघ यात्रेत येणाऱ्या दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर (६५ एकर) येथे जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या ठिकाणी मोफत प्लॉटस भाविकांना तंबू, राहुट्या उभारुन वास्तव्य करण्यासाठी देण्यात येत असून, पालखी, दिंडी धारकांसाठी प्लॉटसची नोंदणी सुरु आहे. दि. ४ फेब्रुवारी पर्यंत १६५ दिंड्याची नोंदणी करण्यात आली असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.



माघ यात्रेला येणाऱ्या पालख्या, दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर (६५ एकर) येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, अन्नपदार्थ शिजवण्यासाठी गॅस वितरण, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी एकूण ४९७ प्लॉट्स असून त्यापैकी वापरायोग्य ४५० प्लॉटस आहेत. हे प्लॉटस भाविकांना निवाऱ्यासाठी दिले जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते.भाविकांना प्लॉटस वाटप करणे, अडीअडचणी सोडवणे, आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व त्यावर नियुक्त सेक्टर मॅनेजर व त्याचे अधिनस्त कर्मचारी कार्यान्वित असणार आहेत.

दिंडी, पालखी समवेत येणाऱ्या भाविकांना भक्तीसागर (६५ एकर) येथे प्लॉटसचे वाटप सुरु असून, या ठिकाणी भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार आहेत. आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार विजय जाधव (मो.क्र. ८२७५२०२१५५), सुधाकर धाईंजे (मो. क्र. ९७६७२४८२१०), तसेच सहाय्यक प्रमोद खंडागळे (मो.क्र.९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही प्रांताधिकारी श्री.इथापे यांनी केले आहे.



### श्री विठ्ठल-रूक्मिणी मंदिरास दोन लाख ५१ हजारांची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समि तीस मंगला मारुती पाटील राहणार ठाणे यांनी दोन लाख ५१ हजार रूपयांची देणगी धनादेश स्वरूपात दिल्याची माहिती व्यवस्थापक म नोज श्रोत्री यांनी दिली.

सदरची देणगी देणगीदार यांचे पती मारुती पाटील यांनी आज श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरात उपस्थित राहून दिली आहे. त्याबद्दल देणगीदार भाविकांस श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांनी सन्मान केला. पाटील कुटुंब हे श्री विठ्ठल रूक्मिणीमातेचे निस्सिम भक्त आहेत. मंगला पाटील यांची श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चरणी देणगी अर्पण करण्याची इच्छा होती. परंतु त्यांना काही कारणास्तव उपस्थित राहता आले नाही. मात्र, त्यांनी श्रींच्या चरणी देणगी अर्पण करून आपली इच्छा पूर्ण केली आहे. तसेच श्री विठ्ठल मंदिर बघवाडा, गुजरात यांचेकडून देखील ऑनलाईन पध्दतीने एक लक्ष रूपयांची देणगी प्राप्त झाली आहे.

सद्यस्थितीत, माघ यात्रेचा कालावधी सुरू झाला आहे. त्यामुळे भाविकांकडून देणगी प्राप्त करून घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची मदत घेण्यात येणार असून, जादा स्टॉल उभारण्यात करण्यात येत आहे. याशिवाय, ऑनलाईन देणगीसाठी आरटीजीएस, क्यूआर कोड, संकेतस्थळ व मोबाईल पची देखील सुविधा आहे. इच्छुक भाविकांना देणगी द्यावयाची असल्यास, त्यांनी श्री संत तुकाराम भवन येथील देणगी कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने यावेळी श्री.श्रोत्री यांनी केले.

# शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांचा राजीनामा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सोलापुर जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे यांनी पदाचा राजीनामा दिल्याचे जाहिर पत्रकाद्वारे कळविले आहे . त्यांच्या ९२ वर्षीय वृद्ध मातेची सेवा करण्यासाठी पक्ष कार्यास वेळ देऊ शकणार नाही असे पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे . राजीनामा पत्र माहिती साठी सोलापुर जिल्हा प्रमुख अमर पाटील सोलापुर जिल्हा संपर्क प्रमुख अनिल कोकीळ उमेश सारंग यांना सादर केल्याचे सुनिल कटारे यांनी सांगितले .



सुनिल कटारे हे अक्कलकोट तालुका माजी शिवसेना तालुका प्रमुख नगरपालिका शिक्षण मंडळ सदस्य व्यापारी असोसिएशन उपाध्यक्ष शिवबसव मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष वीर सावरकर तरुण मंडळ अध्यक्ष आदि विविध पदावर कार्य केले आहे . कारंजा चौक याचे बेकायदेशिर नामांतर प्रकरण हाणून पाडण्यात शिवसेनेचे मोठे योगदान होते . तीव्र पाणी टंचाई काळात पाणी आकारासाठी असलेले मीटर बंद करण्यात सुनिल कटारे यांचा मोठा पुढाकार होता . पोनि जितेंद्र कोळी च्या बदलीसाठी शिवसेनेच्या उपोषणात कटारे सहभागी होते . अलीकडे ग्राम ीण रुग्णालयात सोयी सुविधा पुरविणे विज जोडणी अवश्यक कर्मचारी नेमणुक शवविच्छेद न कर्मचारी नेमणे कर्मचारी सेवा पुस्तक भरणे आदि मुद्दे व पर्यटन विकास महामंडळाचे पर्यटक निवास दुरावस्था बदल कटारे यांनी मोठा पाठपुरावा व पत्रव्यवहार सुरु केला होता . या मुळे हे दोन्ही प्रश्न मार्गी लागले. शिवसेनेचे वामनराव महाडीक रामभाऊ भंकाळ बाबुराव वडणे साईनाथ अभंगराव बाळासाहेब शिंदे शिवाजी महाराज पिसे पुरुषोत्तम बरडे आदि शिवसेनेच्या वरिष्ठ नेते पदाधिकारी यांच्या समवेत सुनिल कटारे यांनी कामकाज पाहिले आहे . म तेच्या सेवेसाठी शिवसेना पक्ष कार्यासाठी वेळ देऊ शकत नसल्याचे राजीनामा पत्रात नमुद करून पत्र प्रसिद्धीसाठी सादर केले आहे.

# रोजगार निर्मिती, औद्योगिक विकास, आर्थिक प्रगतीवर भर

## आ. अभिजित पाटील : मोडनिंब येथील प्रस्तावित एमआयडीसी जागेची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ४ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता.माढा) येथे प्रस्तावित एम आयडीसी जागेची अधिकाऱ्यांसोबत पाहणी केली असून, लवकरच हा महत्वाचा प्रकल्प मार्गी लागणार असल्याचे आमदार अभिजित पाटील यांनी सांगितले.




मोडनिंब येथे प्रस्तावित एमआयडीसी जागेची पाहणी केली, याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना आमदार पाटील म्हणाले की, मोडनिंब येथे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती, औद्योगिक विकास आणि आर्थिक प्रगतीसाठी हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावेल. सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ठोस प्रयत्नांमुळे हा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात येणार असल्याचे सांगितले. यावेळी भारत शिंदे, कुरण गिड्डे, विशाल मेहता,ड. विजयसिंह गिड्डे,स्वप्निल मोरे, निलेश पाटील, सहकारी तेजस गायकवाड, अविनाश सरडे, शुभम बोबडे, राजाभाऊ भांगिरे, राहुल केदार,सौदागर जाधव, दिपक सुर्वे,प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.मोडनिंब एमआयडीसीसाठी प्राधिकरण करण्यात येणारे ३६५ एकर शेत जमिनीची मोजणी करण्यात येणार असल्याचे लेखी पत्र संबंधित विभागाला उपअधीक्षक भूमी अभिलेख माढा यांनी कळवले होते. सोमवार पासून या भागातील शेत जमिनीची मोजणी करण्यास सुरुवात केली जाणार असल्याचे संबंधित विभागाने सांगितले होते. गत वर्षी सदर एमआयडीस तत्कालीन उद्योग मंत्री उदय सामंत यांचेकडून मंजुरी मिळाली. प्रशासनाला पुढील कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यानंतर संबंधित शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नावही लावण्यात आले. मात्र या भागातील ज्या शेतकऱ्यांच्या शेतजम ीनी अधिकरणची मोजणी झाली नव्हती व संबंधित शेतकऱ्यांची बैठक आयोजित करून त्यांना प्रति एकर किती मोबदला मिळणार याबाबत प्रशासनाने चर्चा केली नव्हती. मात्र सध्या भूमी अभिलेख विभागा मार्फत मोजणीला सुरुवात असल्यामुळे मोडनिंब व परिसरातील लहान-मोठे उद्योजक व व्यापारी वर्गातून आनंद व्यक्त होत आहे. मोडनिंब हे गाव सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग लगत असून येथे रेल्वे स्टेशन आहे. तसेच लगतच पंढरपूर बार्शी रस्ता आहे. त्यामुळे या भागात येणारे उद्योजकांना कच्चा माल आणण्यासाठी व तयार मालाची वाहतूक करण्यासाठी अतिशय सुलभ असल्यामुळे तसेच या भागातील बाजारपेठ गेले अनेक वर्षांपासून मोडकळीस आलेल्या उभारी मिळण्यासाठी लहान मोठ्या उद्योजकांची आवश्यकता होती. मात्र प्रशासनाच्या या हालचालींमुळे मोडनिंब व परिसरातील व्यापारी, उद्योजक, व बेरोजगार तरुण वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कुरनूर धरणातून आज सुटणार पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

तालुक्याला वरदान लाभलेल्या कुरनूर धरणातून आज बुधवारी दि.५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता चारशे ते साडे सहाशे क्युसेसने पाणी सोडण्याचा निर्णय झाला असून धरणाखालील आठ कोल्हापूर टाईप पाटबंधारे तीस तासात भरून घेतल्या जाणार आहे. या बाबत बोरी नदीकाठच्या शेतकऱ्यांनी विशेषता सतर्क राहण्याची आवाहन पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रकाश बाबा यांनी केले आहे.

कुरनूर धरणातून सदर पाणी रब्बी हंगामासाठी व बोरी नदीकाठच्या गावांना पिण्यासाठी पाणी सोडण्यात येणार आहे. बुधवारी दि.५ फेब्रुवारी रोजी सोडले जाणारा पाणी हा पहिला टप्पा असून दुसरा टप्पा एप्रिल म हिन्यात आणखीन पुन्हा दुसरा टप्पा पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांनी पाणी काटकसरीने वापरावे तसेच शेतकऱ्यांनी सतर्क राहावे, असे आवाहन महसूल व पाटबंधारे विभागाने केले आहे. धरणाम ध्ये सध्या ८४ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे. या पार्श्वभूमीवर पंधरा दिवसांपूर्वी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या उपस्थितीमध्ये कालवा सल्लागार समि तीची बैठक झाली होती.या बैठकीमध्ये बंधारे दुरुस्त करून पाणी सोडण्याचा म णगणी करण्यात आली होती. हे कालवे जलसंधारण व पाटबंधारे विभागाने लक्ष देऊन तातडीने कोल्हापूर टाईप आठ पाटबंधारे दुरुस्त करावेत, अशी सूचना केली होती. पाटबंधारे दुरुस्तीम ुळे पाणी सोडण्याचा निर्णय आठ दिवस लांबणीवर गेला होता. आता सर्व आठ पाटबंधारे दुरुस्ती पूर्ण झालेली असल्याने पहिल्या टप्प्यातील पाणी सोडण्यात येत असल्याची माहिती पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी प्रकाश बाबा यांनी दिली.



# मलगोंडा हॉस्पिटलमध्ये प्रधानमंत्री आयुष्यमान भारत योजना सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

अक्कलकोट येथील मलगोंडा हॉस्पिटलमध्ये प्रधानमंत्री आयुष्मान भारत योजना आणि महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेच्या अंतर्गत कॅन्सर, अस्थिरोग आणि मूत्रविकार यांसारख्या गंभीर आजारांवर पहिल्यांदा म ोफत उपचार सुरू करण्यात आल्याची माहिती डॉ.सुवर्णा मलगोंडा यांनी दिली आहे.





कॅन्सर तज्ञ डॉ. प्रथमेश मलगोंडा आणि डॉ. सुमा मलगोंडा यांच्या रूपाने अक्कलकोट शहर व तालुक्यातील रूग्णासाठी मोठे दिलासादायक व्यवस्था निर्माण झाल्या असून अक्कलकोटात पहिल्यांदा कॅन्सरवर अत्याधुनिक उपचार मोफत सुरू झाला आहे.या योजनेअंतर्गत तोंडाचा, जिभेचा, स्तनाचा, फुफ्फुसाचा, आतड्याचा, गर्भाशयाचा आणि अंडाशयाचा कर्करोग यावर उपचार मोफत दिले जाणार आहेत. तसेच थेरिपी, केमोथेरिपी, हार्मोन थेरपी आणि डे-केअर थेरपी यांसारख्या अत्याधुनिक सेवा देखील रुग्णांना मोफत देण्यात येत आहे.ही योजना ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांसाठी मोठा दिलासा ठरणार असून, महागड्या आजारांवर मोफत सेवा मिळणार आहे.ग्रामीण भागातील रुग्णांना आता मोठ्या शहरांमध्ये जाऊन उपचार घेण्याची गरज भासणार नाही.

# पंढरपुरात ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा

## प्रिव्हेन्टीव्ह चेकअप कॅम्प, ज्येष्ठ नागरिक आयुष्यमान कार्ड नोंदणी अभियान शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा. श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त राजविर राजलक्ष्मी बहुउद्देशिय समाजसेवी चॅरिटेबल ट्रस्ट, पंढरपूर व शिवसेना सोलापूर यांच्या वतीने पंढरपुरमध्ये ज्येष्ठ नागरिक सन्मान सोहळा, प्रिव्हेन्टीव्ह चेकअप कॅम्प, व ज्येष्ठ नागरिक आयुष्यमान कार्ड नोंदणी अभियान शिबीर संपन्न झाले.

ज्येष्ठ नागरिक सन्मान व जेष्ठ नागरिक कार्ड नोंदणी अभियानासोबतच यावेळी आमदार समाधान आवताडे यांचा नागरी सत्कार सोहळा आयोजित केला होता. यावेळी पंढरपूर शहर व परिसरातील एक हजार नागरिकांनी या शिबीराचा लाभ घेतला. यावेळी अंजली समाधान आवताडे, महेशनाना साठे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना बसवंती परिवाराच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लायन्स क्लब आणि शिवसेना महिला आघाडीच्या सोलापूर जिल्हा प्रमुख आरती बसवंती यांनी केले तर आभार शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष वैद्यकीय मदत कक्षाचे ओंकार बसवंती यांनी मानले. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन रवी शेवडे यांनी केले.



यावेळी शिवसेना सोलापूर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख महेश साठे, शिवसेना महिला संपर्क प्रमुख सोलापूर अनिता माळगे, शिवसेना महिला युती प्रियांका परांडे, महायुतीचे राष्ट्रवादी जिल्हाप्रमुख महिला ऋषाली शिंदे, मंगळवेढा व पंढरपूर विधानसभेचे आमदार समाधान आवताडे यांच्या सौभाग्यवती अंजली समाधान आवताडे यांचेसह सुप्रसिद्ध भारुडकार चंदाताई तिवाडी, माजी नगरसेविका कमलताई तोंडे, पत्रकार भगवान वानखेडे, माजी नगरसेवक विवेक परदेशी (लायन्स झोन चेअरमन) माजी नगरसेवक. गणेश अधटराव यांच्या सौभाग्यवती स्मिता अधटराव शिवसेना महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख रुपाली तानाजी मलपे, सोलापूर शिवसेना महिला माढा विधानसभा प्रमुख संगीता पिसे, माळशिरस शिवसेना महिला आघाडी तालुका प्रमुख सोनाली गायकवाड, शिवसेना महिला आघाडी माळशिरस श्रीपुर संघटक नीता शिंदे, उपजिल्हाप्रमुख माळशिरस महिला आघाडी रंजना शिंदे, लायन्स खजिनदार शोभा राजेंद्र गुप्ता, लायन्स सुरेखा कुलकर्णी, शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष वैद्यकीय मदत कक्षाचे ओंकार शिवानंद बसवंती, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख सोलापूर सौ. आरती ओंकार बसवंती, यांचेसह अनेक शिवसैनिक, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### राजराजेश्वरी शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेचे स्नेहसंमेलन हुतात्मा स्मृती मंदिर येथे पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार होते. प्रमुख अतिथी दि. आर्ट ऑफ लिव्हिंग देव गोसकी, अनुपमा गोसकी यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माता-पालक संघाचे सदस्य शितल पवार, प्रेमा कुंभार, पालक शिक्षक संघाचे सदस्य ज्योतिबा खट्याळ संस्थेच्या खजिनदार ललिता कुंभार, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विजयकुमार हुल्ले, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, संगीत विद्यालयाचे संचालक विश्वाराध्य मठपती, नेताजी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार उपस्थित होते. पीपीटीद्वारे शाळेत राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दाखवण्यात आले. स्नेहसंमेलनात बालवाडी ते सातवीपर्यंतच्या ३३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सूत्रसंचालन केदार कुंभार यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन सुजाता फुलारी व उज्ज्वला भांड यांनी केले.




### सहस्त्रार्जुन प्रशालेचे एलिमेंटरी परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

श्रीशैल्य नगर भवानी पेठ येथील सहस्त्रार्जुन प्रशालेचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड चित्रकला परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. दोन्ही परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला. इंटरमिजिएट परीक्षेस १७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापेकी रूपा सुतार या विद्यार्थिनीस श्रेणी मिळाली आहे व संस्कृती जोकारे, स्नेहा कोरे, सोहम रंगरेज, सर्वेश बिराजदार, अस्मिता शेंडगे, यश हौजी, वैष्णवी दिंडुरे या विद्यार्थ्यांना श्रेणी मिळाली आहे. इतर विद्यार्थ्यांना श्रेणी प्राप्त करून उत्तीर्ण झाले. एलिमेंट्री परीक्षेत ३५ विद्यार्थी सहभागी होते. समृद्धी नागोजी, दिक्षा बेळे, गौरी डोके या विद्यार्थिनींना ग्रेड मिळाले आहे. तसेच आदिनाथ खंडेराव, आराध्या हविले, अक्षता कोरे, अक्षदा पवार, आर्या माळगे, अलायना मुजावर, अनुजा म्हेत्रे, भूमिका निर्मळे, जिया हणगी, कैवल्य जगताप, ओमकार बेळे, सबा हणगी, साक्षी माळगे, साक्षी स्वामी, संघमित्रा कांबळे, श्रेयश जाधव, सृष्टी बिराजदार, सुकन्या माने, तपस्या झिपरे, तेजस्वी घुगे, युवराज मिस्कीन या सर्व विद्यार्थ्यांना ग्रेड मिळाले आहे. इतर विद्यार्थ्यांना ग्रेड प्राप्त करून उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षिका श्रीमती संगीता पवार यांचे संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर, संस्थेचे सचिव जयकुमारसा कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजाननसा गोयल, मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिका मंजूषा काशीद यांनी अभिनंदन केले.

### समता विद्यालयात हळदी-कुंकू कार्यक्रम

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

समता मराठी विद्यालयात तीळ-गुळ आणि हळदी- कुंकवाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात आधुनिकतेची जोड देत महिलांच्या स्वसंरक्षणार्थ जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी भगिनी समाज मंडळाच्या सचिवा सुवर्णा कटारे आणि वन अधिकारी सुजाता चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मुख्याध्यापक जयवंत हक्के यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील महिला शिक्षकांनी महिला पालक आणि कार्यक्रमाला आलेल्या महिला सदस्यांची ओटी भरून त्यांना वाण म्हणून शाळेकडून भेट वस्तू देण्यात आली. कार्यक्रमास शाळेच्या सदर बाजार आणि लोधी गल्ली परिसरातील सुमारे ३०० महिला पालक सहभागी झाल्या होत्या. प्रास्तविक शिक्षिका कल्पना वाघमारे यांनी केले तर सूत्रसंचालन सुजाता डोंगरे यांनी केले आभार समीना कौशल मुजावर यानी मानले.




### आर्यन्स सन्मान २०२४ पुरस्कार सोहळा उत्साहात

**सोलापूर, दि. ४ फेब्रवारी-**

पुणे येथील स्वारगेटमधील गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित करण्यात आलेल्या सोहळ्यात विजेत्यांना आर्यन्स सन्मान २०२४ प्रदान करण्यात आले. या सोहळ्याला मराठी मनोरंजन विश्वातील मकरंद अनासपुरे, सुनील बर्वे, निर्मिती सावंत, सयाजी शिंदे, संदीप पाठक, आनंद इंगळे, सावनी रविंद्र, शैलेश दातार, अशोक समर्थ, पूजा पवार, उमा सरदेशमुख, मिलिंद फाटक, जगन्नाथ निवंगुणे, मिलिंद शिंतरे, अंशुमन विचारे, सुवेधा देसाई, हेमंत पाटील, प्रसाद वनारसे, निपुण धर्माधिकारी, देवेंद्र पेम, राहुल रानडे, निर्मात्या अमृता राव, सुरेश देशमाने, दीपक देवराज (महाराष्ट्र आर्थिक गुन्हे विभाग आयुक्त) आदी दिग्गज मंडळी उपस्थित होती. मुख्य चित्रपट, व्यावसायिक नाटक आणि प्रायोगिक नाटकाला १ लाख रुपये, तर तंत्रज्ञांसह इतर २५ हजार रुपये रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्कारांची एकूण रक्कम १३ लाख रुपये ओमा फाऊंडेशनकडून वितरित करण्यात आली.

# राष्ट्रीय नमुना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणासाठी सहकार्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा होणार आहे. आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त, अर्थ व सांख्यिकी व संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी केले आहे.

निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती गोळा करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय, दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि 'मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती' यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणीसाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे. नमुना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील. सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून कुटुंब निवडीची प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी मार्गदर्शन होणार आहे.



### हिंगुलांबिका शाळेत हळदी-कुंकू कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ फेब्रुवारी-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेत हळदी कुंकू व तिळगूळ समारंभ आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रिसिजन जनसंपर्क अधिकारी वैशाली बनसोडे उपस्थित होते. व प्रमुख पाहुणे म्हणून शोभा लिंबोळे व पूजाश्री कोळी उपस्थित होते. उपस्थित पालकांशी शाळेतील शिक्षिका बीना बुगले व माधवी खमितकर यांनी संवाद साधून विद्यार्थ्यांच्या प्रगती विषयी चर्चा केली. प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रमोद हंचाटे, सूत्रसंचालन शुभांगी पतंगे यांनी केले तर आभार प्रसाद वाले यांनी मानले.

# जात वैधता समितीसाठी पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसह नोकरदार राजकारणींना जात प्रमाणपत्र पडताळणी बंधनकारक आहे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे हजारो विद्यार्थ्यांनी अर्ज केलेले आहेत पण पूर्णवेळ अध्यक्ष व सदस्य नसल्याकारणाने हजारो प्रकरणे प्रलंबित आहेत त्यामुळे शासनाने त्वरित पूर्ण वेळ अध्यक्ष व सदस्य यांची नेमणूक करण्यात यावी या आशयाचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सचिव सचिन कवले यांना देण्यात आले.



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व सामाजिक न्याय मंत्री यांना सुद्धा ई-मेलद्वारे निवेदन पाठवण्यात आले आहे सध्या सीईटी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू असून नीटसाठी नोंदणी लवकरच सुरू होणार आहे. दरवर्षी सोलापूरसह राज्यभरात सुमारे पाच ते सहा लाख विद्यार्थी या परीक्षेला बसतात यातील दोन ते तीन लाख विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रची आवश्यकता भासते. त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विद्यार्थ्यांनी जात वैधता समितीकडे अर्ज केलेले आहेत, पण जात वैधता समितीकडे राज्यात ३६ समित्यासाठी अवघे चार अध्यक्ष असल्याकारणाने व एका अध्यक्ष कडे सोलापूरसह दहा जिल्ह्यांची जबाबदारी असल्याकारणाने हजारो अर्ज प्रलंबित आहेत. आरक्षण लाभार्थी विद्यार्थ्यावर सरकार अन्याय करीत असून जर जात वैधता प्रमाणपत्रामुळे एखाद्या विद्यार्थ्याला खुल्या वर्गातून प्रवेश घ्यावा लागला तर याच्या विरोधात संभाजी ब्रिगेडच्या वतीने उग्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, महिला शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, उपाध्यक्ष मनिषा कोळी, उपशहर प्रमुख फिरोज सय्यद, दक्षिण तालुका अध्यक्ष शेखर चौगुले, गौरीशंकर वर्पे, श्रीशैल आवटे, वैभव धुमाळ, विजयद्र कुमठेकर आदी उपस्थित होते.



# वीज प्रिपेड मिटरला उबाठा सेनेचा विरोध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सोलापूर शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने प्रीपेड मीटर बसवण्यात येणार असल्याच्या वीज वितरण च्या भूमिकेला विरोध केला आहे.

आज शहर शिवसेनेच्या वतीने कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित सोलापूर यांना प्रीपेड मीटर बसवण्यास शिवसेनेचा विरोध असलेले निवेदन देण्यात आले याप्रसंगी वीज कायदा २०२३ च्या कलम ५५ नुसार ग्राहकांना त्यांचे मीटर निवडण्याचा संपूर्ण हक्क असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणण्यात आले व वीज ग्राहकांवर कसल्याही प्रकारची जबरदस्ती केल्यास शिवसेना त्यांच्या स्टाईलने विरोध करणार असल्याचे स्पष्ट केले याप्रसंगी कार्यकारी अभियंता मेहता यांनी शिवसेनेची भूमिका समजावून घेऊन शिष्टमंडळाच्या व पक्षाच्या भावना वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्याचे मान्य केले तसेच शिवसेनेच्या वतीने शहर प्रमुख महेश धाराशिवकर जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाण यांनी वीज ग्राहकांना आवाहन केले आहे की त्यांच्यावर जर प्रीपेड मीटर बसवण्याची सक्ती करण्यात आली तर शिवसेनेधी संपर्क साधावा याप्रसंगी शहर प्रमुख महेश धाराशिवकर जिल्हा उपप्रमुख प्रताप चव्हाणशहर प्रमुख महेश भैया धाराशिवकर, उपजिल्हाप्रमुख प्रतापभाऊ चव्हाण, विद्यार्थी सेना जिल्हाप्रमुख लहुजी गायकवाड, विभाग प्रमुख आबा सावंत महेश गवळी, मुल्ला, दत्ता खलाट, उपशहर प्रमुख प्रमुख सुरेश गताप, शाखाप्रमुख मारुती खानापूरे आदी उपस्थित होते.



### मधमाशी पालनावर कार्यशाळा

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

युगंधर फाउंडेशन सोलापूर आणि सीबीआरटीए पुणे यांच्यावतीने मधमाशी पालन आणि मधमाशी संवर्धन काळाची गरज या विषयावर शॉर्ट टर्म कोर्स आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाच्या दरम्यान विद्यार्थ्यांच्यामध्ये मधमाशी पालन आणि मधमाशी पालनातील व्यवसाय संधी तसेच मधमाशी आणि त्यांचे जीवन चक्र तसेच मधमाशीचे जैवविविधतेमधील असणारा अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता सध्या परिस्थितीमध्ये शेतीसोबत जोडधंदा म्हणून मधमाशी पालनाकडे जास्तीत जास्त शेतकरी आणि युवकांनी वळावे, यासाठी युगंधर फाउंडेशनच्या वतीने मागील पाच वर्षापासून सोलापूर जिल्हा आणि परिसरात मधमाशी पालनासाठी विविध कार्यशाळा आणि उपक्रम घेण्यात येतात. संगमेश्वर कॉलेज येथील प्राणिशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम घेत असताना विद्यार्थ्यांनी केवळ पारंपारिक शिक्षण न घेता आपल्या शिक्षणाचा अर्थार्जनासाठी उपयोग करावा, असे मत युगंधर फाऊंडेशनच्या अध्यक्ष प्राध्यापक रश्मी माने यांनी व्यक्त केले. या प्रशिक्षणाच्या दरम्यान विद्यार्थ्यांना भविष्यात मधमाशी पालनासाठी लागणारे प्रशिक्षण सरकारी योजना आणि तांत्रिक सहाय्यक युगंधर फाऊंडेशनच्या वतीने करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी संगमेश्वर कॉलेज येथील प्राणिशास्त्र विभागातील विभाग प्रमुख डॉक्टर ज्योती मडसनाळ, प्रा. डॉ. सतीश पाटील, डॉ. स्वरूपा दामा यांचे सहकार्य लाभले.

# वीज कंत्राटी कामगार संघाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांसोबत बैठक लावणार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सोलापूर : वीज कंत्राटी कामगारांच्या अनेक समस्यां राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री यांनी मीटिंग घेऊन सोडवल्या मात्र प्रत्यक्षात काही गंभीर समस्यां सुटल्या नसून कंत्राटदार व अधिकारी यांच्या हितसंबंधा मुळे कष्टकरी कामगार अडचणीत असल्याचे संघटना प्रतिनिधी यांनी लक्षात आणून दिल्यामुळे लवकरच भारतीय मजदूर संघाच्या वीज कंत्राटी कामगार संघाची राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेबांच्या सोबत बैठक लावणार असल्याचे आश्वासन माजी वनमंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी दिले.

पुणे येथे जेजुरी देवसंस्थानचे विश्वस्त राजेंद्र इत्यादी खेडकर यांच्या घरी सुधीरभाऊ मुनगंटीवार आले असता संघटनेच्या वतीने प्रदेश अध्यक्ष निलेश खरात, रोहन पवार, विकास माने, पश्चिम महाराष्ट्र समरसता गतीविधीचे रवी ननावरे इत्यादी उपस्थित होते. उर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारी वर्गाने केली पाहिजे. शासन प्रशासना सोबत संवाद हवा संघर्ष नको, अशी अपेक्षा अध्यक्ष निलेश खरात यांनी व्यक्त केली.




# इंग्रजी व मराठी माध्यमातील प्रश्नपत्रिकेत तफावत

## सोलापूर विद्यापीठ : पीएच. डी कोर्सवर्क परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर या विद्यापीठाने सन २०२४ मध्ये घेतलेल्या पीएच.डी कोर्सवर्क परीक्षेतील इंग्रजी माध्यमातील व मराठी माध्यमातील प्रश्नपत्रिकेत तफावत असल्याची बाब पुढे आली आहे.

संशोधन पद्धती पेपर -१ या विषयाच्या परीक्षेची वेळी मराठी माध्यमातून परीक्षा देणाऱ्या पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातील प्रश्नपत्रिका दिली. याप्रसंगी मराठी माध्यमातून परीक्षा देणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातून प्रश्नपत्रिकेची मागणी केली. त्यावेळी मराठी माध्यमातून प्रश्नपत्रिका २० मिनिटे उशिरा देण्यात आली. इंग्रजी माध्यमातील व मराठी माध्यमातील प्रश्नपत्रिकेत तफावत असून मराठी माध्यमातील संशोधन पद्धती पेपर-१ या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न क्रमांक ३ मधील पोटप्रश्न अ) व बहे दोन प्रत्येकी १० गुणांचे प्रश्न चुकीचे व संदिग्ध असल्यामुळे मराठी माध्यमातून संशोधन पद्धती पेपर १ या विषयाचा पेपर देणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना विद्यापीठाने जाणीवपूर्वक नापास केलेले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥

एकीकडे केंद्र सरकार व राज्य सरकार मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा बहाल करत असताना विद्यापीठ प्रशासन मराठी भाषेची तसेच मराठी भाषिक विद्यार्थ्यांची गळचेपी करत आहे. विद्यापीठाकडे निवेदनाद्वारे व प्रत्यक्ष भेटून वारंवार संशोधक विद्यार्थ्यांनी मराठी माध्यमातील प्रश्नपत्रिकेतील चुकीच्या प्रश्नांना पूर्ण २० गुण देणेबाबत मागणी व तक्रार करून सुद्धा विद्यापीठाने कोणत्याही प्रकारची दखल न घेता चुकीच्या प्रश्नाला पूर्ण २० गुण देणे आवश्यक असताना, यावर कोणत्याही प्रकारची विद्यार्थी हिताची भूमिका न घेतल्यामुळे पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांचे अपरिपित शैक्षणिक, मानसिक, आर्थिक नुकसान होणार आहे. काही संशोधक विद्यार्थ्यांचे संशोधन कार्य पूर्ण असून केवळ विद्यापीठाने चुकीच्या प्रश्नपत्रिका पुरवठा केल्यामुळे विद्यार्थ्यांवर नापास होण्याची वेळ येऊन संशोधन अहवाल विद्यापीठाकडे सादर करण्यात अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व अन्यायग्रस्त पीएच.डी संशोधक विद्यार्थी शैक्षणिक न्याय मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## डॉ. आंबेडकर उद्यानातील कामासंदर्भात तात्काळ बैठक घ्या

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

न्यू बुधवार पेठ येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात बसवण्यात येणारा माता रमाई यांचा पुतळा मूळ स्वरूपात करावा. या उद्यानातील कामा संदर्भात महापालिकेने तत्काळ बैठक घ्यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान कृती समितीच्या वतीने महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांना देण्यात आले. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष अशोक जानराव, श्याम शिंगे, प्रवीण कांबळे अण्णासाहेब वाघमारे, विनोद जाधव, अनिरुद्ध वाघमारे, नागसेन माने, रत्नदीप कांबळे, सी. ए. सातपुते, गोरखनाथ लोंढे, धमरक्षिता कांबळे, सरोजनी जानराव, छाया कांबळे, बुद्धरत्न लंकेश्वर, नितीन कांबळे, राहुल जगताप, मीनाक्षी बनसोडे, भारत आवारे, ज्योतीराव जगताप आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### पैशाच्या कारणावरून तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

पैशाच्या कारणावरून तरूणास मारहाण करणाऱ्य दोघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत यासीन इक्बाल बागवान (वय २५, रा. अशोक चौक, मद्दा झोपडपट्टी, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन बाबू भंडारे (रा. लष्कर, सोलापूर), भैय्या धोत्रे उर्फ गंगाराम धोत्रे व इतर दोन जण (रा. सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यता आला आहे. जांबमुनी महाराज मिरवणुकीची वर्गणी मागायला बाबू भंडारे व इतर लोक गेल्यानंतर यासीन बागवान याने माझे पैसे देण्याची परिस्थिती नाही, मी पैसे देणार नाही असे सांगितले होते. त्याचा राग मनात धरून ३ फेब्रुवारी रोजी पहाटे तीनच्या सुमारास बाबू भंडारे व त्याच्या साथीदारांनी यासीन बागवान यास शिवीगाळ करून लाथाबुक्क्याने माराहाण करून शिवीगाळ केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोरे पुढील तपास करीत आहेत.

### मृत व्यक्तीचे पैसे काढून फसवणूक करणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

मृत व्यक्तीच्या मोबाइलवरील फोन पेद्वारे तीन लाखाची रक्कम काढून स्वत:च्या फायद्यासाठी वापरणाऱ्या ४५ वर्षीय महिलेवर विजापूर नाका पोलिसांत ३ फेब्रुवारी रोजी गुन्हा नोंद झाला आहे. प्रत्यक्षात ही घटना १ ते ३ मे २०२४ दरम्यान जुळे सोलापूर, जगदंब नगरातील १०१ लक्ष्मी लाइट्समध्ये घडली आहे. याबाबत तन्वीर यासीन सय्यद (वय ४३ रा. मुंबई) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रध्दा मंगेश मलखारे (वय ४३ रा. लक्ष्मी हायटस,जगदंबा नगर,जुळे सोलापूर)यांच्यावर विजापूर नाका पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादीचे वडील यासीन व आरोपी श्रध्दा मलखारे हे मिळून राहत होते. ते १९ मार्च २०२४ पासून एकत्र राहत होते. दि २९ एप्रिल २०२४ रोजी यासीन यांची अचानक तब्येत खराब झाल्याने ते मयत झाले. यासीन सय्यद हे वापरत असलेला मोबाईलवरील फोन पे द्वारे ३ लाख रुपये काढले, काढलेले पैसे फिर्यादीस व फिर्यादीची आईस न सांगता, आरोपीने स्वत:च्या फायद्यासाठी परवानगीशिवाय पैसे घेतले आहेत. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक पाटील हे करीत आहेत.




# मरणानंतरदेखील सोसाव्या लागतात क्लेशदायक यातना!

- बिलासाठी रुग्णसेवेला दिली तिलांजली; मृतदेह अडवणाऱ्या जिल्ह्यातील २८ खासगी रुग्णालयांना पाठवल्या नोटिसा
- आरोग्यमंत्र्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील विविध रुग्णालयांची तपासणी सुरू : डॉ. संतोष नवले यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ फेब्रुवारी-**

एखाद्या व्यक्तीला मरणानंतर देखील मरण यातना सहन कराव्या लागत आहेत. संबंधित रुग्णाचे बिल प्राप्त झाले नाही, तर रुग्णालयाच्या वतीने आपल्या रुग्णसेवेच्या कर्तव्याला तीलांजली देत रुग्णांच्या नातेवाईकांना हीन वागणूक देऊन, उर्वरित बिलासाठी तगादा लावला जातो. माणुसकीला काळीमा फासणारी घटना म्हणजे मृतदेह ताब्यात दिला जात नाही. अशा हृदयद्रावक घटना घडल्यानंतर अखेर राज्य शासनाने संबंधित रुग्णालयांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

या नव्या आदेशानुसार, राज्यात तसेच सोलापूर जिल्ह्यात रुग्णांना मरणानंतर देखील मरण यातना देणाऱ्या विविध खाजगी रुग्णालयांच्या तपासणी मोहिमेला वेग आला आहे. सोलापूर शहर जिल्ह्यात यासंबंधी आरोग्य



विभागाच्या वतीने तपासणी सुरू झालेली आहे. बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार खासगी रुग्णालयास रुग्णाचा मृतदेह बिल दिले नाही, म्हणून अडवून ठेवता येत नाही. तरीदेखील, कायद्यातील तरतुदी पायदळी तुडवून बिलासाठी मृतदेह अडविणाऱ्या रुग्णालयांना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने नोटिसा बजावल्या आहेत. त्यात सोलापूर शहर-जिल्ह्यातील सुमारे २८ रुग्णालये आहेत. त्यांना एका महिन्यात नोटिशीचा खुलासा द्यावा लागणार असून त्या रुग्णालयांची नावे अजून समोर आलेली नाहीत. दरम्यान, राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी राज्यातील खासगी रुग्णालये कायद्याचे पालन करतात की नाहीत, यासंदर्भातील तपासणी करून एक महिन्यात अहवाल मागविला होता. त्यानुसार जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्याधिकारी व महापालिकेतील वैद्यकीय आरोग्याधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालयांची तपासणी केली. (दी.५) फेब्रुवारीपर्यंत ही तपासणी सुरू असणार आहे. आतापर्यंतच्या तपासणीत नियमांचे पालन न करणारी २ हजार ९३६ रुग्णालये समोर आली आहेत. त्यातील काही रुग्णालयांकडे प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे (बायोमेडिकल वेस्टेज टाकण्यासाठी) प्रमाणपत्र नाही, रुग्ण तपासणीचे रेकॉर्ड नाही, दर्शनी भागात रुग्णालयासमोर दरपत्रक नाही, नागरिकांची सनद रुग्णालयांमध्ये आढळली नाही, अशा त्रुटी आढळल्या आहेत. तर, दुसरीकडे सुमारे एक हजारांहून अधिक रुग्णालयांनी रुग्णाच्या मृत्यूनंतर बिलासाठी मृतदेह अडवून ठेवल्याच्याही तक्रारींचा समावेश आहे. मृत्यूपूर्वीच्या उपचाराचे संपूर्ण बिल भरल्याशिवाय मृतदेह नेता येणार नाही, अशी भूमिका काही रुग्णालये घेतात. पण, बॉम्बे नर्सिंग ॲक्टनुसार त्यारुग्णालयांना तसे करता येत नाही. त्यासंदर्भात कोणाची तक्रार प्राप्त झाल्यास त्या रुग्णालयांवर कारवाई होऊ शकते, असा इशारा आरोग्य विभागाने दिला आहे.

### कायद्यातील तरतुदीचे पालन करणे गरजेचे



बॉम्बे नर्सिंग ॲक्टप्रमाणे रुग्णालयांना दरपत्रक बाहेर दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. याशिवाय नागरिकांची सनद लावणे, रेकॉर्ड व्यवस्थित जतन करणे, प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे व अग्निशामकचे प्रमाणपत्र असणे, मृत्यूनंतर कोणाचाही मृतदेह बिलासाठी अडवून न ठेवणे, अशा अटी आहेत. कायद्यातील तरतुदीचे पालन तर सर्वांनीच करावे, पण माणुसकीच्या नात्याने कोणीही मृतदेह बिलासाठी अडवून ठेवू नये.

**-डॉ. संतोष नवले, जिल्हा आरोग्याधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**

### बॉम्बे नर्सिंग ॲक्ट १९४९ नुसार...

बॉम्बे नर्सिंग ॲक्ट १९४९ नुसार कोणत्याही खासगी रुग्णालयांमध्ये व्यक्तीचा मृत्यू झाल्यास तो मृतदेह बिलासाठी अडवून ठेवता येत नाही. तशी तक्रार संबंधित अधिकाऱ्याकडे प्राप्त झाल्यास चौकशी करून त्या रुग्णालयाला नोटीस बजावली जाते. तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित रुग्णालयास ५० ते ५०० रुपयांपर्यंत दंड करण्याची तरतूद या कायद्यात आहे. याशिवाय रुग्णालयांवरील पुढील कारवाई प्रस्तावित करण्याचा अधिकार देखील जिल्हा आरोग्याधिकारी, महापालिकेच्या आरोग्याधिका-किंवा जिल्हा शल्यचिकित्सकांसह धर्मादाय आयुक्त कार्यालयास (त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्रातील रुग्णालये) आहे.

# ४० दिवसांत २४६ दुकानदारांकडून एकूण साडेबारा लाखांचा दंड वसूल

- महापालिकेची प्लास्टिक विरोधी मोहीम जोमात
- १ हजार ३६४ दुकानांची केली तपासणी; ३ हजार ८८७ किलो प्लास्टिक जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिका प्रशासनाच्या वतीने प्लास्टिक विरोधी धडक मोहीम सुरूच आहे. दरम्यान, गेल्या ४० दिवसात महापालिकेच्या पथकांकडून एकूण १ हजार ३६४ दुकानांची तपासणी करण्यात आली. ३ हजार ८८७ किलो प्लास्टिक जप्त केले तर २४६ दुकानदारांवर दंडात्मक कारवाई केली. १२ लाख ३५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नियंत्रणाखाली नियोजनपूर्वक प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम राबविण्यात येत आहे. सोलापूर शहरात विविध दुकान आणि आस्थापनांमध्ये जाऊन महापालिकेचे आरोग्य निरीक्षक तपासणी करीत आहेत. त्याचबरोबर बंदी असलेले प्लास्टिक न वापरण्याचे आवाहन आणि जागृती करण्यात येत आहे. दरम्यान, दि. २६ डिसेंबर २०२४ ते ३ फेब्रुवारी २०२५ या ४० दिवसांच्या कालावधीत महापालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या आरोग्य निरीक्षकांच्या पथकाने प्लास्टिक विरोधी मोहिमेत एकूण १ हजार ३६४ दुकानांची तपासणी केली. मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्या माध्यमातून महापालिकेच्या विविध ८ झोन अंतर्गत आरोग्य निरीक्षकांच्या पथकाने ही कारवाई केली. या कालावधीत विविध ठिकाणच्या एकूण १ हजार ३६४ दुकानांची तपासणी केली. एकूण २४६ दुकानदारांना दंड आकारण्यात आला. एकूण ३ हजार ८८७ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले तर एकूण १२ लाख ३५ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. दरम्यान, सोमवार दि. ३ फेब्रुवारी रोजी महापालिकेच्या विविध पथकांनी शहरात आठ झोन अंतर्गत ५० दुकानांची तपासणी केली. त्यापैकी चार दुकानांवर कारवाई करत २० हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. यामध्ये एकूण २.५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.




### अन्यथा दंडात्मक अन् फौजदारी कारवाई केली जाणार : रवी पवार

शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी शासनाने बंदी घातलेल्या प्लास्टिकचा उत्पादन, वापर, विक्री, हाताळणी, वाहतूक व साठवणूक करू नये व वापरताना आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार दंडात्मक तसेच फौजदारी स्वरुपाची कारवाई केली जाईल, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांनी केले आहे.

# शहरात दोन ठिकाणी चोरीच्या घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

शहरात दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. गुरु नानक चौक, न्याय नोंदणी कार्यालय येथून अडीच लाख रुपयांचे स्टील, बायडींग वायर व स्काडा मशिन तर कौतम चौकातून ॲग्रीकल्चरचे दुकान फोडून सात हजाराची रक्कम लंपास केली आहे. याप्रकरणी जेलरोड व सदर बझार पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे.

पहिल्या घटनेत गुरु नानक चौक येथील न्याय नोंदणी कार्यालय येथून साहित्य चोरणाऱ्या तिघांवर सदर बझार पोलिसांत ३ फेब्रुवारी रोजी गुन्हा दाखल आहे. ही घटना ११ मार्च२०२४ रोजी घडली आहे.याबाबत भिमराया सेंटप्पा केंचनाळ (वय ६३ रा. सोलापूर) यांनी दिलेल्या अर्जावरून एक वर्षानंतर सदर बझार पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. यावरून जितेंद्र नडगीरी, उमर फारुख पटेल वइतर साथीदार या आरोपींवर गुन्हा नोंद झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी भिमराया केंचनाळ हे सुजित मल्लिकार्जुन गायकवाड यांच्या बांधकामावर ती वॉचमन म्हणून नोकरीस होते. वॉचमन बांधकामावर असताना सेट्रींगचे काम करणारा जितेंद्र, उमर व इतर साथीदार यांनी फिर्यादीला साइडवर येवू दिले नाही. शिवीगाळ करून दमदाटी केली. दोन लाख ६४ हजाराचे १२० किलो स्टील, ७० हजाराची ७० किलो बायडींग वायर, स्काडा मशीनही चोरून नेली आहे. याप्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.



दुसऱ्या घटनेत वैभव भीमाशंकर जम्मा (वय ४८ रा. विद्या नगर,पाथरूट चौक सोलापूर) यांचे कौतम चौक येथे महाराष्ट्र ॲग्रीकल्चर नावाचे दुकान आहे,ते दुकान फोडून दुकानातील ७ हजार २०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. याबाबत जेलरोड पोलिसांत गुन्हा नोंद झाला असून पोलिस उपनिरीक्षक ढेरे हे तपास करीत आहेत.

# घरगुती वादातून महिलेने प्राशन केले फिनेल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि ४ फेब्रुवारी-**

घरगुती वादातून महिलेने फिनेल प्राशन केले असून मनिषा नागेश अनमल्लू (वय २५, रा. थोरली इरण्णा वस्ती, सोलापूर) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे. २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी राहत्या घरी घरगुती वादातून मनिषा अनमल्लू या महिलेने फिनेल प्राशन केले.



त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने त्यांना उपचारासाठी आई रत्ना जगले यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# कृषी योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उंचावते राहणीमान!

▶ डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ठरतेय क्रांतिकारी ▶ सुमारे तीन कोटींची तरतूद

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी वरदायिनी ठरली आहे. या दोन्ही योजने अंतर्गत शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये सुधारणा घडवून आणून, पर्यायाने आपले आर्थिक स्तर उंचावण्यासाठी महत्वपूर्ण योगदान ठरले आहे. सण २०२३-२४ या आर्थिक वर्षात डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेसाठी ८३३ लाभार्थी शेतकऱ्यांनी महाडीबीटी या संकेतस्थळावरून अर्ज दाखल केले होते. त्यामधून लॉटरी पद्धतीने ५०७ लाभार्थी शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. तसेच बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेसाठी ३८ लाभार्थी शेतकऱ्यांनी अर्ज सादर केला होता. दाखल झालेल्या अर्जांच्या पडताळणीनंतर ३० लाभार्थी शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ प्राप्त झाला आहे. तर उर्वरित ८ अर्ज हे रद्द करण्यात आले.

दरम्यान, या दोन्ही योजनेच्या अनुदानात आता शासनाकडून भरघोस वाढ करण्यात आली आहे. या दोन्ही योजनेतून पात्र लाभार्थ्यांना नवीन विहीर खोदण्यासाठी यापूर्वी अडीच लाखाचे अनुदान देण्यात येत होते. आता त्यामध्ये वाढ करण्यात आली आसून, ते अनुदान चार लाख रुपये करण्यात आले आहे. जुनी विहीर दुरुस्तीसाठी यापूर्वी ५० हजाराचे अनुदान देण्यात येत होते. ते आता एक लाख करण्यात आले आहे. यापूर्वी या दोन्ही योजनेतील लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाची मर्यादा दीड लाख रुपये, तर दोन विहिरीतील अंतर ५०० फुटापेक्षा जास्त नसावे या दोन्ही अटी शासनाने ३ डिसेंबर रोजी काढलेल्या सुधारित मार्गदर्शक सूचना काढून शिथिल केल्या आहेत.

दरम्यान, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना ही अनुसूचित जमाती (आदिवासी) प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी राबविली जाते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती (नवबौध्द प्रवर्गातील) शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेसाठी महाराष्ट्र शासनाच्या महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया निरंतर सुरू राहणार आहे.

शेतकऱ्यांना योजनेबाबत माहिती दिली जात आहे. चालू आर्थिक वर्षात लाभार्थी शेतकऱ्यांनी अर्ज सादर केल्यानंतर कामांचा आढावा घेऊन वाढीव निधीची तरतूद केली जाणार आहे. सुमारे चार कोटींचा निधी यासाठी उपलब्ध करण्यात आल्याची माहिती कृषी विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.



### ▶▶ इतक्या लाभार्थ्यांनी घेतला या योजनेचा लाभ

बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत ३० लाभार्थी शेतकऱ्यांनी सुमारे ८ लाख ८ हजार रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली. त्यांचा लाभ शेतकऱ्यांना प्राप्त झाला. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेअंतर्गत ५०७ लाभार्थी शेतकऱ्यांसाठी सुमारे २ कोटी ९४ लाख रुपये इतकी निधीची तरतूद करण्यात आली होती. सदरचा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे २०२४-२५ चालू या आर्थिक वर्षामध्ये १३४ नवीन कामांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये ६० नवीन विहिरीच्या निर्मितीसाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे पंप सेट, विहिरीचे खोलीकरण, सोलर पंप आदींचा समावेश आहे.

### ▶▶ शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम

नवीन सिंचन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण, इनवेल बोरिंग, वीज जोडणी आकार, डिझेल विद्युत पंप संच, सोलार पंप, एच.डी.पी.ई पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, तुषार सिंचन पूरक अनुदान, ठिबक सिंचन पूरक अनुदान, बैल ट्रॅक्टर चलित यंत्रसामग्री, परसबाग, विंधन विहीर.

### ▶▶ या योजनेसाठी वाढीव निधीची तरतूद

शेतकरी कल्याणाच्या या दोन्ही योजनांसाठी पात्र लाभार्थ्यांनी संपूर्ण कागदपत्रांसह शासनाच्या महाडीबीटी या शासकीय पोर्टलच्या mahadbt.maharashtra.gov. in/farmer/login/login या संकेतस्थळावर अर्ज करावेत. योजनेसंदर्भात काही अडचणी- शंका असल्यास अधिक माहितीसाठी पंचायत समिती स्तरावर तालुका कृषी अधिकारी तर जिल्हा स्तरावर सोलापूर जिल्हा परिषद कृषी विभागाशी संपर्क साधावा, या योजनेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्तर उंचावून राहणीमान सुधारणार आहे. यासाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी तात्काळ अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

**- हरिदास हावळे, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर**



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०२०

**उपदेश तो भलत्या हातीं ।**
**झाला चित्तीं धरावा ।।**

प्रत्येक विषयाचे परिपूर्ण ज्ञान आहे, असा माणूस सापडणे कठीण आहे. अर्थात कितीही ज्ञानी व्यक्ती असला तरीही, त्याच्याकडे एखाद्या विषयाचे अज्ञान असू शकते. म्हणजेच कांही विषयात, क्षेत्रात दुसऱ्याकडून ज्ञान मिळविण्याची प्रत्येकाला गरज असते. आपणाला ज्ञान नसतांनाही मला त्या विषयाचे ज्ञान आहे म्हणणे चुकीचे ठरते. त्याचबरोबर आपले अज्ञान दूर करण्यासाठी एखाद्याने पुढाकार घेतला असता किंवा आपल्या अनुभवातून एखादा त्या विषयाबद्दल सत्य मार्गदर्शन करीत असता त्याला नांव ठेवून त्या ज्ञानापसून दूर होणेही हितकारक नसते. बऱ्याचवेळा आपल्यापेक्षा लहान किंवा कमी ज्ञानी माणूस आपणाला ज्ञान सांगू शकतो, ही कल्पनाही अनेकांच्या मनाला आवडत नाही. त्यामुळे माणूस ज्ञान ग्रहण करतांना किंवा मार्गदर्शन घेताना मार्गदर्शन करणारा आपल्यापेक्षा मोठाच माणूस असावा, असा अट्टहास करुन बसतो. त्याचा असा अट्टहास त्याला खऱ्या ज्ञानापासून अलिप्त ठेवू शकतो. आपणास माहिती नसलेले ज्ञान कोणी अनुभवातून किंवा त्याच्याकडील ज्ञानातून देत असेल तर तो लहान आहे का मोठा ? स्त्री आहे का पुरुष ? याचा विचार न करता ते ज्ञान ग्रहण करावे. कारण ज्ञानाला लहान,मोठा ,स्त्री,पुरुष याच्याशी कांही देणे-घेणे नसते.त्यामुळे ज्ञान कोण देतो त्यापेक्षा काय देतो याकडे पाहून त्या ज्ञानाचा स्विकार करावा. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात,उपदेश तो भलत्या हातीं । झाला चित्तीं धरावा ।। माणूस मी पणामुळे बऱ्याचवेळा चांगल्या गोष्टींपासून दूर राहतो. त्याचा खोटारडा मीपणा किंवा अहंकार त्याला सामान्यांकडून ज्ञान घेऊ देत नाही. खरा शहाणा किंवा मोठा माणूस कोणाकडूनही अनुभवाची, ज्ञानाची शिदोरी स्विकारण्याची मानसिकता जोपासतो. म्हणूनच तो खऱ्या अर्थाने मोठा व शहाणा असतो. कालच्या पोरांनी मला ज्ञान शिकविण्याची गरज नाही. किंवा माझ्यापेक्षा लहान असूनही मला कशाला ज्ञान शिकवितो? असे म्हणणेही योग्य नाही. आपणाला कोण देतो त्यापेक्षा काय देतो, याचा विचार प्रसंगानुरुप करणे हितावह असते. केवळ मोठा किंवा वयस्क माणूस झाला म्हणजे त्याचे सर्वच सत्य असते असे नव्हे. त्याचबरोबर आपल्यापेक्षा लहान आहे, म्हणून त्याचे सर्वच खोटे असते, असेही नव्हे. त्यामुळे आपणाला अवगत नसलेली एखादी गोष्ट कोणाकडूनही शहानिशाअंती स्विकारणे योग्य असते. योग्य आणि सत्य गोष्टी कोणाकडूनही स्विकाराव्यात. ज्ञान स्विकारण्यात कमीपणा मानने म्हणजे मुर्खपणा ठरु शकतो. चौदाशे वर्षाच्या चांगदेवांनी बालक असलेल्या ज्ञानदेव-मुक्ताईकडून ज्ञान स्विकारले. यावरुन ज्ञान स्विकारतांना वय, जात, लिंग, लहान-मोठा असा कसलाही भेद करणे उचित नसल्याचे लक्षात ठेवावे. त्याचबरोबर ज्ञान हे स्विकारत गेल्याने वाढत जाते हे ही लक्षात ठेवावे.



**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : मंगळवार** | **दिनविशेष - चांगला दिवस, दुर्गाष्टमी, भीष्माष्टमी, बुधाष्टमी मोहिनीराज सप्तदिन उत्सव** |
| **दि. ५ फेब्रुवारी २०२५** | **....राहू काल....** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **शके - १९४६** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **मास - फाल्गुन** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **शु. अष्टमी (२४.३५)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **ऋतु - वसंत** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **नक्षत्र - भरणी (२०.३२)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **योग - शुक्ल (२१.१८)** | |
| **करण - विष्टि (१३.३१)** | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. दुसऱ्यावर रोष करू नका. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : उपयोगी चर्चा घडून येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ाण होईल. व्यवसाय चांगला चालेल. विरोधकांपासून सावध रहा. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल. मानसिक संतोष निर्माण होईल.

# सर्व खसगी रुग्णालयांनी 'जीबीएस' रुग्णांची माहिती आरोग्य यंत्रणेला द्यावी

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचे निर्देश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

जिल्ह्याच्या ग्रामीण, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रुग्णालयांकडे गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) आजाराचा रुग्ण आढळल्यास त्याबाबतची माहिती तात्काळ संबंधित शासकीय आरोग्य यंत्रणेने घेऊन त्याचा दैनंदिन अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जीबीएस आजाराच्या अनुषंगाने आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. संजीव ठाकूर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार यांच्यासह अन्य संबंधित अधिकारी उपस्थित होते.

जीबीएस आजाराचे पाच रुग्ण सोलापूर जिल्ह्यात आढळलेले असून त्यातील एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती असून उर्वरित चार रुग्ण हे उपचार घेत असून हे चारही रुग्ण सोलापूर जिल्ह्याबाहेरील असल्याची माहिती आरोग्य यंत्रणा कडून यावेळी देण्यात आली.

तसेच या आजाराच्या अनुषंगाने आरोग्य विभागाच्या वतीने जनजागृती करण्यात येत असून शासकीय रुग्णालयामध्ये आवश्यक राखीव बेडची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

## संघ हीच जीवनगाथा



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.

**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख
राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक: (४२) जंगल सत्याग्रह

१९३० च्या गुरुपौर्णिमेला डॉक्टरांनी सरसंघचालक पदाची जबाबदारी डॉक्टर परांजपे यांच्यावर सोपवली. कारण डॉक्टर जंगल सत्याग्रह करणार होते. कारण चराऊ राने राखीव वनविभागात समाविष्ट केल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. आधी शेतकऱ्यांच्या गुराढोरांना चरू द्या; मग जंगलातील उत्पन्न सरकारने घ्यावे असा नारा देत हा सत्याग्रह होता. २१ जुलैला यवतमाळला हा झाला होता. अर्थातच यावेळी सर्वांना अटक झाली. नऊ महिन्याची शिक्षा झाली. अकोला कारागृहाकडे रवानगी करण्यात आली. परंतु यवतमाळ-अकोला दरम्यान येणाऱ्या प्रत्येक रेल्वेस्थानकावर या सत्याग्रहींचा जंगी सत्कार होत होता. एखाद्या स्थानावर हे पळून जातील या भितीने त्यांना हातकडी घालण्याचे ठरले. आणि त्यावरून परत खूप खडाजंगी झाली. आम्ही १२ जण आहोत; आम्हाला व्यवस्थित तुरुंगात पोहोचवण्याचे श्रेय आम्ही तुम्हाला देऊ, असे यांनी आश्वासन दिले. त्यानंतर सत्कार समारंभात मिळालेली फराळांची टोकरी डॉक्टरांनी सर्वांसाठी उघडली व तुरुंग अधिकाऱ्यासह सर्वांना डॉक्टरांनी आग्रहाने खाऊ घातले. क्षणापूर्वी लाव्हारसाप्रमाणे रसरसणारे डॉक्टरांचे रूप आता ज्योत्स्नेच्या शीतलतेची बरोबरी करत होते. हे पाहून अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटले. नऊ महिने अकोला कारागृहात राहिले खरे; पण या १२ जणांनी शेतकऱ्यांच्या गुराढोरांना प्रेमाने चारा खाऊ घातला आहे हे तितकेच खरे. या सत्याग्रहींमुळे संघवाले घरोघरी ओळखीचे व प्रिय झाले.

**- क्रमशः**

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान राबवणे गरजेचे

### मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या सूचना



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन अंतर्गत कुष्ठरुग्ण शोध व उपचार अभियान दि.३१ जानेवारी ते दि.१५ फेब्रुवारी या कालावधी दरम्यान सोलापूर जिल्ह्यात सदर कुष्ठरूग्ण शोध व उपचार अभियान राबविण्यात येत आहे. त्याचा अनुषंगाने सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकार अधिकारी कुलदिप जंगम यांचे अध्यक्षतेखाली समन्वय समितीची सभा अभियान सोलापूर जिल्ह्यात राबविण्यासाठी घेण्यात आली.

जिल्ह्यातील या १४ दिवसाच्या तपासणी अभियानासाठी ३६ लाख ५७ हजार ५९० लोकसंख्येची निवड करण्यात आली असुन २ हजार ७६८ शोधपथके तयार करण्यात आली आहेत. या शोध पथकांचे पर्यवेक्षण करण्यासाठी ५५४ पर्यवेक्षकांची नेमणुक करण्यात आली आहे. शोध पथकाने शोधलेल्या प्रत्येक संशयीताची वैद्यकीय अधिकारी यांचेकडून करुन निदान करण्यात येवून, जर कुष्ठरोग असेल तर तात्काळ बहुविध औषधोपचार सुरु करण्यात येणार आहे. अभियान दरम्यान तपासणी करण्याकरीता येणाऱ्या पथकाकडून तपासणी करुन घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. सभेस सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग), सोलापूर डॉ. मोहन शेगर, यांनी सविस्तर माहिती सादरीकरणाद्वारे दिली. सभेस जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, आरोग्य अधिकारी, डॉ. राखी माने, मुख्य महानगर पालिका सोलापूर, डॉ. नंदकिशोर घाडगे, अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. मिनाक्षी बनसोडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी, डॉ. आनंद गोडसे, वैद्यकीय अधिकारी कुष्ठरोग विभाग, डॉ.एस.पी.

# अॅट्रॉसिटी पीडितांना अर्थसहाय्य देण्यात यावे

### भीमशक्ती संघटनेची पालकमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

जातीयतेच्या कारणावरून अत्याचाराला बळी पडलेल्या अनुसूचित जाती जमाती घटकातील पीडितांना सामाजिक न्याय विभागाकडून अर्थसहाय्य देऊन त्यांचे पुनर्वसन केले जाते. मात्र संबंधितांना अर्थसहाय्य देण्यास विलंब होत आहे. सुमारे पाच कोटीचा निधी शासन स्तरावर रखडला आहे. तो तात्काळ संबंधितांना देण्यात यावा, अशा मागणीचे निवेदन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांना देण्यात आले.

सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक सालातील जवळपास पाच कोटी एवढा निधी शासन स्तरावर रखडला असून हा निधी केव्हा देणार? असा प्रश्न भीमशक्ती सामाजिक संघटनेने पालकमंत्री जिल्हाधिकारी व सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे निवेदनाद्वारे केला आहे. तीन महिन्यापूर्वी विधानसभा झाली. राज्यात नवीन सरकार अस्तित्वात आले. मंत्रिमंडळाची निवड झाली. पालकमंत्र्याची ही निवड झाली. परंतु अजूनही अत्याचार पीडित व्यक्तींना त्यांच्या हक्काची शासन स्तरावरून मिळणारी मदत मिळत नाही, असा आरोप केला आहे. येत्या १० दिवसात जर हा निधी लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा न झाल्यास आम्हाला नाईलाजाने रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशारा देण्यात आला. याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस राजा कदम, शहराध्यक्ष उमेश सुरते, कार्याध्यक्ष मनोज लोंढे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रमिला तुपलोंढे, महिला शहराध्यक्ष प्रा. ज्योती गायकवाड अड. करीमुन्निसा बागवान, युवक शहराध्यक्ष मयूर तळभंडारे,सलीम मुल्ला, समीर मुजावर, मेजर सुखदेव साबळे, विक्रम वाघमारे, भारत शिरसागर, इब्राहिम शेख, प्रकाश बनसोडे, गणेश चंदनशिवे, रफिक शेख, नसरीन शेख, प्रेमलता वाघमारे, छाया हिरवटे, विजयालक्ष्मी झाकणे, मुमताज शेख, मुमताज तांबोळी, सायरा शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करा

### श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महापालिका आयुक्तांना निवेदन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आवश्यक सोयीसुविधा उपलब्ध करण्यात याव्यात, यासह विविध मागण्यांचे निवेदन श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांना देण्यात आले.

डाळींबी आड, इंदिरा कन्या प्रशाला लगत, शिंदे चौक येथे श्री छत्रपति शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येते. याठिकाणी महापालिका प्रशासनाकडून मैदानाची साफसफाई, मंडप टाकणे, रोलिंग करणे, रंगरंगोटी, लायटींग करणे, कुस्तीचा आखाडा तयार करणे , प्रेक्षकांना बसण्यासाठी गॅलरी तयार करणे, डाळींबी आड मैदान येथे शोभिवंत झाडे लावण्यासाठी ट्री गार्ड लावून मिळावेत. छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा येथे मंडप, मेघडंबरी, लाईटची सोय व स्टेज, लायटींग, स्पिकर चौकातील तीनही बाजूस टॉवर उभे करून फोकसची व्यवस्था करावी. सत्कारासाठी हाराची सोय करण्यात यावी. तसेच मध्यवर्ती महामंडळाची सार्वजनिक मिरवणूक दि.१९ फेब्रुवारी रोजी काढण्यात येणार आहे. त्याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे स्टेज, खुर्च्या, स्पिकर, सत्कारासाठी लागणारे साहित्य आदी कामे पुर्ण करावीत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक तसेच नवीवेस पोलीस चौकी या मार्गावरील डिव्हाईडर मधील आजोरा काढावा. रंगरंगोटी करावी.लाईट चालू करावेत. रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात यावेत, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी ट्रस्टी अध्यक्ष नानासाहेब काळे, श्रीकांत डांगे, उत्सव अध्यक्ष सुशील बंदपट्टे, राजन जाधव, माजी नगरसेवक विनोद भोसले, माऊली पवार, भाऊसाहेब रोडगे, विजय पुकाळे, पंकज काटकर, शिवा कामाठी, लता ढेरे, प्राजक्ता बागल, अंबादास शेळके, महेश हणमे, प्रीतम परदेशी, प्रकाश ननवरे, सचिन स्वामी, देविदास घुले, बसू कोळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ७२ व्यक्तींवर दंडात्मक कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ४ फेब्रुवारी-**

सार्वजनिक ठिकाणी थुंकून घाण करणाऱ्यांवर महापालिका प्रशासनाने आता धडक कारवाई सुरू आहे. दुसऱ्या दिवशी विविध पथकाने शहरात सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या ७२ व्यक्ती आणि पान टपरी धारकांवर दंडात्मक कारवाई केली आहे. या कारवाईत ९ हजार २०० रुपये दंड वसूल केला आहे. या मोहिमेमुळे पान टपरीधारक परिसर स्वच्छता करून घेत आहेत.

आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशान्वये आणि अतिरिक्त आयुक्त रवि पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या नेतृत्वाखाली गुटका व मावा, सार्वजनिक भागात थुंकणारे व लघुशंका करणार्या नागरिकांवर पायबंद घालणे तसेच प्लस्टिक बंदी इत्यादी मोहीम हाती घेण्यात आली आहे. दरम्यान आज दुसऱ्या दिवशी महापालिकेच्या आरोग्य निरीक्षकांच्या विविध पथकांनी सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली. महापालिकेच्या विविध आठ झोन अंतर्गत मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्यासह ४९ आरोग्य निरीक्षकांनी ही कारवाई केली. बाळी वेस, अक्कलकोट रोड, शेळगी, पंजाब तालीम परिसर, विडी घरकुल, गांधीनगर इतर ठिकाणी करण्यात आली आहे.

# संघर्ष, संयम आणि सेवेचा त्रिवेणी संगम : डॉ. कुमारदादा करजगी

सोलापूर शहर म्हणजे स्वातंत्र्य पूर्व काळातील भारतातील मॅचेस्टर सिटी म्हणून ओळखले जात. पण पुढे याच सिटीला मिल मालकांचा अरेरावीपणा आणि मिल कामगारांची गळचेपी या कारणास्तव इथल्या तब्बल ८ कापड गिरण्या हळूहळू बंद पडल्या. कापड गिरण्यांची धडधड जशी बंद झाली तशी इथल्या मिल कामगारांच्या काळजात धडधड सूरू झाली.आपल्या हाताचे काम तर कायमचे बंद झाले आणि आपल्या कष्टाचा पैसा देखील हातात येण्यापासून दूर पळू लागला.आपल्या घामाचे दाम आपल्याला आता मिळेल की कधीच मिळणार नाही या शंकेनी मनात हूरहूर माजविले.बंद असलेल्या मिलच्या गेटसमोर रोज कामगार जमा व्हायचे आणि आपले पैसे मिळतील का याची वाट पाहायचे.याच कालचक्रात सोलापूर शहर हे रसातळाला कधी गेले हे समजलेच नाही.अंत: अस्ति आरंभ या वेदाप्रमाणे या कामगारांच्या पाठीशी उभा राहिला एक मिल कामगार पुत्र ज्यांची घरची परिस्थिती अतिशय साधारण सकाळी जेवण मिळाले तर संध्याकाळचे जेवण मिळेल का याची शाश्वती नसणारे करजगी कुटुंबातील एक हरहुन्नरी पुत्र कुमार करजगी.

### संकल्प मानवतेचा...

सोलापूरचे वैभव म्हणजे जुनी मिल ही मिल बंद पडली आणि अनेक कामगार बेकार झाले.या कामगारांच्या कष्टाचा पैसा मिळवून देण्यासाठी परमेश्वरांनी मला शक्ती दिली.त्यात मी यशस्वी झालो.या कार्याचे दखल घेऊन देशाचे नेते श्री.शरदचंद्र जी पवार साहेब यांनी मला सोलापूरातील लक्ष्मी विष्णू मिल मधील कामगारांच्या हक्कासाठी पुढे होण्यास सांगितले आणि साहेबांच्या आदेशाने मी तो देखील लढा यशस्वी करून दाखविला.आज पर्यंत मी अनेकांना मदत केली आहे आणि आता वयाच्या पंच्याहत्तरीत मी एक संकल्प केला आहे.माझ्या सत्याग्रहात १० वर्ष १८० सत्याग्रहिनी भाग घेतला. त्यांच्या साठी मी शहराच्या मध्यवर्ती भागातील सुमारे २५ कोटीची जागा मोफत देऊन त्यांना त्या ठिकाणी मोफत घरे बांधून देण्याचा संकल्प केला आहे.

प्रत्येकाला आपलं स्वत:च जग जिंकायचं असतं,पण खरा विजेता तोच जो दुसऱ्यांनाही जिंकण्याची प्रेरणा देतो. असे कुमार दादा यांनी आपल्या कार्यातून जग जिंकण्याची स्वप्ने पाहत असताना आपल्या सोबत असणाऱ्यांना देखील जिंकण्याची प्रेरणा देणारे दादा.आपल्या आयुष्यात पुढे काय लिहून ठेवले आहे याची त्यांना कल्पना नव्हती पण १९६३ साली बंद झालेल्या जुनी मिलमधील कामगारांसाठी त्यांनी लढा उभारला तब्बल ३३ वर्षानंतर त्यांच्या लढ्याला यश मिळाले.

हजारो मिल कामगारांना त्यांच्या कष्टाचा पैसा मिळवून दिला.या अभूतपूर्व लढ्यानंतर दादांनी आपले सामाजिक कार्य सुरु ठेवले.याच कालावधीत दादांना एक मोठा धक्का बसला आपला एकुलता एक मुलगा दादांना सोडून गेला.या दुःखातून



दादा बाहेर पडण्याचे एकमेव कारण म्हणजे आपल्या मुलाची राहिलेली अधुरी स्वप्ने पूर्ण करायची या उद्देशाने. आपला एक मुलगा गेला आता आपण हजारो मुलांचे पालक बनायचं म्हणून सोलापूर शहरातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी आपल्या मुलाच्या नावाने नागेश करजगी ऑर्किड स्कुल सुरु केली.इथे शिकणाऱ्या प्रत्येक मुलामध्ये दादा आपल्या मुलाला बघत असतात.या मुलांच्या प्रगतीसाठी दादांनी आद्ययावत अशी शिक्षण प्रणाली उभी केली आहे. यामध्ये ई लर्निंग, वन टू वन ई-लर्निंग क्लास, रोबोटीक लॅब, टॉकिंग ट्री, ऑनलाईन शिक्षणासाठी स्वतंत्र टीव्ही चॅनेल सुरु केले.डीजीटल क्लासरूम पासून सुरु झालेली शाळा आज पेपरलेस शाळेच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. प्रवेशावेळी एक रुपयाही डोनेशन न घेणारी संस्था म्हणून नागेश करजगी ऑर्किड स्कुल कडे पाहिले जाते.सुरुवातीला १३१ विद्यार्थी संख्या असलेल्या

शाळेत आज १६०० हुन अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत हे दादांच्या अथक परिश्रमाचे फळ आहे असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. ज्या पावलांना लहानपणापासूनच ऊन,वारा,पाऊस,पाणी यांच्याशी संघर्ष करायची सवय असते अशी पावले शेवट पर्यंत कधीच थांबत नाहीत.माणसाच्या आयुष्यात तीन संघर्ष ठरलेली असतात एक म्हणजे जगण्यासाठीचा संघर्ष,दुसरा स्वत:ची ओळख निर्माण करण्यासाठीचा संघर्ष आणि निर्माण केलेली ओळख जपण्यासाठीचा संघर्ष. जन्माला येऊन काहीतरी उत्तुंग करण्याची जिद्द बाळगावी,विचारांवर विश्वास ठेवावा आणि आपल्या कर्तृत्वाने ते साध्य करावे, अशी प्रेरणा देणारे आमचे आधारवड दादा. दादांना या अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने ऑर्किड परिवाराकडून मनस्वी शुभेच्छा.

**- संदीप बुरकूल**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### भाजपा युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी सूरज मस्के

**अकलूज, दि. ४ फेब्रुवारी-**

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाचे राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य आणि भाजप युवा नेते सुरज मस्के यांची भाजप युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश सचिवपदी निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीने पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी त्यांच्या निवडीचे पत्र सुपूर्द केले. सूरज मस्के हे भारतीय जनता पक्षाचे सक्रिय युवा नेतृत्व असून, त्यांनी पक्ष संघटनेत महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत, पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. प्रदेश सचिवपदी नियुक्तीनंतर त्यांनी पक्षाच्या ध्येय-धोरणांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. युवा मोर्चाच्या माध्यमातून राज्यातील तरुणांना भाजपशी जोडण्याचे तसेच त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. त्यांच्या निवडीमुळे भाजप युवा मोर्चाला नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





### आ. राणा पाटलांनी दिली संतोष बोबडेंना शाबासकी

**अणदूर, दि. ४ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुका भाजपा अध्यक्ष संतोष बोबडे यांनी भाजपा परिवाराची विचारधारा ही जनमानसात रुजली पाहिजे, यासाठी १००० सदस्यांची नोंदणी केल्याबद्दल त्यांचे आमदार राणा पाटील यांच्या हस्ते अभिनंदन करण्यात आले. प्रदेशाध्यक्ष तथा राज्याचे म हसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही त्यांचे पत्र पाठवून अभिनंदन केले आहे. संपूर्ण राज्यात भाजपा सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून नेते लोकांना सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. प्रत्येक बूथला २५० सदस्यांचे व वरिष्ठ नेते मंडळींना १ हजार सदस्य नोंदवायचे होते. त्याच अनुषंगाने आ. राणा पाटील, संतोष बोबडे, विलास राठोड, विजय शिंगाडे यांनी हे उद्दिष्ट पार केले असून इतर नेते गण हीहे उद्दिष्ट पार करणार आहेत. भाजपा अध्यक्ष संतोष बोबडे आणि तालुका सरचिटणीस तथा सदस्य नोंदणी अभियानाचे तालुका संयोजक विलास राठोड, विजय शिंगाडे यांचे अभिनंदन केले जात आहे.



### राजेश क्षीरसागर, कादर शेख यांना बहुजनभूषण पुरस्कार जाहीर

**टेंभुर्णी, दि. ४ फेब्रुवारी-**

येथील बहुजन प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल, महाराष्ट्र राज्य माध्य व उच्च माध्य. शिक्षण मंडळाचे कोल्हापूर विभागीय अध्यक्ष राजेश क्षीरसागर, जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांना राज्यस्तरीय बहुजनभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. नगर (दक्षिण) चे खा. निलेश लंके यांच्या हस्ते रविवारी ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता टेंभुर्णी फेस्टिव्हलचे उद्घाटन व पुरस्कार वितरण होणार आहे. माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रम ास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्म ीकांत देशमुख, माजी आ. बबनदादा शिंदे, आ. अभिजीत पाटील, गृहराज्यमंत्री रमेश बागवे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित रहाणार आहेत, अशी माहिती बहुजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष वाघमारे यांनी दिली. सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

### मल्लेवाडी येथे मुक्त गोठ्यात ठेवलेल्या तीन जर्शी गायींची चोरी

**मंगळवेढा, दि.४ फेब्रुवारी-**

मल्लेवाडी पशुपालकांनी मुक्त गोठयात ठेवलेल्या ७५ हजार रुपये किंमतीच्या ३ जर्शी गायी चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी विवेक विठ्ठल चौगुले यांची मल्लेवाडी येथे दाते पेट्रोल पंपाशेजारी शेती असून या शेतात गायीसाठी मुक्त गोठा बांधला आहे. त्यामध्ये चार जर्शी गायी व एक रेडी अशी जनावरे असल्याने ते वैरण टाकून गावात दररोज रहावयास जातात. दि.२ रोजी रात्री ८ वाजता गायींना चार टाकून फिर्यादी घरी निघून गेले. दुसर्या दिवशी सकाळी ७ वाजता फिर्यादी हे जनावरांना चारा टाकण्यासाठी शेतात मुक्त गोठ्याजवळ आले असता चार जर्शी गायीपैकी एकच जर्शी गाय फिर्यादीस दिसली. त्यामुळे गायी सुटून बाहेर गेल्या असाव्यात असा त्यांनी कयास करुन सर्वत्र शोधाशोध केली मात्र त्या मिळून न आल्याने फिर्यादीची खात्री झाली की, ७५ हजार रुपये किंमतीची ३ जर्शी गायी संमतीशिवाय अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्या आहेत असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.




# शिक्षण संस्थेतूनच ग्रामविकास साधला जातो : दळवी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**

चंद्रकांत दळवी यांनी दोन्ही कर्मवीरांच्या अण्णा व मामा या नावातच फक्त फरक असून कार्यात साम्य आहे. मामांचे शैक्षणिक कार्य अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत निर्माण झाले आहे. यातूनच संस्थेची उभारणी करण्यात आली आहे. मामा हे दूरदृष्टीचे शिक्षण महर्षी होते. आजच्या शैक्षणिक धोरणाचा पाया असलेल्या कौशल्य विकास शिक्षणाची सुरुवात मामांनी फार पूर्वीच आपल्या संस्थेत केली होती. ग्रामविकास हे संस्थेचे काम आहे. सत्व फौंडेशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विकास साधला जात आहे, असे प्रतिपादन सातारा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी या संस्थेचे संस्थापक, संवर्धक व प्रेरणास्त्रोत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त संस्थेच्यावतीने सोमवारी रोजी संस्थेतील गुणवंत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी निवृत्त आयएएस अधिकारी दिनकरराव जगदाळे होते. यावेळी यावेळी सातारा रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, जनरल सेक्रेटरी पी. टी. पाटील, सहसचिव ए. पी. देबडवार, खजिनदार जयकुमारबापू शितोळे, राजेंद्र पवार आदी उपस्थित होते. दिनकरराव जगदाळे यांनी संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे. मामांच्या बोर्डिंगमधूनच संस्काराचे व जीवनाचे खरे धडे मिळाले. स्वतःच्या मुलाला जसे घडविता तसे अनुभव देणारा व्यक्ती म्हणजे शिक्षक होय. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा पुढच्या पिढीला फायदा व्हावा असे मार्गदर्शन करावे, असे त्यांनी आवाहन केले.यावेळी संस्थेतील ३० सेवनिवृत्तांचा, ६ पीएच. डीधारकांचा, गुणवंत ५ शिक्षक व २० विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तीन गुणवत्ता शाळांचा सत्कार करण्यात आला. यात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा जनता विद्यालय येडशी (धाराशिव जिल्ह्यात प्रथम), महाराष्ट्र विद्यालय बार्शी (पुणे विभाग तृतीय), छत्रपती शिवाजी विद्यालय वाशी (तालुका प्रथम) समावेश आहे. महाराष्ट्र विद्यालयाचे सहशिक्षक शशिकांत लांडगे यांनी तयार केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज व कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविक जयकुमारबापू शितोळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे आणि प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे यांनी करुन दिला. सुरुवातीला डॉ अबोली सुलाखे व विद्यार्थ्यांच्या स्वागतपर गुरुगीताने झाली. आभार डॉ. व्ही. पी. शिखरे यांनी तर सूत्रसंचालन डॉ. रविकांत शिंदे व डॉ. आसावरी फरताडे यांनी केले.



#### डिजिटल शिक्षण काळाची गरज

शिक्षण संस्था हा ग्रामविकासाचा खरा पाया आहे. सेवानिवृत्तीनंतर पुन्हा एकदा कामाची सुरुवात करण्याचा आजचा दिवस आहे. सामाजिक कार्यात सक्रीय रहा, असा सल्ला देत विद्यार्थ्यांनी गांभीर्याने शिक्षण घेण्याची गरज आहे, जास्त वेळ अभ्यास व श्रम करणारेच विद्यार्थी जीवनात यशस्वी होतात. सलग १० ते १२ तास विशिष्ट कार्यात गुंतून रहा, कॉलेज जीवनात अवांतर वाचन करा, थोर व्यक्तींची चरित्रे वाचन करा, भाषण कला जोपासा, व्यक्तिमत्त्व विकासासाठी प्रयत्न करा, स्पोकन इंग्लिशवर भर द्या. विद्यार्थ्यांना स्व ची ओळख करुन द्या. शिक्षण क्षेत्र वेगाने बदलत आहे. प्रचलित आव्हानांना सामोरे जाण्याची गरज आहे. डिजीटल शिक्षण गरजेचे आहे. सध्याची शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक आहे. इंटर ऍक्टिव्ह पॅनलचा वर्गअध्यापनात वापर करा. कृत्रिम बुद्धिमत्ता, कौशल्य विकास, प्रवेश परीक्षा याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, असे आवाहन चंद्रकांत दळवी यांनी केले.

# शिव विचारांचा प्रचार, प्रसार ही काळाची गरज

### प्रा. जगदाळे यांचे प्रतिपादन

### अकलूज येथे शिवविचार बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. ४ फेब्रुवारी-**

शिवचरित्र, जिजाऊंची शिकवण, शिवबांचा जन्म व शिवबांचे बालपण हे विषय घेऊन जगदाळे यांनी महिलांना मार्गदर्शन केले. महिला बौद्धिक, मानसिक, शैक्षणिक, वैचारिक, साहित्यिक, सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात त्यासाठी हा नवीन उपक्रम घेत आहे. हा विचार महिलांना खूप आवडला. महिलांनी कार्यक्रम ासाठी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रत्येक महिन्याच्या रविवारी शिव विचाराचे वाचन होईल. वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवर मंडळी देखील आपल्याला मार्गदर्शन करतील याचे मी नियोजन करून तुम्हाला वैचारिक मेजवानी दर महिन्याला देणार असल्याचे प्रा. मीनाक्षी जगदाळे यांनी सांगितले.

मराठा सेवा संघ प्रणित, जिजाऊ ब्रिगेडच्या माध्यमातून, प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आज पहिल्या रविवारी शिव विचार सर्वांमध्ये रुजवण्यासाठी व जिजाऊंचे विचार घराघरांमध्ये पोहचण्यासाठी शिवविचार बैठक अकलूज (ता. माळशिरस) येथे पुणे विभागीय अध्यक्ष प्रा. मीनाक्षी अमोल जगदाळे यांनी आयोजित केली होती. जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संतश्रेष्ठ श्री जगद्गुरु तुकाराम महाराजांची जयंतीनिमित्त अभंग वाचनाने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला सर्व क्षेत्रातील व सर्व जाती धर्मातील महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.



# अक्कलकोटमध्ये हनुमान मंदिराचे भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

शहरातील बासलेगाव रस्त्यावरील कोहिनूर मंगल कार्यालय शेजारी दिशा विहारमध्ये सुसज्ज उभारण्यात येणाऱ्या श्री वटवृक्ष हनुमान मंदिराचे भूमिपूजन शनिवारी उद्योगपती विलास कोरे, माजी प्रा. चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री स्वामी समर्थ औद्योगिक वसाहतचे चेअरमन राजशेखर हिप्परगी, युवा नेते तथा उद्योगपती महेश शवरी, नगरसेवक नागराज कुंभार व स्वामी विवेकानंद पतसंस्थेचे व्यवस्थापक चंद्रकांत दसले यांची प्रमुख उपस्थिती होती. पौरोहित्य गुड्डय्या स्वामी यांच्या मंत्रोच्चारात आणि हस्ते विधीप्रम ाणे जागेची पूजा करून मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले. कोहिनूर मंगल कार्यालय शेजारी गृहनिम ाण वसाहतीचे मोकळी जमीन आहे. ज्यामध्ये परिसरातील सर्व रहिवाशांच्या निर्णयानंतर येथील मंदिराच्या बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. मंदिराच्या उभारणीच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असून येत्या वर्षभरात भव्य मंदिर उभारणीचे काम पूर्ण होणार आहे. सदर मंदिराची उभारणी लोकवर्गणीतून होणार असून भाविक भक्तांनी हे कार्य पूर्णत्वास जाण्यासाठी सर्व भाविकांनी सढळ हाताने देणगी स्वरूपात मदत करण्याचे आवाहन श्री वटवृक्ष हनुमान मंदिराचे मुख्य संयोजक चंद्रकांत दसले व दिगंबर साळुंखे यांनी केले. या कार्यक्रमास मंडळाचे संस्थापक रमेश शिंदे, अध्यक्ष बसवराज आगरखेड, गुरव समाजाचे प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत गुरव, उद्योजक बाबुराव विभूते, मल्लिकार्जुन पाटील, विरुपाक्ष कुंभार, अनिल शिंदे, सचिन डिग्गे, करसिध्द रोळी, गुरप्पा कुंभार, शांतविरप्पा दसले, बसवराज कुंभार, शंकर माळी व गोविंद शिंदे आदिसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.



# अक्कलकोटच्या स्वयंभू गणेश मंदिरात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ४ जानेवारी**

गणेश जयंती निमित्त श्री वटवृक्ष स्वामी महाराज यांचे विश्रांती स्थान असलेल्या कुरुंदवाडकर संस्थानचे श्री स्वयंभू गणेश मंदिराला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. दिवसभर शेकडो भाविकांना प्रसाद वाटप करण्यात आले.

मंदिराच्या वतीने विविध कार्यक्रमाचे मोठ्या उत्साहात आयोजन केले होते. गणेश जयंतीनिमित्त पहाटे ५ वाजता पुजारी ओंकार ग्रामोपाध्ये व श्रीकांत ग्रामोपाध्ये यांच्या विविध मंत्रोच्चारात अभिषेक व सकाळी ७ वाजता गणेश याग करण्यात आला. तसेच गणेश जयंतीनिमित्त श्री मंदिराला आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. सकाळी साडे अकरा वाजता पाळणा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी श्री गणेशाय नमः चा नामस्मरण करण्यात आले. श्री च्या जयजयकाराने सारे परिसर मंत्रमुग्ध झाले होते. भाविकांसाठी सुलभ दर्शन व्यवस्था, शिरा, जिलेबी, सोनपापडी प्रसाद, पिण्याचे पाणी इत्यादी सुविधा मंदिरतर्फे देण्यात आल्या.

या कार्यक्रमास श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मुख्य पुजारी मोहनराव पुजारी, मुंबईचे नारायण जोलपे, यतीन सावंत, पुण्याचे उद्योगपती नरेश अहिरे, यशवंत धोंगडे, सुधीर माळशट्टी, काशीनाथ खेडगी, निलकंठ हिंडोळे, महेश हिंडोळे, सुनील बंडगर, शरदराव फुटाणे, डॉ. किसन झीपरे, संतोष पराणे, सोमनाथ माळशेट्टी, आनंद कुंभार, सचिन थोरात, चन्नवीर स्वामी,अभिजित हत्ते, रमेश राठोड व इतर गणेश शेकडो भक्तगण उपस्थित होते. सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कुंभार गल्ली तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# अडथळा न ठरणारा पर्यायी रस्ता द्या

### मैंदर्गी रोड रहिवाशांची आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**

मैंदर्गी रस्त्याकडे राहणाऱ्या रहिवाशानां शहरात येण्यासाठी वटवृक्ष मंदिर परिसरातुन एकच रस्ता आहे. हा रस्ता भाविकांच्या वाहनांनी अंत्यत गजबजलेला असतो. रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची उभी वाहने, वाहतुकीची वारंवार होणारी कोंडी व रस्त्यावर येणारी दर्शनरांग, अनेकवेळा रस्त्यावर बॅरेकेटस लावून रस्ता बंद होत असल्याने नागरिकांना पांदीतील रस्ता विकसित करावा, अशी मागणी समर्थ पार्क येथील रहिवाशांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मैंदर्गी रस्ता परिसरात राहणाऱ्या रहिवाशाना शहरात प्रदेश करताना वटवृक्ष मंदिर परिसरातून जावे लागते. गर्दीच्या वेळी नागरिकांना त्रास होत असल्याने त्यांनी ही मागणी केली आहे. अन्नछत्र मंडळ एस टी वाहन तळ येथून चार पदरी रस्त्याला जोडणारा नविन रस्ता विकसित केल्यास भाविकांची वाहने मंदिर परिसरात न जाता थेट वाहन तळ ते चार पदरी महामार्गाला जोडली जातील. यामुळे वटवृक्ष स्वामी मंदिर परिसरातील वाहतुकीची कोंडी टाळणे शक्य होणार आहे. निवेदनावर मेजर राघवेंद्र कोतवाल, मेजर संदीप सलगरे, प्रविण देशमुख, पंचायत समितीचे माजी सदस्य सिध्देश्वर मठपती, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद अक्कलकोट तालुकाध्यक्ष नंदकुम ार जगदाळे, विजयकुमार बाळशंकर, किशोर खरात, योगेश बारसकर, मनोज जाधव, रत्नाकर गुरुव-पाटील, हिराकांत जामदार, शिवकुमार लिबीतोटे, महेश बंदीछोडे, संतोष तोळणुरे, सिध्देश्वर मठपती, गणेश माळी, मल्लिकार्जुन बिराजदार यांनी सह्या केल्या आहेत.



### शिरसी येथून कारची चोरी; अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ४ फेब्रुवारी-**

शिरसी येथे घरासमोर लावलेली दोन लाख रुपये किंमतीची मारुती सुझूकी कंपनीची कारगाडी चोरुन नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, यातील फिर्यादी बाबासाहेब अंबादास पवार (रा.शिरसी) हे कन्स्ट्रक्शन व्यवसायिक असून त्यांनी दोन लाख रुपये किंमतीची एम.एच.११ सी.जे.१२१८ ही मारुती सुझूकी कंपनीची लाल रंगाची ब्रीझा कार रात्री घराच्या समोर लावली होती. अज्ञात चोरट्याने ही कार चोरुन नेल्याचा प्रकार घडल्याने पोलीसात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याचा अधिक तपास पोलीस हवालदार वैभव हाके हे करीत आहेत.

# जेऊरच्या भारत प्रायमरी स्कूलमध्ये ‘बाजार डे’



### विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ४ फेब्रुवारी-**

जेऊर (ता. करमाळा( येथील भारत प्रायमरी स्कूल मध्ये नेहमीप्रमाणे याही वर्षी इयत्ता पहिली ते चौथी, व भारत मॉंटेसरी मधील विद्यार्थ्यांसाठी बाजारा डे चे आयोजन करण्यात आले होते. या बाजारासाठी विद्यार्थ्यांनी व पालकांनी अतिशय मोठ्या प्रमाणामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या बाजाराचे उद्घाटन संस्थेचे सचिव श्री अर्जुनराव सरक सर भारत हायस्कूल व जुनिअर कॉलेजचे प्राचार्य आबासाहेब सरवदे सर भारत प्रायमरीचे मुख्याध्यापक श्री दीपक व्यवहारे सर यांचा हस्ते करण्यात आले यावेळी भारत प्रायमरीमधील सर्व शिक्षक उपस्थित होते. या बाजार डे चे आयोजन सकाळी नऊ ते एक या वेळेत करण्यात आले होते यावेळी मुलांनी सकाळी नऊ वाजल्यापासूनच आपले स्टॉल लावण्यास सुरुवात केली. या बाजाराचे आयोजन कर्मयोगी गोविंद बापू पाटील हॉलमध्ये करण्यात आले होते. दैनंदिन जीवनात मुलांना गणिती व्यवहाराचे ज्ञान व्हावे यासाठी खास या बाजार डेचे आयोजन करण्यात आले होते.तसेच आपल्या शेतामधील शेतमाल विकण्याची संकल्पना मुलांमध्ये रुजावी. हाही यामागे शाळेचा हेतू होता. यावेळी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गणितीय व्यवहाराचे ध्यान मिळाल्यामुळे विद्यार्थी खूपच खुश होते. यामध्ये मुलांनी भाजीपाला फळभाज्या, मेवा, मिठाई, वडापाव, लिंबू सरबत शेतातील हरभरा, ड्रॅगन फ्रुट अशा अनेक पदार्थांची विक्री केली. संस्थेचे उपाध्यक्ष राजुशेठ गादिया, माजी उपसरपंच राजाभाऊ जगताप, ग्रामपंचायत सदस्य समीरा दोशी, व्यापारी संजयकुमार दोशी, सुयोग दोशी, रेणुका दोशी, प्रेमलता दोशी, ऐश्वर्या दोशी, समिधा दोशी, माजी ग्रामपंचायत सदस्य संतोष वाघमोडे, राहुल गोडगे, नाथाराव रंदवे, प्रा. कांबळे, योगेश खंडागळे, मुख्याध्यापक दिपक व्यवहारे, अनिता देशमुख, अमोल पाटील, उत्तरेश्वर गरड, वर्षा भोसले, नितीन पाटील, गणेश हजारे, किशोर गुळमे, मुमताज शेख, सिंधू सरडे उपस्थित होते. संस्थेचे संचालक पृथ्वीराज पाटील, आ. नारायणआबा पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

#### शेतकऱ्यांच्या वेषात विद्यार्थी

या व्यवहारातून अंदाजे ६० हजार ते एक लाख रुपयांची उलाढाल झाली. या बाजाराचे वैशिष्ट्य म्हणजे यावेळी अनेक विद्यार्थी शेतकरी पोशाखामध्ये दिसून आले. विद्यार्थ्यांबरोबरच पालखी या बाजार डेमध्ये उत्साहाने सहभागी झाली होती.

CMYK

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**वेधले लक्ष...**
कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त बार्शी शहरातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सहभागी होऊन पारंपारिक कलाविष्कार दाखविण्यात आला. या कलाविष्काराने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. सर्वत्र याचे कौतुकही झाले.



## संक्षिप्त वृत्त...




### उत्कर्ष विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिन उत्साहात

**सांगोला, दि. ४ फेब्रुवारी-**
सांगोल्यातील उत्कर्ष विद्यालयात जागतिक सूर्यनमस्कार दिन सामूहिक व ऑनलाईन या दोन्ही पद्धतीने साजरा करण्यात आला. सूर्यनमस्कार दिन का साजरा केला जातो, सूर्यनमस्कार घातल्याने शरीराला काय फायदे होतात, तसेच आजच्या धावपळीच्या युगात डायटिंग पेक्षा सूर्यनमस्कार किती गरजेचे व महत्वपूर्ण आहेत याची माहिती शिक्षक मुरलीधर चौरे यांनी विद्यार्थ्यांना दिली. इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सूर्याचे १२ मंत्र सादर करून सूर्यनमस्कारातील विविध प्रकारची ताडासन, हस्तउथानासन, पादहस्तासन, अश्व संचालनासन, चतुरंग दंडासन, अष्टांग नमस्कार, भुजंगासन व अधोमुखश्वासासन ही आसने व मंत्र यांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. यावेळी सूर्यनमस्कार स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शाबासकी देण्यात आली. सदर कार्यक्रम मुख्याध्यापिका विश्रांती बनसोडे, उपमुख्याध्यापिका स्वराली कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीपणे पार पाडला.



### स्वामीनाथ हेगडे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**
अक्कलकोट तालुका कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे यांचे कार्य कौतुकस्पद असल्याचे प्रतिवादन शिवसेना सोलापुर जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे यांनी केले. अक्कलकोट तालुका कामगार सेना तालुका प्रमुख स्वामीनाथ हेगडे यांचा सत्कार शिवसेना सोलापुर जिल्हाप्रमुख अमोल बापू शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी जिल्हा प्रमुख अमोलबापू शिंदे बोलत होते . यावेळी कामगार सेना जिल्हाप्रमुख सायब्बण्णा तेगेंळी शिवसेना जिल्हा उपप्रमुख नानासाहेब शिंदे अक्कलकोट तालुका शिवसेना शहर महिला आघाडी शहर प्रमुख वैशालीताई हावनूर कामगार सेना शहर उपप्रमुख आकाश बबलाद ओम् हावनूर व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



### सोनाई दूध डेअरी, सालगुडे आईस्क्रीम कारखान्यास आग लागून नुकसान

**वैराग दि ४ फेब्रुवारी**
बार्शी तालुक्यातील यावली येथे मोठ्या जिद्दीने आणि कष्टातून उभा केलेल्या युवा उद्योजक रामदास हरिदास सालगुडे यांच्या सोनाई दूध डेअरी व सालगुडे आईस्क्रीमला शॉर्टसर्किटमुळे आग लागून दूध शीतकरण मशीन, कुल्फी बनवण्याचे मशीन, दुग्धजन्य पदार्थ बनवण्याचे मशीन, शीतगृह तसेच पशुखाद्य व इतर मशनरी आणि शेडचे जळून खाक होऊन पुर्ण पणे नुकसान झाले आहे. या अचानक घडलेल्या घटनेमुळे सालगुडे परिवाराला मोठा धक्का बसला आहे. अग्निशामक दल गाडीला आग विजवण्यासाठी तब्बल एक तास लागला एवढी भयानक आग होती यात सालगुडे यांचे मोठे नुकसान झालेच. परंतु सोबत शेजारी असणाऱ्या ऊसतोड कामगारांच्या झोपड्याही जळून खाक झाल्या आहेत. गावाकऱ्यांकडून या घटनेची हळ हळ व्यक्त होत असून सालगुडे यांना प्रशासनाकडून मदतीची मागणी होत आहे.

### अक्कलकोटमध्ये बुलेटच्या कर्णकर्कश आवाजाने नागरिक त्रस्त

**अक्कलकोट, दि. ४ फेब्रुवारी-**
अक्कलकोट शहरात बुलेट दुचाकी वाहनाच्या कर्णकर्कश आवाजाने अबालवृद्ध नागरिक हे त्रस्त झाले आहेत. बुलेट दुचाकी वाहन चालकांवर पोलीस प्रशासन कारवाई करणार का ? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. अक्कलकोट शहरातील युवकांमध्ये बुलेट दुचाकी चालविण्याचे फ्याड निर्माण झाले आहे. अक्कलकोट येथे मोठ्या प्रमाणात युवकांकडून बुलेट चालविण्यात येत आहेत. शहरात या बुलेट दुचाकी वाहनांचा त्रास आता सर्वसामान्य तसेच वयोवृद्ध नागरिक शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी आजारी व्यक्ती यांना होत आहे. बुलेट वाहन चालविणारे युवक हे कर्णकर्कश आवाजात बुलेट दुचाकी चालवीत आहेत. बुलेट वाहनातून मोठा आवाज काढण्यात येत आहे. अक्कलकोट शहरातून बुलेट दुचाकीच्या सायलेन्सर मधून प्रचंड मोठा आवाज काढून लक्ष वेधून घेण्याचे काम केले जात आहे. बुलेट वाहनाच्या कर्णकर्कश आवाजामुळे सर्वसामान्य वृद्ध शालेय विद्यार्थी आजारी व्यक्ती हे त्रस्त झाले आहेत. बुलेट दुचाकी वाहनातून गर्दीच्या ठिकाणी मोठा आवाज काढण्यात येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. बुलेट दुचाकी वाहनातून मोठा आवाज काढणाऱ्या दुचाकी चालक युवकांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे.

अमर रहे, अमर रहे जगदाळे मामा अमर रहे...

# कर्मवीर जयंतीनिमित्त बार्शीत भव्य समाज प्रबोधन रॅली

**हजारो विद्यार्थी अन् शिक्षक सहभागी**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीच्या निमित्ताने बार्शी शहरातील संस्थेच्या १५ शाखांतील हजारो विद्यार्थ्यांनी बार्शी शहरातून राष्ट्रीय एकात्मता, महिला सक्षमीकरण, आरोग्य व व्यसनमुक्ती व कायदेविषयक जनजागृती, अतुल्य भारत, पर्यावरण जनजागृती, आधी विद्यादान मग कन्यादान, भारतीय ज्ञान परंपरा आदी विषयांचे सामाजिक संदेश देत भव्य प्रबोधन रॅली काढली. सोबत लेझीम, टिपरी, तलवारबाजी, लाठी काठी आदी मर्दानी खेळांचे सादरीकरण व आदिवासी, राजस्थानी नृत्य ही लक्षवेधी होते. अमर रहे, अमर रहे जगदाळे मामा अमर रहेंच्या घोषणानी परिसर दुमदुमून गेला होता.

श्री शिवाजी शिक्षण मंडळाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे, लक्ष्मीबाई जगदाळे यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करुन, माजी आयएएस अधिकारी दिनकर जगदाळे व पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते या प्रबोधन रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, विश्वास बारबोले, संतोष ठोंबरे, राजेंद्र पवार, संजय पाटील, संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, सचिव पी.टी. पाटील, उपाध्यक्ष नंदन जगदाळे, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे, डॉ. जी. एम. पाटील, बी. के. भालके, नीलिमा जगदाळे, डॉ. कृष्णा मस्तुद, दिलीप मोहिते यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य, विविध



शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रॅलीच्या अग्रभागी सजवलेल्या ट्रॅक्टरमध्ये कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचा पुतळा ठेवण्यात आला होता. बार्शी शहरातील विविध पंधरा शाखांतील हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. यामध्ये जिजामाता विद्यामंदिरच्या वारकरी दिंडीत ज्ञानबा तुकारामचा जयघोष सुरु होता तर कन्या प्रशालेच्यावतीने संविधान प्रचारवतीने आदिवासी गाण्यावरील कोळी नृत्य सादर केले. महात्मा फुले विद्यामंदिरच्या काठी व लेझीम नृत्यासह आराधी आणि आदिवासी नृत्य आकर्षक होत. कर्मवीर कृषी तंत्र विद्यालयाचा रेशीम शेती अभियानाची माहिती देणारा चित्ररथही लक्षवेधी होता. महाराष्ट्र विद्यालयाचे मुलींचे लेझीम नृत्य, मुलांचे धनगरी व आदिवासी नृत्य, शाळेचे आगामी तीस वर्षाच व्हिजन, किमान कौशल्य आणि व्यवसाय शिक्षणाच्या संधी या विषयावरील चित्ररथ, राजर्षी शाहू विधी महाविद्यालयाच्या कायदाविषयी जनजागृती करणारा चित्ररथ होता. शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाने पर्यावरण वाचवा, आधी विद्यादान मग कन्यादान, शाश्वत विकास या विषयावरील चित्ररथासोबत राजस्थानी आणि झारखंडचे आकर्षक नृत्य सादर केले. शिशु संस्कार केंद्राच्या बाळगोपाळाची कर्मवीर दिंडी साकारली होती.आणि सोबत पोतराज लोककला जतन, जिजाऊ अन मावळ्यांचा ऐतिहासिक चित्ररथ लक्षवेधी होता.

श्री शिवाजी महाविद्यालयाचा मुला मुलींचे लेझीम तसेच अतुल्य भारत अंतर्गत भारतीय वेशभूषा आणि परंपरा सांगणारा चित्ररथ होता. शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची भारतीय ज्ञान परंपरा जिवंत देखावा, लाठी काठी, तलवार बाजी आणि सर्व ऐतिहासिक धाडसी कलेचे सादरीकरण आकर्षक होते. बीपी सुलाखे कॉमर्स कॉलेजने मुले, मुली लेझीम नृत्य वाचन संस्कृतीचा चित्ररथ सहभागी झालेला होता. कॉलेज ऑफ नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी नारी शक्ती देखावा सादर केला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यासह सांस्कृतिक विभाग प्रमुख जयकुमार शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. किरण गाढवे, प्रा. सुरेश लांडगे, प्रा.डॉ. विजय शिखरे यांनी परीक्षण केले. रॅलीमध्ये प्राचार्य ए. बी. शेख, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, प्राचार्य डॉ. दीपक गुंड, प्राचार्य डॉ रत्नदीप सोनकांबळे, प्राचार्य कविता धावणे-मोहिते, मुख्याध्यापक श्रीमती बबिता गवळी, निर्मला पाटील, प्राचार्य पवन गलांडे, डांगे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले.

**रस्त्याच्या दुतर्फा गर्दी**

शहरातील पंचायत समिती चौक, संकेश्वर उद्यान, तानाजी चौक, नगरपालिका, महाद्वार चौक, पटेल चौक, सावरकर चौक, पानखुंट, ऐनापुर मारुती, सोमवार पेठ पांडे चौक आदी शहरातील प्रमुख मार्गावरुन ही रॅली निघाली होती. चौकाचौकात शाळांचे सादरीकरण केले जात होते. सादरीकरण पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा बार्शीकर पालक, महिला व नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. हजारो विद्यार्थी हातात समाज जागृत करणारे घोषवाक्य असलेले फलक घेऊन सहभागी झाले होते.

**नगरपालिका सभागृहात अभिवादन**

लहान चिमुकल्यांना माजी नगराध्यक्ष रमेश पाटील मित्र मंडळ, भगवंत सहकारी नागरी पतसंस्था, बार्शी केमिस्ट असो., प्राईम कम्प्युटर, आर्यन कॉम्प्युटर, डीआयआयटी, पांडुरंग बुक डेपो, त्रिमूर्ती फर्निचर, नजर शॉपी, आदी संस्था व संघटनांच्यावतीने पाणी, चहा, खाऊ, बिस्किटे, वडे, ड्रायफ्रूट आदींचे वाटप करण्यात आले. माजी नगरसेवक दीपक राऊत, ड. महेश जगताप, भैय्या बारगुळे, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, विवेक देशमुख, देवानंद जाधव यांनी देखील संस्था पदाधिकारी यांच्या उपस्थितीत पालिका सभागृहात मामांच्या तैल चित्राला हार घालून अभिवादन केले.



## श्री शिवाजी महाविद्यालयाची नॅकमध्ये 'ए ग्रेड'ची हॅट्रिक

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ४ फेब्रुवारी-**
येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, संस्थेच्या श्री शिवाजी महाविद्यालयाने नॅक पुनर्मूल्यांकनात सलग तिसऱ्यांदा ग्रेड मिळवून ग्रेडची हॅट्रीक पूर्ण केली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी दिली. बंगळूर येथील राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक) यांच्याकडून चौथ्या पुनर्मूल्यांकनासाठी १० व ११ जानेवारी रोजी त्रिसदस्यीय समितीने महाविद्यालयास भेट देऊन अभ्यासक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सोयी-सुविधा आणि विविध उपक्रमांची पाहणी केली. या मूल्यांकनात महाविद्यालयाने ३.१६ हा सीजीपीए प्राप्त केला आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व गुणवत्तापूर्ण शिक्षण सामाजिकदृष्ट्या संवेदनशील असावे, असे ध्येय घेऊन महाविद्यालय नॅकला सामोरे गेले होते. या मूल्यांकन प्रक्रियेसाठी संस्था पदाधिकारी, सदस्य, विश्वस्त यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच नॅक समिती समन्वयक डॉ. समाधान पवार, डॉ. वशिष्ठ गुरमे, विविध विभागाचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परीश्रम घेतले. या मूल्यांकनासाठी महाविद्यालयाचे आजी -माजी विद्यार्थी, पालक समाजातील विविध घटक यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले, असे प्राचार्य डॉ. शेख यांनी सांगितले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनकुमार जगदाळे, सचिव प्रकाश पाटील, सहसचिव अरुण देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, पदाधिकारी व सदस्यांनी प्राचार्य, शिक्षक, प्रबंधक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आदींचे अभिनंदन केले.

## करकंबमध्ये अज्ञात वाहनाकडून पिकअप शेडचे नुकसान

**ऐन उन्हाळ्यात होतेय प्रवाशांची गैरसोय**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ४ फेब्रुवारी-**
जळोली चौक करकंब येथे जळोली,उंबरे,कान्हापुरी,करोळे या गावांना जाणाऱ्या प्रवाशांसाठी पिकअप शेड उभारण्यात आले होते.काही महिन्यापूर्वी सदर पिकअप शेडला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने त्या पिकअप शेडचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने त्याचा वापर प्रवाशांना करता येत नाही.

या मार्गावरती एसटीच्या बसेस ठराविक वेळानेच असल्याने नाईलाजाने प्रवाशांना खाजगी वाहनानेच प्रवास करावा लागत आहे. ती वाहनेही वेळेवर मिळत नसल्यामुळे प्रवाशांना तासन तास उन्हात उभे राहूनच वाहनांची प्रतीक्षा करावी लागत आहे. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे. संबंधित प्रवासी पावसाळा,उन्हाळ्यात या पिकअप शेडमध्ये पाऊस, उन्हापासून बचाव



करण्यासाठी थांबत होते. तो निवाराही बंद झाल्याने लहान मुले,महिला,वृद्ध,आजारी व्यक्ती,प्रवासी यांना उन्हामध्येच उभा राहूनच वाहनांची प्रतिक्षा करावी लागत असल्याने नाहक त्रास सहन करावा लागत आहे.काही महिन्यांपूर्वी सदर पिकअप शेडचे नुकसान झाले आहे तरीपण संबंधित विभागाचे कर्मचारी,अधिकारी यांनी या पिकअप शेडकडे दुर्लक्ष केल्याने ते दुरुस्त किंवा नवीन शेडची उभारणी करण्यात आलेली नाही.संबंधितांनी लवकरात लवकर या पिकअप शेडची दुरुस्ती किंवा नवीन पिकअप शेड उभा करावे व प्रवाशांची होणारी गैरसोय टाळावी अशा प्रकारची मागणी या मार्गावरून प्रवास करणारे नागरीक,प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# विठ्ठल-रखुमाई आता रंगपंचमीपर्यंत दिसणार पांढऱ्या शुभ्र पोशाखात

**वसंतीपंचमीपासून विठुरायाच्या रंगपंचमीस प्रारंभ**

**एरव्ही भरजरी आणि रंगीबेरंगी असतो पोशाख**

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि. ४ फेब्रुवारी-**
वसंतीपंचमीपासून विठुरायाच्या रंगपंचमीस प्रारंभ झाला. त्यामुळे ऐरव्ही दररोज दुपारी पोशाखा नंतर रंगीबेरंगी भरजरी वस्त्रात दिसणारे विठ्ठल आणि रखुमाई आता साधारण एक महिनाभर म्हणजेच रंगपंचमी पर्यंत केवळ पांढऱ्या शुभ्र सुती पोशाखातच दिसणार आहेत. देवाच्या पांढऱ्या शुभ्र पोशाखाला विवाहा नंतरचा आनंदोत्सव म्हणून सुरु झालेल्या रंगपचमीच्या उत्सावाची जरी अध्यात्मिक जोड दिलेली असली तरी खऱ्या अर्थाने बदलेल्या ऋतुमानाचे देखील एक महत्वाचे कारण या काळातील देवाच्या पोशाखा मागचे असल्याचे सांगितले जाते. कारण



ऋतुमानाप्रमाणे विठुरायाच्या खानपानात अर्थात नैवेद्यात आणि पोशाखात देखील बदल करण्याची शेकडो वर्षाच्या परंपरा मंदिरात आज देखील जतन केल्या जाता आहेत हे विशेष आहे.

विठुरायाच्या खानपानात आणि पोशाखा मध्ये देखील प्रत्येक ऋतुमाना प्रमाणे विविध बदल करण्यात येत असतात. याला शेकडो



वर्षाची परंपरा आहे. सनातन किंवा हिंदू धर्मात प्रत्येक सण,उत्सव आणि परंपरेला शास्त्राचा एक आधार आहे. या शास्त्रीय आधार असलेला परंपरेलाच अध्यात्मिकतेची देखील जोड देण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे या सर्व प्रथा, परंपरे नुसारच मंदिरातील सण, उत्सव साजरे होतात. या सण उत्सवाच्या वेळी प्रथा,परंपरेला अनसरुनच विठ्ठल रुक्मिणीच्या खानपान (नैवेद्य) आणि पोशाखाची देखील दक्षता घेतली जाते. येथील मंदिरात या सर्व गोष्टी आज देखील कटाक्षाने पाळल्या जात आहेत. भगवान कृष्ण म्हणजे विठ्ठलच होय. कौडिंण्यपूरात रुक्मिणीमातेचे अपहरण झाल्यानंतर तिचा भगवान श्री कृष्णाबरोबर व्दारके जवळ विवाह सोहळा संपन्न झालेला होता. तो वसंत पंचमीचा दिवस होता. त्यामुळे विठ्ठल रुक्मिणीच्या लग्नाचा उत्सव वसंतपंचमीच्या दिवशी थाटामाटात साजरा केला जातो. वास्तविक पाहता शिशिर ऋतु म्हणजे थंडी संपून वसंत ऋतु म्हणजे उन्हाळा सुरु होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो.वसंत ऋतूच्या आगमनाने सर्व सृष्टी फुलून जाते. सर्वत्र चैतन्याचे वातावरण तयार होते. वसंतपंचमीचा दिवस रती आणि कामदेवाच्या पूजेचा असल्याचे देखील मानल जाते. वसंत ऋतूच्या आगमनाने सर्व सृष्टीमध्ये चैतन्य आल्याचेच हे प्रतिक आहे. त्यामुळेच वसंतपंचमीच्या देवाच्या विवाह सोहळ्या पासून त्यांच्या रंगपंचमीस देखील खऱ्या अर्थाने प्रारंभ होत असतो.

**दररोज गुलालाची उधळण**

या काळात दररोज गुलालांची उधळण भगवंताच्या अंगावर केली जाते. यावेळी गुलाबदाणीतून विठ्ठल आणि रुक्मिणीच्या मुर्तीवर गुलाबपाणी देखील शिंपडले जाते. वसंतपंचमी पासून ते रंगपंचमी पर्यंत म्हणजे जवळपास एक महिना विठ्ठलाची रंगपंचमी सुरु राहणार असते. या रंगपंचमी उत्सवाचा शुभारंभ वसंतपचंमीच्या निमित्ताने रविवारी येथील मंदिरात झालेला आहे. त्यामुळे ऐरव्ही दुपार नंतर वेगवेगळ्या रंगातील भरजरी पोशाखात दिसणारे विठुराय आणि रखुमाईमाता आता रंगपंचमी पर्यंत केवळ पांढऱ्या शुभ्र सुती पोशाखातच दिसणार आहेत. मुळातच राजससुकुमार असे वर्णिलेल्या विठुरायाचे रुप या पांढऱ्या शुभ्र सूती पोशाखात दखील अधिकच लोभस भासते आहे.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## इटकळ येथे अणदूर बीटस्तरीय शिष्यवृत्ती सराव परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.४ फेब्रुवारी -**

अणदूर बीटचे शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या पुढाकाराने व मार्गदर्शनाखाली मंगळवार दि.४ फेब्रुवारी रोजी अणदूर, इटकळ व केशेगाव शाळेत बीट स्तरीय पाचवी व आठवी शिष्यवृत्ती सराव परीक्षा क्र.४ घेण्यात आली.

या परीक्षेत इ. पाचवीचे २०० विद्यार्थी व इ. आठवीचे ८० विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली.

सदरील परीक्षा घेण्यासाठी पेपर काढणे व त्याची प्रिंट काढणे ह्याची जबाबदारी अणदूरचे केंद्रप्रमुख गोविंद पवार, इटकळचे केंद्रप्रमुख बळवंत सुरवसे, वत्सलानगर शाळेचे शिक्षक शिवदास भागवत, बाभळगावचे पदवीधर शिक्षक राजकुमार कसबे, इटकळ शाळेचे पदवीधर शिक्षक सतिश ढोणे, रविंद्र गायकवाड, केशेगावचे पदवीधर शिक्षक गणेश कानडे यांनी काम पाहिले.

परीक्षा केंद्र संचालक म्हणून इटकळ चे मुख्याध्यापक तानाजी गायकवाड, अणदूरचे मुख्याध्यापक गोविंद पवार व केशेगावचे मुख्याध्यापक प्रकाश कांबळे यांनी काम पाहिले.

पर्यवेक्षक म्हणून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांनी काम पाहिले.



## संक्षिप्त वृत्त...



### दिंडीतील वारकऱ्यांना टोप्यांचे वाटप

**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

तुळजापूर येथून जाणारी शक्तीपीठ ते भक्तीपीठ पायी दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी दिंडीतील पालखीचे पूजन कारण्यात आले. तसेच आनंद कंदले मित्र मंडळाच्या वतीने सर्व वारकऱ्यांना उन्हापासून सौरक्षणासाठी युवा नेते विनोद गंगणे यांच्या हस्ते टोपी भेट देण्यात आली. यावेळी विजय कंदले, सज्जनराव साळुंके, नरेश अमृतराव, सतीश बांडे, अनंत माऊली सावंत, प्रभाकर नाईकवाडी, सुरेश महाराज डेरके, महादेव पौळ, सर्जेराव निकम, दत्ता हंगरगेकर व बारालिंग भजनी मंडळ सर्व वारकरी उपस्थित होते.

### प्रदेशाध्यक्षपदी कृष्णा रोचकरी यांची निवड

**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

समाजवादी पक्षाच्या युवक प्रदेशाध्यक्षपदी कृष्णा रोचकरी यांची निवड करण्यात आली आहे. मुंबई येथील



समाजवादी पक्षाच्या राज्य बैठकीत प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी यांनी रोचकरी यांच्या निवडीची घोषणा केली. याप्रसंगी भिवंडीचे आमदार रईस शेख, प्रदेश सचिव परवेझ सिद्दीकी, मा.आ. अनिस अहमद आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. आबू आझमी यांनी आगामी न.पा., जि.प. व पं.स. निवडणुकीची तयारी करण्याची सूचना दिल्या. दरम्यान आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणूका समाजवादी पक्षाच्या चिन्हावर लढवणार असल्याचे कृष्णा रोचकरी यांनी सांगितले. यावेळी महावीर मुळे, अंतू डोंगरे राहुल जाधव, रविराज शिंदे, ॲड. उदय भोसले आदींची उपस्थिती होती.



### अनिशा लोखंडे हिची निवड

**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रूईभर येथील कला शाखेची अनिशा लोखंडे या विद्यार्थिनीची धाराशिव पोलीस चालकपदी निवड झाली. पोलीस चालक पदासाठी झालेल्या परीक्षेत अनिशा लोखंडे यांनी यश संपादन केले. जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमातून धुत्ता ग्रामीण भागातील लोखंडे यांनी आपले यश संपादन केले. लोखंडे यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते शॉल, बुके देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक जयप्रकाश कोळगे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### मिटकर यांच्या आत्मचरित्राच्या आवृत्तीचे प्रकाशन

**नळदुर्ग, दि.४ फेब्रुवारी -**

उमाकांत मिटकर यांचा सामाजिक प्रवास अनेक आव्हानांनी व्यापलेला आहे. सर्व अडचणीवर मात करीत त्यांनी सिद्ध केलेली समाजनिष्ठा प्रेरणादायी आहे. समाजातील वंचित घटकांसाठी कार्य करण्याची मिटकर यांची उर्मी निश्चितपणे सकारात्मक बदल घडवुन आणणारी आहे. मिटकर यांच्यासोबत 'डिव्हाईन जस्टिस' या पुस्तकाचे लिखाण करणारे दत्ता जोशी यांचेही मी हार्दिक अभिनंदन करतो, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. मिटकर यांची नियुक्ती पुढे पोलीस प्राधिकरणावर झाली. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याच्या वाटचालीला नवी दिशा मिळाली. हिंदी आवृत्तीचे प्रकाशन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले आहे. हिंदी आवृत्तीच्या पुस्तकाचा अनुवाद हिंदी भाषेचे प्रकांड पंडित प्राचार्य वेदकुमार वेदालंकार यांनी केले आहे.



### न.प. शाळेचे क्रीडा स्पर्धेत यश

**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

येथील समता नगरातील नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ११ या शाळेतील विद्यार्थ्यांनी व क्रीडा स्पर्धेमध्ये घवघवीत यश मिळवले आहे. धाराशिव शहरातील नगर परिषद शाळा क्रमांक ११ मधील विद्यार्थिनी खो-खो स्पर्धेत मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक तर मुलांच्या संघाने द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच थ्रो बॉल स्पर्धेत मुलींच्या संघाने द्वितीय व क्रिकेटमध्ये मुलांच्या संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. वैयक्तिक क्रीडा प्रकारात आलिया फारुख मुजावर हिने १०० मीटर धावण्याच्या प्रथम तर मोठ्या गटात ऐश्वर्या राम घोडके या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक तसेच २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत तस्मिया फारूक मुजावर हिने प्रथम क्रमांक मिळविला आहे. या यशाबद्दल पृथ्वीराज पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक ए.ए. लावंड, मार्गदर्शक शिक्षक बी.यु. शेंडगे, डी.एम. खारे, जे.पी. अडसुळ, के.के. पवार, ए.डी. जाधव यांचे मार्गदर्शन लाभले.

---

### पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे तुळजाभवानी मंदिरांमध्ये भाविक तोकड्या कपड्यांत आणि असात्विक वेशभूषेत...

# मंदिराचे पावित्र्य रक्षणासाठी तुळजाभवानी मंदिरात वस्त्रसंहिता लागू करा

### महाराष्ट्र मंदिर महासंघाची जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांच्या अध्यक्षांकडे मागणी



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

तुळजाभवानी मंदिरात मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी वस्त्रसंहिता लागू करा अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे यांना पुजारी मंडळाचे माजी अध्यक्ष किशोर गंगणे, ॲड. शिरीष कुलकर्णी आणि विनोद रसाळ यांनी दिले आहे.

सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, मंदिरे ही हिंदु धर्माची आधारशीला असून हजारो वर्षे परकियांची आक्रमणे होऊनही आज मंदिरामुळे हिंदू संस्कृती टिकून आहे.

मंदिरे ही ईश्वरी चैतन्याचा स्त्रोत असून भाविक आणि भक्तांना मनःशांती प्रदान करणारी आणि अव्याहतपणे अध्यात्मिक ऊर्जा पुरवणारी केंद्रे आहेत.

हिंदु धर्म आणि हिंदु संस्कृती यांच्या रक्षणासाठी आणि हिंदूंच्या जीवनाचा अविभाज्य घटक असणाऱ्या मंदिरांचे पावित्र्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. पूर्वी मंदिरांमध्ये सात्विक वेशभूषा करून हिंदू जात असत; मात्र अलीकडे पाश्चात्य संस्कृतीच्या आक्रमणामुळे अनेक हिंदू मंदिरांमध्ये तोकड्या कपड्यांत आणि असात्विक वेशभूषेत जात असल्याचे निदर्शनास येत आहे.

त्यामुळे मंदिरांचे पावित्र्य टिकवण्यासाठी मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र शासनाने वर्ष २०२० मध्ये राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात वस्त्रसंहिता लागू केली आहे.

इतकेच नव्हे, तर देशातील अनेक मंदिरे, गुरुद्वारा, चर्च, मशिदी आणि अन्य प्रार्थनास्थळे, शाळा-महाविद्यालये, खाजगी अस्थापने, न्यायालये, पोलीस खाते, राज्य परिवहन मंडळ (एस.टी.) आदी सर्वच क्षेत्रांत वस्त्रसंहिता लागू आहे.




बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले उज्जैनचे श्री महाकालेश्वर मंदिर, महाराष्ट्रातील श्री घृष्णेश्वर मंदिर, वाराणसीचे श्री काशी विश्वेश्वर मंदिर, आंध्रप्रदेशचे श्री तिरुपती बालाजी मंदिर, केरळचे विख्यात श्री पद्मनाभस्वामी मंदिर, कन्याकुमारीचे श्री माता मंदिर अशा काही प्रसिद्ध मंदिरांमध्ये अनेक वर्षांपासून भाविकांसाठी सात्विक वस्त्रसंहिता लागू आहे.

---

# अनुदानाचे पैसे मिळण्याच्या प्रतीक्षेत शेतकरी

### काही शेतकऱ्यांची नावे यादीत आली तर काही शेतकऱ्यांची नावे शासनाच्या कार्यालयातच...

**तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप**
**तेरखेडा, दि.४ फेब्रुवारी -**

अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या धाराशिव जिह्यातील शेतकऱ्यांना २०२३-२४ चे नैसर्गिक आपत्तीपोटी राज्य सरकारकडून मदत जाहीर करून बराच कालाधी झाला. मात्र प्रत्यक्षात मदत मात्र आणखी शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाली नाही. त्यामुळे शेतकऱ्याच गणित कोलमडलय.



जुलै २०२४ दरम्यान जिल्ह्यात मोठी अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होत. वाशी तालुक्यात देखील सर्व मंडळात अतिवृष्टीचा पिकांना जोरदार फटका बसला होता. हजारो हेक्टर क्षेत्रातील पिके पाण्याखाली गेली होती. शेतकऱ्यांनी पंचनामे करून मदत जाहीर करावी अशी मागणी केली होती. शासनाने काही काळानंतर अतिवृष्टीमुळे पिकाच्या नुकसान भरपाईपोटी निधी मंजूर केला. आणि शेतकऱ्यांना मदतीची प्रतीक्षा लागली आज याद्या लागतील, उद्या याद्या लागतील अखेर मागील काही दिवसात शेतकऱ्यांची प्रतीक्षा संपली अनू अनुदानाच्या याद्या गावागावात लागल्या, मात्र त्या अपूर्णच काही शेतकऱ्यांची नावे यादीत आली तर अनेक शेतकऱ्याची नावे शासनाच्या कार्यालयातच राहिली असेच म्हणावे लागेल. कारण मोठ्या संख्येने शेतकऱ्यांना अतिवृष्टीची मदत मिळवण्यासाठी आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर गावाच्या तलाठी कार्यालयात जमा केली होती. त्यातील काही शेतकऱ्यांची नावे अनुदान यादीत आली तर काही शेतकऱ्यांची कागदपत्रे देऊन देखील आणखी नाव यादीत आले नसल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तर ज्या शेतकऱ्यांची नावे यादीत आल्यानंतर ई-केवायसी केली होती त्यांचे देखील अद्याप मदतीचे पैसे खात्यावर जमा झाले नाहीत. त्यामुळे राहिलेल्या शेतकऱ्यांची नावे कधी येणार? व ई-केवायसी झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीचे पैसे कधी जमा होणार असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## मंगरुळ येथील विद्यार्थी आर्यन शिंदे अबॅकस स्पर्धेत देशात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.४ फेब्रुवारी -**

राज्यस्तरीय प्रोऍक्टिव्ह अबॅकस स्पर्धा कोल्हापूर येथे २८ जानेवारी रोजी संपन्न झाल्या असून या स्पर्धेत तुळजापूर तालुक्यातील मौजे मंगरुळ येथील श्री कोचिंग क्लासेसचा विद्यार्थी आर्यन अमोल शिंदे (खोताचीवाडी) याने प्रथम क्रमांक मिळवला नॅशनल अबॅकस स्पर्धेत आर्यन शिंदे याने ४ मिनिटांत १०० गणिते अचूक सोडवून देशपातळीवर प्रथम क्रमांक पटकावला आहे.



या स्पर्धेत देशातील अनेक राज्यातील ५६०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्याच्या या यशाबद्दल प्रोऍक्टिव्ह अबॅकसचे भव्य सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

विशेषतः आर्यन शिंदे याने जून२०२४ मध्ये सोलापूर येथे झालेल्या नॅशनल अबॅकस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला होता. तसेच डिसेंम्बर २०२४ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून जानेवारी २०२५ या राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र होऊन देशातून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

आर्यनच्या या यशाबद्दल त्याला मार्गदर्शन करणारे गुरू आशिष साठे व आर्यनचे तुळजापूर तालुक्यातुन अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

---

## परंडा तालुक्यात बिबट्याची दहशत कायम; रेड्यावर हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.४ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील गेल्या दोन महिन्यापासून बिबट्याने आतापर्यंत १७ ते १८ जनावरांवर हल्ले करून त्या पशुचा जागेवर जीव घेतला आहे. तरी देखील वनविभागातील कर्मचारी यांना बिबट्या पकडण्यात यश आले नाही. त्यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गात सध्या घबराटीचे वातावरण पसरले आहे.



दि.४ रोजी पहाटे ४ वाजणेच्या सुमारास परंडा शहरापासून तीन किमी. अंतरावर बदरवाडी येथे एका रेड्यांवर हल्ला केला आहे. यापूर्वी घारगाव व कांदलगांव आवारपिपरी अशा इतर गांवातील जनावरांवर हल्ला केला आहे. या तालुक्यात काही भागात रात्रीच्या वीज पुरवठा करण्यात येत असल्याने शेतकरी वर्गाना आपल्या पिंकाना पाणी देण्यासाठी जावे लागते. पण या बिबट्याच्या भितीमुळे शेतकरी वर्ग सध्या शेतात जाण्यास तयार नाही. इतकी मोठी दहशत सध्या तालुक्यात निर्माण झाली आहे. तसेच सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढण्यास सुरुवात झाली आहे. तसेच या तालुक्यात सिंचन क्षेत्र वाढल्याने पिकांना पाणी वेळेवर न मिळाल्याने उत्पादनात घट होण्याची भीती शेतकरी वर्गात निर्माण झाली आहे.

तेव्हा वरिष्ठ अधिकारी यांनी त्वरित बिबट्याला पकडण्यासाठी विशेष प्रयत्न करुन शेतकरी वर्गास भय मुक्त करावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

### सोयाबीन खरेदी करीता ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ द्या : खा. राजेनिंबाळकर

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट घेवून धाराशिव लोकसभा मतदार संघातील सर्व ११ तालुक्यातील नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांकडील सोयाबीन करीता मुदतवाढ देणेबाबत खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे.

धाराशिव, औसा, निलंगा आणि बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या नाफेड योजनेअंतर्गत सोयाबीन विक्रीसाठी नोंदणी केली होती. एकूण ४४,०१३ शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत फक्त १५,७४९ सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे. तर उर्वरित २८२६४ नोंदणीकृत सोयाबीन खरेदी अद्याप प्रलंबित आहे.

## ऑनलाईन सोयाबीनची नोंद केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी ठप्प

### आज रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील महाराष्ट्र शासनाने सोयाबीन ऑनलाईन नोंद झालेली ते सोयाबीन शासनाने दिलेल्या हमीभावात खरेदी केले नाही. ५ फेब्रुवारी बुधवार रोजी दुपारी १२ वाजता जुन्या बसस्टॅन्ड चौकात सोयाबीन भरलेल्या वाहनासकट रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार म्हणून तालुक्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन दिले आहे.



सदरील निवेदनात असे म्हटले आहे की, तुळजापुर तालुक्यातील शेतकऱ्यांनी रक्ताचे पाणी करुन सोयाबीन पिकवले असुन तसेच महाराष्ट्र शासनाने सोयाबीन खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना ऑनलाईन करण्याबाबत कळविले होते.

त्याअनुषंगाने तुळजापुर तालुकयातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या ऑनलाईन सोयाबीनची नोंद केली आहे. परंतु आजतागायत शेतकऱ्यांच्या सोयाबीन शासनाने खरेदी केले नाही. ते त्वरीत तुळजापुर तालुक्यामध्ये जेवढ्या शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली त्यांचे सोयाबीन हमीभाव प्रमाणे खरेदी करण्यात यावे, अन्यथा दि.५ फेब्रुवारी रोजी बस स्टॅन्ड समोर सोयाबीन नि भरलेल्या वाहनासह रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा सदरील निवेदनात दिला आहे.

सदरील निवेदनावर शिवसेनेचे शाम पवार, महेश गवळी, बालाजी रोचकरी, भास्कर क्षीरसागर, अतुल हावळे, भुजंग जानराव, कैलास जानराव, वैभव जानराव, प्रविण जानराव, यांच्यासह शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

## शुद्ध पाणी पुरवठा चालु करा; अन्यथा ग्रा.पं.ला टाळे ठोकणार

### आम आदमी पार्टी आणि रासपचा तेर ग्रामपंचायतीला इशारा...

**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.४ फेब्रुवारी -**

तब्बल दहा ते बारा वर्षांपासून बंद असलेला शुद्ध पाणी पुरवठा पंधरा दिवसात चालू करा अन्यथा ग्रामपंचायतला टाळे ठोकू असा इशारा आम आदमी पार्टी व रासपच्या वतीने निवेदनाद्वारे तेर ग्रामपंचायतीला दिला आहे.



यापूर्वीही तेरमधील ग्रामस्थांना शुद्ध आणि स्वच्छ पाणीपुरवठा करावा यासाठी जलसमाधी आंदोलनाचे हत्यार उपसावे लागले होते. त्यावेळी ४ ते ५ महिन्यांमध्ये पाणी चालू करू असे आश्वासन संबंधित अधिकाऱ्यांनी दिले होते. तरीही पाणी चालू झाले नाही. म्हणून पुन्हा एकदा सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात एक निवेदन देऊन ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकून आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला होता तरीही पाणी पुरवठा सुरू झाला नाही. वारंवार निवेदने दिल्यानंतरही ग्रामपंचायत कार्यालय तळ्यामध्ये मुबलक प्रमाणात पाणी असतानाही तेरमधील ग्रामस्थांना स्वच्छ आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यास असमर्थ ठरत असल्याने आम आदमी पार्टी आणि राष्ट्रीय समाज पार्टी यांच्या वतीने उपसरपंच श्रीमंत फंड यांना निवेदन देण्यात आले आहे. ग्राम पंचायतने लवकरात लवकर पाणी चालू करावे अन्यथा ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोकून आंदोलन करणार असल्याचे निवेदनात म्हंटले आहे. सोमवारी (दि.३) हे निवेदन देण्यात आले.


१५ दिवसांच्या मुदती नंतर ग्रामपंचायत कार्यालयास टाळे ठोको आंदोलन करून जोपर्यंत पाणी चालू होत नाही तोपर्यंत आम्ही माघार घेणार नाहीत अशी भुमिका नागरिकांनी घेतली आहे. या निवेदनावर आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पिंपळे, राष्ट्रीय समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष सचिन देवकते, केशव सलगर, रमाकांत लकडे, गणेश मस्के, किरण नाईकवाडी, सोमा धायगुडे, शिवाजी पडुळकर, विजय कुमार वैद्य इत्यादी ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

उपसरपंच श्रीमंत फंड यांनी पाठपुरावा चालू असून लवकरच पाणीपुरवठा चालू करण्यात येईलें असे आश्वासन दिले असल्याचे तानाजी पिंपळे यांनी सांगितले.

## डॉ. मुरहरी केळे लिखित 'एडका' या ग्रंथास उत्कृष्ट वाड;मयनिर्मितीचा पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

वाशी तालुक्यातील 'केळेवाडी' गावचे सुपुत्र तथा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मुंबईचे निवृत्त संचालक डॉ. मुरहरी केळे यांनी लिहिलेल्या 'एडका' या आत्मचरित्राला नुकताच सोलापूर येथील जेष्ठ लेखक आणि कवी गोविंद काळे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे वडील कै. ज्ञानोबा बापू काळे यांच्या नावाने राज्यस्तरीय उत्कृष्ट वांग्मय निर्मितीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.



सदर पुरस्काराचे स्वरूप ५ हजार रूपये रोख, सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ व पुष्पहार असे असून तो देऊन लेखकाचा सत्कार करण्यात येईल. डॉ. मुरहरी केळे हे उच्चविद्याविभूषित व्यक्तिमत्व व जेष्ठ उर्जातज्ञ असून संत साहित्य व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जीवनाअभ्यास करणारे एक प्रसिद्ध लेखक आहेत. सदरचा पुरस्कार भारत माता ज्ञानपीठातर्फे विटा येथे आयोजित ९ फेब्रुवारीला, ४३ व्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनामध्ये, संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते व कवी संमेलनाध्यक्ष आनंदहरी यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रधानमंत्री आवास योजना २.० मोफत नोंदणी शिबिरास प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याद्वारे ज्या नागरिकांची स्वतःची जागा आहे.

परंतु पक्के घर नाही अशा कुटुंबाकरिता पंतप्रधान आवास योजना २.० जाहीर केलेली असून तालुक्याचे आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या आदेशाने व युवक नेतृत्व विनोद गंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्या वतीने अपसिंगा रोड मेतीझरा लमान तांडा येथे प्रधानमंत्री आवास योजनेच्या २.० लाभार्थ्यांचे मोफत नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले.

यामध्ये लाभार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला व नोंदणी करून घेण्यास सुरुवात करण्यात आली.

यावेळी युवा नेते इंद्रजीत साळुंके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुहास गायकवाड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष संदीप गंगणे, शहर सरचिटणीस धैर्यशील दरेकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष राम चोपदार, दिनेश क्षीरसागर, सागर पारडे, लालसिंग पवार, नितीन पवार, रमेश राठोड, सुरेखा पवार, अनुराधा चव्हाण, सीमा पवार, ताईबाई पवार, सोनाबाई पवार, कमलबाई पवार, विमल पवार यांच्या सह परिसरातील नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### सावता परिषदेचा वर्धापन दिन साजरा

**परंडा, दि.४ फेब्रुवारी -**

परंडा येथे संत सावता महाराज मंदिर येथे सावता परिषदचा अठरावा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संत सावता महाराज मंदिरात सावता माळी प्रतिमेची पूजा करून हा कार्यक्रम उत्साहात पार पाडण्यात आला.

हा कार्यक्रम सावता परिषद महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सावता परिषद आमचा अठरावा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात विविध समाजातील उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. ओम वाघमारे, संस्कार गवारे, सार्थक राऊत, प्रतीक येवारे, रोहिणी मेहर, शिव नारायण मेहर, अथर्व जाधव, पुनिन मुजावर, गणराज गायकवाड अशा

एकूण ११ खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी शिवाजी येवारे सावता परिषद प्रदेश संघटक राहुल वाघमारे, धनंजय आदलिंगे, गणेश जमदाडे, राजु आलबते, डॉ. सोमनाथ इतापे, योगेश राऊत, संजय म्हेत्रे, धोंडीराम मोहोळकर, नारायण मेहर, शिवाजी मेहर, अजीम मुजावर आदी मान्यवर उपस्थित होते.



### निवृत्तीनिमित्त काशिनाथ राठोड यांचा सपत्नीक सत्कार

**जळकोट, दि.४ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील आलियाबाद येथील रहिवासी काशीनाथ सिताराम राठोड हे भारतीय सैन्य दलातून १८ वर्ष सेवा पुर्ण करुन

सेवानिवृत्त झाल्याबद्दल ग्रामपंचायतीच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम गावातून वाजत गाजत देश सेवा केल्याबद्दल काशीनाथ राठोड यांची मिरवणूक काढण्यात आली. येथील संत सेवालाल महाराज यांच्या मंदिरात ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी जि.प. सदस्य प्रकाश चव्हाण, माजी नायब तहसीलदार माणिकराव चव्हाण, उपसरपंच अमृता चव्हाण, काशीनाथ राठोड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास सरपंच सुर्यकांत

चव्हाण, ज्योतिका चव्हाण, ग्रामपंचायत सदस्या शांताबाई राठोड, कांताबाई पवार, कमळाबाई राठोड, धानाबाई राठोड, सुभाष नाईक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष विनायक चव्हाण, शिवाजी राठोड, पोलीस पाटील पांडुरंग चव्हाण, नेमिनाथ चव्हाण, सिताराम राठोड, माणिक राठोड, सिद्राम पवार,

यशवंत राठोड, बाबुराव चव्हाण, सुभाष चव्हाण, शिवाजी चव्हाण, हरीदास राठोड, बाबु राठोड, अरुण चव्हाण, सुनील राठोड, गोविंद चव्हाण, वसंत चव्हाण, रतन चव्हाण, मोतीराम राठोड, शंकर चव्हाण, सुनील चव्हाण आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# परिवर्तन संस्थेचे कार्य प्रेरणादायी

### पन्नालाल सुराणा यांचे मत

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.४ फेब्रुवारी -**



सध्याच्या ज्वलंत प्रश्नावर प्रबोधनाचं काम करण्याचे कार्य परिवर्तन संस्था गेली अठ्ठावीस वर्षे सातत्याने करीत असून, परिवर्तन सामाजिक संस्थेचे कार्य प्रेरणादायी आहे, असे मत ज्येष्ठ समाजवादी नेते पन्नालाल सुराणा यांनी व्यक्त केले. परिवर्तन सामाजिक संस्थेच्यावतीने संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल संविधान सन्मान परिषद आयोजित करण्यात आली होती. सुराणा हे अध्यक्षपदावरून बोलत होते.

यावेळी संविधान परिषदेला मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत डॉ. सुरेश वाघमारे म्हणाले की, परिवर्तन संस्था सातत्याने गेले २८ वर्षे ही प्रबोधनाचे कार्य करीत आहे. संविधान जागर करत आहे. हे अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. संस्थेचे सचिव मारुती बनसोडे यांनी प्रास्ताविकात संस्थेने केलेले विविध कार्याचा आढावा सांगितला.

यात पोतराज प्रथा निर्मूलन, महिला सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, पंचायत राज या विषयावर आजपर्यंत केलेलं काम त्यांनी सांगितले. संस्थेचे हे पुरस्कार वितरणाचे २३ वे वर्ष आहे.

या कार्यक्रमासाठी राज्यातील विविध भागातील कला, क्रीडा, साहित्य, समाजसेवा, पत्रकारिता, युवा क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्यांना परिवर्तन राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. राजा सोनकांबळे, ॲड. मैना भोसले वडणे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब वडवे, संस्थेच्या संचालिका रेश्माताई बनसोडे उपस्थित होत्या. या कार्यक्रमात १८ जणांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी केले तर आभार बाबासाहेब वडवे यांनी मानले. या कार्यक्रमाला महिला, पुरुष, युवक उपस्थित होते.

## देशपातळीवरील अबॅकस स्पर्धेत मंगरुळच्या विद्यार्थ्यांचा डंका



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.४ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील आशिष साठे यांच्या श्री कोचिंग क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी देशपातळीवर प्रोॲक्टिवह अबॅकस स्पर्धेत दहा विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करून मंगरुळचा शैक्षणिक डंका देशपातळीवर वाजवला आहे.

राष्ट्रीय अबॅकस स्पर्धा नुकत्याच कोल्हापूर येथे संपन्न झाल्या असून या स्पर्धेत आर्यन शिंदे याने प्रथम क्रमांक पटकावला तर याच स्पर्धेत जुबेर शेख, श्रुती डोंगरे, अदनान मकानदार, इंद्रायणी हुककीरे, ह्दया जगताप, ईश्वरी चौधरी, समेरा मकानदार, रुद्र जांभळे या विद्यार्थ्यांनी यामध्ये यश संपादन करून देशातुन बेस्ट पेरफॉमन्स ट्रॉफी (सर्वोत्कृष्ट कामगिरी) मिळवली. ६ मिनिटामध्ये १०० गणिते सोडवण्याचा या स्पर्धेत विद्यार्थींनी ३ ते ४ मिनिटांत १०० गणिते सोडवून नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे.

मंगरुळ परिसरासह तुळजापूर तालुक्यातुन राज्यभरातील शिक्षण तज्ज्ञांतुन या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या आशिष साठे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

## १०८ महिलांनी सूर्यनमस्कार करुन केली रथसप्तमी साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.४ फेब्रुवारी -**

येथील योगा सेंटरच्या महिलांनी रथसप्तमीनिमित्त सलग १०८ सूर्यनमस्कार करून अनोखी आणि आगळीवेगळी अशी रथसप्तमी साजरी केली.

रथसप्तमीचे विशेष महत्त्व असून सूर्याच्या उपासनेचा हा दिवस असल्याने महिला या दिवशी सूर्याची उपासना करून गोडधोड पदार्थ करतात आणि हा सण साजरी करतात. परंतु येथील श्री योगा सेंटरच्या संचालिका सकल्पना बोरा दरवर्षी रथसप्तमीनिमित्त योगा सेंटरमध्ये मोफत योगा ठेवून सलग १०८ सूर्यनमस्कार घेतात. यावेळी सलग न थकता १०८ सूर्यनमस्कार करणाऱ्या शोभा हनुमंत शिंदे यांना बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. महिलांसाठी आठ दिवस मोफत योगाचे प्रशिक्षण दिले. यामध्ये महिलांनी आरोग्यवर्धक असे १०८ सूर्यनमस्कार करून रथसप्तमी साजरी केली.

तसेच सुनीता गुंजाळ यांचा सातत्यपूर्ण योगा करत अनेकींना प्रेरणा देत असल्याबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी शहरातील महिलांनी या मोफत योगाचा लाभ घेतला.

## मलकापूर येथे रेशीम उद्योग महाअभियान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.४ फेब्रुवारी -**



कळंब तालुक्यातील मलकापूर येथे रेशीमउद्योग नोंदणी व मार्गदर्शन कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रेशीम विकास अधिकारी वाकुरे मॅडम यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. रेशीम महाअभियान २०२५ अंतर्गत मलकापूर येथे रेशीम नोंदणी व रेशीम लागवडी विषयीचे मार्गदर्शन ग्रामपंचायत कार्यालय येथे दि.४ रोजी शेतकरी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पार

सदरील कार्यक्रमात रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१ ए.व्ही. वाकुरे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना रेशीम उद्योग बाबत माहिती दिली व मार्गदर्शन केले. एक एकर क्षेत्रामध्ये रेशीम लागवड केल्यास ४ लाखा १८ हजारापर्यंत अनुदान असुन त्यासाठी लागणारी कागदपत्रे कोणती, नोंदणी कुठे करायची याबाबतची पूर्ण माहिती शेतकऱ्यांना दिली गेली. त्यांनतर जुने लाभार्थी शेतकरी सुनिल लोमटे, तानाजी लोमटे, कोळी, सय्यद, यांनी रेशीम उद्योग करताना येणाऱ्या अडचणी अधिकाऱ्यांच्या समोर मांडून त्यांचे निरसन करून घेतले. रेशीम विक्रीसाठी परराज्यात जाण्याऐवजी धाराशिव जिल्ह्याच्या जवळ असलेल्या बीड व जालना येथील शासकिय रेशीम बाजारपेठे बाबत माहिती दिली. नवीन रेशीम उद्योग लाभार्थी प्रताप लोमटे, लाभार्थी सुनिल लोमटे यांच्या तुती लागवडीची शेतात जाऊन पाहणी केली..

या कार्यक्रमास वरिष्ठ सहाय्यक सुरेंद्र सुर्यवंशी, तांत्रिक सहाय्यक संदिप पवार, शेतकरी सुंदर लोमटे, तानाजी लोमटे, हनुमंत पवार, सुधीर पायाळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## उमरग्यात खुली मॅरेथॉन स्पर्धा; जिल्हाभरातून २०० मुला-मुलींचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.४ फेब्रुवारी -**

उमरगा शहरात खुली मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाली. सकाळी सहा वाजता शहरात आयोजित केलेल्या या भव्य मॅरेथॉन स्पर्धेत राज्यातील विविध जिल्ह्यातुन २०० मुला, मुलींनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी गणेश पवार, आ. प्रविण स्वामी, मा.आ. ज्ञानराज चौगुले व सतीश साळुंके, सचिव जुगल खंडेलवाल, अनिल मदनसुरे, जिजाऊ ब्रिगेडच्या सुनंदा माने व दिपाली स्वामी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. या



स्पर्धेत २०० मुला, मुलींनी दहा किलोमीटर अंतर पूर्ण करुन स्वतःचा आत्मविश्वास दाखवला. हि स्पर्धा खुला पुरुष, महीला व ४५ वर्षावरील पुरुष या गटात घेण्यात आली. सदर स्पर्धेत पुरुष खुला गटात वक्रसेन जाधव (प्रथम) सात हजार एकशे, विराज जाधवर (द्वितीय) पाच हजार एकशे तर नामदेव भोसले यांनी तृतीय तीन हजार एकशे रूपये व स्मृतीचिन्ह मिळवले. खुला गट महीलां मधुन प्रिती माने (प्रथम) तीन हजार एकशे, दुर्गाशक्ती पवार (द्वितीय) दोन हजार एकशे तर राधा मम्मीने (तृतीय) अकराशे रुपये व स्मृतीचिन्ह पटकाविले. ४५ वर्षावरील खुल्या गटातुन गोविंद चौधरी (प्रथम) तीन हजार एकशे, विद्यासागर फुलसुंदर (द्वितीय) दोन हजार एकशे तर शिवाजी पांचाळ (तृतीय) अकराशे व स्मृतीचिन्हाचे मानकरी ठरले. या स्पर्धेतील प्रत्येक सहभागी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पदक देण्यात आले.

विजेत्या मुला, मुलींना माजी आमदार ज्ञानराज चौगुले, सतीश साळुंके, रणधीर पवार, जुगलकिशोर खंडेलवाल यांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली. स्पर्धेतील बक्षिसे माजी आ. ज्ञानराज चौगुले, अनिल सगर, डॉ. विजय बेडदुर्गे, मनेष माणिकवार, प्राचार्य संजय अस्वले, प्रा. धनंजय मेनकुदळे, ॲड. अक्षय तोतला यांच्या वतीने देण्यात आली.

## 'तेरणा'च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**


तेरणा महाविद्यालय धाराशिव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय youth For My Bharat व Youth For My Literacy विशेष युवक शिबीर मौजे जवळे (दुमाला) ता. जि. धाराशिव या ठिकाणी दि.२२ ते दि.२८ जानेवारी या कालावधीत प्राचार्य डॉ. अशोक घोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.


कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. डी.बी. मोरे हे होते. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व आणि उद्दिष्ट याविषयी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आपण राष्ट्राची उन्नती करू शकतो. त्यासाठी आपण स्वतःला विकसित करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे मत या प्रसंगी व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुशीलकुमार सरवदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


सूत्रसंचालन व अहवाल वाचन डॉ. तुळशीराम उकिरडे तर आभार डॉ. अनघा तोडकरी यांनी व्यक्त केले. याप्रसंगी मनीषा जांगीड मनोगत व्यक्त केले.

# पर्यटनस्थळांच्या कायापालट करण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पात नळदुर्गच्या किल्ल्याचा समावेश करणे गरजेचे











**तभा वृत्तसेवा / विलास येडगे**
**नळदुर्ग, दि.४ फेब्रुवारी -**

केंद्र सरकारने राज्य सरकारच्या भागीदारीतुन पर्यटनस्थळांचा कायापालट करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पमाध्ये राज्यातील भुईकोट किल्लूयात सर्वात मोठा असणाऱ्या नळदुर्गच्या किल्लूयाचा समावेश करुन या पुरातन व प्राचिन किल्लूयाचा कायापालट करण्यात आला तर नळदुर्ग शहर तसेच परीसराचा ना भुतो ना भविष्य असा विकास होऊन मोठ्या प्रमाणात याठिकाणी युवकांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

नुकत्याच सादर करण्यात आलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्य सरकारांच्या भागीदारीतुन पर्यटनस्थळांचा कायापालट करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविला जाणार असल्याचे म्हटले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातुन अध्यात्मिक आणि पुरातन वारसा प्रकल्पांचा विकास होऊन पर्यटण क्षेत्रात मोठ्या संख्येने रोजगार निर्माण होतील असा विश्वास केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी व्यक्त केला आहे.

पर्यटन वाढीच्या दृष्टीने केंद्र सरकारचा हा निर्णय अतिशय चांगला व पर्यटन क्षेत्राला चालना देणारा आहे. महाराष्ट्रात पर्यटनक्षेत्रात काम करण्यासाठी मोठा वाव आहे, गडकिल्ले हा त्यातील महत्वाचा टप्पा आहे. राज्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले असंख्य किल्ले आहेत.

यामध्ये भुईकोट, जलदुर्ग यासह अनेक किल्लूयांचा समावेश आहे. याच किल्लूयातील भुईकोट किल्लूयामध्ये संपुर्ण राज्यात सर्वात मोठा असणारा नळदुर्गच्या प्राचिन व ऐतिहासिक किल्लूयाचा समावेश आहे.

शेकडो वर्षांचा इतिहास असलेला नळदुर्गचा हा प्राचिन किल्ला आजही भक्कम स्थितीत उभा आहे. नळदुर्गचा हा किल्ला प्राचिन स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या किल्लूयाचे क्षेत्रफळ मोठे असुन तब्बल ३ किलोमीटर लांब किल्लूयाची तटबंदी पसरली आहे. या तटबंदीमध्ये एकुन ११४ बुरुज आहेत.

अतिशय भव्य असा हा किल्ला आहे. किल्लूयातील बारादारी, नऊ बुरुज, रंगमहाल, पाणीमहाल, प्रेक्षनीय व डोळे दीपवुन टाकणारा नर-मादी धबधबा, शिलक धबधबा, उपली बुरुज, परंडा बुरुज, गणपती महाल, श्री खंडोबा देवाचे उगमस्थान, मुस्लिम धार्मियांची मस्जिद ही सर्व प्रेक्षनीय स्थळे पर्यटकांना आकर्षित करणारे आहेत. मध्यंतरी हा किल्ला महाराष्ट्र वैभव राज्य संरक्षित स्मारक योजनेअंतर्गत सोलापुर येथील युनिटी मल्टीकॉन्स प्रा. लिमिटेड या कंपनीकडे देण्यात आला होता.

केंद्र सरकारच्या या महत्वाकांक्षी प्रकल्पात नळदुर्गच्या या प्राचिन व पुरातन वारसा लाभलेल्या किल्लूयाचा समावेश करुन या किल्लूयातील प्राचिन व प्रेक्षनीय स्थळांचा विकास करण्यात आला तर जगातील पर्यटक या किल्लूयात येऊ शकतात.

किल्लूयातील नऊ बुरुजासारखा बुरुज तुम्हाला कुठल्याही किल्लूयात पाहायला मिळणार नाही. बारादारी, रंगमहाल, पाणीमहाल, गणपती महाल, जामा मस्जिद, हत्ती दरवाजा, हुलमुख दरवाजा, हत्ती तलाव, मुन्सिफ कोर्ट यासह रणमंडळ हे किल्लूयातील प्रेक्षनीय स्थळे आहेत. आज किल्लूयात पर्यटक येतात. मात्र त्यामानाने किल्लूयात येणाऱ्या पर्यटकांची संख्या ही कमीच आहे.

शहरात ऐतिहासिक वारसा लाभलेला किल्ला असतांना नळदुर्गकरांना मात्र याचा फायदा करुन घेता आला नाही ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे.

राज्याचे पर्यटन मंत्री शंभुराजे देसाई यांनी या किल्लूयाचा इतिहास पाहुन तसेच राज्यातील भुईकोट किल्लूयातील सर्वात मोठा असणाऱ्या नळदुर्गच्या किल्लूयाचा पर्यटनस्थळांचा कायापालट करण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पात समावेश करुन या पुरातन वारसा लाभलेल्या किल्लूयाचा कायापालट व्हावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## परंडा येथे शनिवारी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत शिक्षित बेरोजगार आणि नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा ८ फ ब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता शिक्षणमहर्षी गुरुवर्य आर.जी. शिंदे महाविद्यालय, परंडा येथे आयोजित करण्यात आला आहे.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर धाराशिव आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, परंडा यांच्या संयुक्त विद्यमाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या म ळाव्याचा मुख्य उद्देश शिक्षित बेरोजगार आणि नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा आहे. या रोजगार मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बार्शी आणि परंडा येथील १२ खासगी आस्थापना सहभागी होणार असून २१२ रिक्त पदांसाठी उमेदवारांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे नोकरीच्या शोधात असलेल्या तरुण-तरुणींनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रोजगार मेळाव्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी उपस्थित राहावे व अधिक माहितीसाठी (०२४७२) २९९४३४ येथे संपर्क साधावा, असे उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सहायक आयुक्त संजय गुरव यांनी कळविले आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### कर्ज परतावा योजना : थकबाकीदारांनी ३१ मार्चपर्यंत लाभ घेण्याचे आवाहन

**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या विविध कर्ज योजनांअंतर्गत कर्ज घेतलेल्या आणि थकीत असलेल्या कर्जदारांसाठी महामंडळाने विशेष सवलत योजना जाहीर केली आहे. या योजनेनुसार,संपूर्ण थकित कर्जाची एकरकमी परतफेड केल्यास थकीत व्याजाच्या रकमेवर ५० टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना ३१ मार्चपर्यंत लागू असणार आहे. जिल्ह्यातील महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन कर्जमुक्त होण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ओबीसी महामंडळ, जिल्हा कार्यालय, सामाजिक न्याय भवन (०२४७२) २२३८६३ या दूरध्वनी क्रमांकावर करावा.

### शासकीय आयुर्वेद महाविद्यालयाचे ११ फेब्रुवारीपासून नवीन संकेतस्थळ सुरू

**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय, धाराशिवच्या संकेतस्थळात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. पूर्वीचे gacosbd.edu.in हे संकेतस्थळ आता नवीन स्वरूपात gacdharashiv.edu.in या नावाने ११ फेब्रुवारी २०२५ पासून कार्यान्वित करण्यात आहे आहे. नवीन संकेतस्थळ अधिक अद्ययावत आणि माहितीसह समृद्ध असून, यामध्ये विद्यार्थ्यांसाठी व नागरिकांसाठी उपयुक्त माहिती समाविष्ट करण्यात आल्याची माहिती महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.एन.एस. गंगासागरे यांनी दिली. विद्यार्थी, शिक्षक व संबंधितांनी नवीन संकेतस्थळाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालय प्रशासनाने केले आहे.

### हेंगणे यांचा सत्कार

**औसा, दि.४ फेब्रुवारी -**

सेवानिवृत्तीनंतर शैक्षणिक बांधिलकी जपत सामाजिक कार्य करणारे सेवानिवृत्त शिक्षक सुनील शिवानंद हेंगणे यांचा औसा तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मल्हारी कांबळे, शिरीष पवार, विनय आयतनबोने उपस्थित होते.

# शासनाकडून शेतकऱ्यांना न कळवता रस्त्यांचा सर्वे

## शेतकऱ्यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन...

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील देवणी ते लासोना, ते मांजरा नदी पात्रापर्यंत सीमावर्ती भागाला जोडणाऱ्या रस्त्यांचा लासोना गावातील शेतकऱ्यांना कसलीच कल्पना न देता रस्त्यांचा सर्वे करून दोन्ही बाजूंना खुट्या रवण्यात आल्याने लासोना गावातील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी लातूर यांना भेटुन संबंधित शासनाकडून झालेल्या रस्त्यांच्या सर्वे बद्दल निवेदन देऊन कळवण्यात आले.

लासोना ते नदी पात्रापर्यंत बागायती, काळ्या सुपीक जमिनी आहेत. हा रस्ता सद्या सोळा फुटाचा चालू आहे.

त्यात शासनाकडून शेतकऱ्यांना कसलीच कल्पना न देता शेतकऱ्यांची संमती न घेता आमच्या परस्पर रस्त्यांचा सर्वे करून मार्किंग करून रस्त्यांच्या दोन्ही बाजूला खुट्या रवण्यात आले.

आमची उपजिवीका या सुपीक काळ्या मातीवर आहे. असे असताना शासनाकडून सर्वे केल्याने शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.




शासनाच्या कोणत्या विभागामार्फत अंदाजे साठ ते ऐंशी फुटांचा रस्ता होत आहे. याची माहिती शेतकऱ्यांना नसल्याने जोपर्यंत शासनाने शेतकऱ्यांच्या जागेवर येऊन कळवत नाहीत तोपर्यंत शेतकऱ्यांचा विरोध रहाणार आहे.

शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने आणि उपजिवीका शेतीवर असल्याने हा रस्ता होऊ देणार नसल्यांचे निवेदन जिल्हाधिकारी लातूर, उपविभागीय अधिकारी निलंगा, तहसीलदार देवणी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाना कळवण्यात आले आहे.

या निवेदनावर माजी चेअरमन मुरहारी माने, छबुबाई माने, म ाधव मंटोळे, हारुबाई माने, बबीता इंचुरे, माधव इंचुरे, पंडितराव माने, श्रीकांत माने, प्रेमलाबाई धामनगावे, शाम इंचुरे, संजीव माने, राजकुमार माने, बाबु माने, शुभम मठपती, डिंगबर माने, दिलीप धामनगावे, विठ्ठल शेरे, दतु माने, कोमल माने, अमर माने, विरभद्र मठपती, महेश स्वामी, नागनाथ सगर, संतोष सगर, नागनाथ स्वामी सह अदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# विद्यार्थ्यांचा राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याशी संवाद

## शैक्षणिक सहली दरम्यान राजभवनात भेट...

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ फेब्रुवारी -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाची शैक्षणिक अभ्यास सहल दि.१ ते ८ फेब्रुवारी या कालावधीत अजमेर, पुष्कर, जयपूर व मुंबई येथे संपन्न होत असून विद्यार्थ्यांनी सहली दरम्यान दि.४ रोजी राजस्थानचे महामहीम राज्यपाल हरिभाऊ जी बागडे यांची जयपूर येथील राजभवनात भेट घेत त्यांच्याशी संवाद साधला.

यावेळी महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज, मिर्झा राजे जयसिंह व पुरंदरचा तह याबाबत माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांची व औराद शहाजानी विषयी आस्थेवाईक विचारपूस केली. यावेळी सहलप्रमुख डॉ. सचिन हंचाटे यांनी महाविद्यालयाची शैक्षणिक ओळख करुन दिली. याप्रसंगी महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांना महाविद्यालयाच्या वतीने मास्टर दीनानाथ मंगेशकर यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी राजभवनाच्या वतीने सहल सहभागी सर्वांना अल्पोपाहार देण्यात आला.



> महामहीम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची भेट व संवाद, राजभवनाची पाहणी व तेथील अल्पोपाहार इत्यादी आमच्या जीवनातील अविस्मरणीय आठवण व सुवर्णक्षण असून याबाबत आम्ही आनंदी व समाधानी असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली.

याप्रसंगी महामहीम राज्यपाल हरिभाऊ जी बागडे यांचे प्रधान ओ.एस.डी. राजकुमार सागर, डॉ. आनंद मुसळे, डॉ. रितेश व्यास, डॉ. सुचिता किडीले, डॉ.शीतल गुंजटे, डॉ. भगवान कदम, व्यंकट शिवणे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# उदयगिरीत लोकप्रशासन विषयाची विद्यापीठस्तरीय कार्यशाळा



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४ फेब्रुवारी -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात लोकप्रशासन विभागाच्या वतीने स्वामी राम ानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण - २०२० नुसार बी.ए. द्वितीय वर्ष लोकप्रशासन विषयाच्या नवीन अभ्यासक्रमावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रस्तुत नवीन अभ्यासक्रमावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे लोकप्रशासन अभ्यास मंडळ व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक यांच्यात विचारमंथन होणार आहे.

स्वामी रामानंद तीर्थ म राठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी म हाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ८ फेब्रुवारी रोजी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील कार्यशाळेत लातूर, नांदेड, परभणी व हिंगोली या चार जिल्ह्यातील लोकप्रशासन विषयाचे सर्व प्राध्यापक व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, सदस्य सहभागी होणार आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन बसवराज पाटील नागराळकर यांच्या शुभहस्ते होणार असून कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन मानकरी हे असणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुशीलादेवी महाविद्यालय, लातूर येथील प्राचार्य डॉ. अजय पाटील, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. संतराम म ुंडे, लोकप्रशासन अभ्यास मंडळ अध्यक्ष डॉ.एम.आय. शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सचिव रामचंद्र तिरुके तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. पंचशील एकंबेकर हे असणार आहेत.

सदरील कार्यशाळेसाठी लोकप्रशासन विषयाचे प्राध्यापक, संशोधक व अभ्यासकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, कार्यशाळा समन्वयक डॉ. गौरव जेवळीकर, सह-समन्वयक प्रा. संजय बिबीनवरे यांनी केले आहे.

# दापका येथे महाराष्ट्र फार्मसी महाविद्यालयाच्या रा.से.यो. शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.४ फेब्रुवारी -**



महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसीच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने तालुक्यातील दापका येथे दि.१ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिट्रिसी हा उद्देश ठेवून शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील-निलंगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे उदघाटन महाराष्ट्र फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर पाटील, अल्पसंख्यांक विभागाचे तालुकाध्यक्ष लालासाहेब पटेल, सरपंच दापका आफरीन ताजुद्दीन पटेल, उपसरपंच यशोदा भोपी, डॉ. सुनिल साळुंके, साळुंखे, डॉ. सूर्यकांत सुडे, प्रतिष्ठित व्यापारी अकुंश भोपी, दापका ग्रामविकास अधिकारी एच. टी. ढोले, जि.प. प्रशालेचे मुख्याध्यापक किरण वामनराव धुमाळ, प्रा. राजश्री मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. माजी मुख्यमंत्री कर्मयोगी डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सुनील गरड राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांनी केली. राष्ट्रीय सेवा योजनेचा इतिहास व त्याचे देशासाठी योगदान याबद्दल सखोल असे मार्गदर्शन प्रा.डॉ. सुभाष बेंजलवार महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा यांनी दिले. डॉ. सूर्यकांत सुडे यांनी आजच्या धगधगत्या युगात वाढत्या डायबिटीस व उच्च रक्तदाब याच्याबद्दल विस्तृत असे मार्गदर्शन केले. सदरील शिबिराच्या या सात दिवसात राष्ट्रीय स्वयंसेवक ग्रामस्था करिता कार्यक्रम जसे की योगासन (सुदर्शन क्रिया), औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिर जनावरांची आरोग्य तपासणी, मंदिर परिसर स्वच्छता अभियान, प्रबोधनपर व्याख्याने, पथनाट्य, ई. सादर करणार आहेत अशी माहिती प्राध्यापक परवेज शेख यांनी दिली.

याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक वृंद स्वयंसेवक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# धाराशिव जिल्ह्यात लिंग गुणोत्तर वाढीसाठी पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

जिल्हा बेटी बचाओ, बेटी पढाओ आणि नीती आयोगाच्या कार्यक्रमातर्गत येतो. नीती आयोगाच्या निर्देशांकांपैकी लिंग गुणोत्तर हा महत्त्वाचा घटक आहे. जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर कमी झाल्यास समाजात मुला-मुलींच्या प्रमाणात असमतोल निर्माण होऊ शकतो. त्यामुळे जिल्ह्यात आरोग्य विभागामार्फत पीसीपीएनडीटी (पूर्वलिंग निदान प्रतिबंध) व एमटीपी कायद्यांची काटेकोर अंम लबजावणी केली जात आहे.

सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांची नियमित तपासणी जिल्ह्यात लिंग गुणोत्तर सुधारण्यासाठी प्रशासनाकडून पीसीपीएनडीटी कायद्यांतर्गत सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रांची त्रैमासिक तपासणी तसेच क्रॉस तपासणी केली जाते. अवैध गर्भलिंग निदान रोखण्यासाठी डिकॉय केस (गुप्त तपासणी) तंत्राचा वापर केला जात आहे. आतापर्यंत ५ डिकॉय केसेस करण्यात आल्या आहेत. अवैध गर्भलिंग निदान किंवा गर्भपाताबाबत तक्रार करा, बक्षीस मिळवा-कोणीही अवैधरित्या गर्भलिंग निदान किंवा गर्भपात करत असल्याची माहिती खालील माध्यमांतून देऊ शकतो : टोल-फ्री क्रमांक १८००२३३४४७५/१०४ माहिती देता येते. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, तसेच पुराव्यांच्या आधारे गुन्हा दाखल झाल्यास राज्य सरकारतर्फे १ लाख रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

## लोखंडे अनिशा यांची धाराशिव पोलीस चालकपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.४ फेब्रुवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रूईभर येथील कला शाखेची अनिशा लोखंडे या विद्यार्थिनीची धाराशिव पोलीस चालक पदी निवड झाली. पोलीस चालक पदासाठी झालेल्या परीक्षेत अनिशा लोखंडे यांनी यश संपादन केले.

जिद्द, चिकाटी व कठोर परिश्रमातून धुत्ता ग्रामीण भागातील लोखंडे यांनी आपले यश संपादन केले.

लोखंडे यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सुभाष कोळगे यांच्या हस्ते शॉल, बुके देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी रामदास कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य संतोष कपाळे, जयप्रकाश विद्यालयाचे मुख्याध्यापक जयप्रकाश कोळगे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# सतरा दिवसाच्या विश्रांतीनंतर कोरंगळा बस सेवा सुरु

- ▶▶ आ. रमेश कराड यांच्या प्रयत्नाला यश
- ▶▶ गावकऱ्यांनी केले स्वागत आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार
- ▶▶ विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची कोंडी सुटली
- ▶▶ गुंता सोडविण्यासाठी आगार प्रमुखांनी घेतला पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.४ फेब्रुवारी -**

कोरंगळा गावातील प्रवाशांकडून वाहकाला झालेल्या मारहाणीनंतर बंद झालेली बससेवा सुरु करण्यासाठी भाजपाचे लातूर ग्रामीणचे आ. रमेश कराड यांनी विभाग नियंत्रक अश्वजीत जानराव यांच्याशी चुक कोणाची आणि शिक्षा गावकऱ्यांना का? अशी विचारणा करीत बस सुरु करण्याच्या सुचना दिल्या. आगारप्रमुख शंकर स्वामी यांनी गावात जाऊन गावकऱ्यांशी चर्चा करीत सतरा दिवसाच्या विश्रांतीनंतर बससेवा सुरु केली. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची कोंडी सुटली आहे.

औसा-बिरवली या औसा आगाराच्या वाहकांशी कोरंगळा येथील प्रवाशाची बाचाबाची झाली. यानंतर प्रवाशाने गावात आल्यानंतर केलेल्या मारहाणीत वाहक गंभीर जखमी झाले. याप्रकरणी भादा पोलिसात दाखल झालेल्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करुन दोघांना अटक करुन पुढील कार्यवाही करण्यात आली. प्रकरण एवढ्यावरच थांबले नाही. या गावची बस सेवा बंद करण्यात आली. याचा फटका दीड किलोम ीटर अंतरावरील समदर्गा गावाला बसला. या गावचीही सेवा बंद झाली. यामुळे या दोन गावातील विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले होते. तर विद्यार्थी आणि पालकांना शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती वाटत होती. गावाबरोबर या दोन गावच्या प्रवाशांच्या प्रवासाचे बेहाल सुरु होते. विद्यार्थ्यांचे नुकसान आणि प्रवाशांचे हाल पाहून गावकर्त्यांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना विनंती केली. परंतू बससेवा सुरु झाली नाही. गावकर्त्यांनी शेवटी आ. रमेश कराड यांना साकडे घालून घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्यांनी विभाग नियंत्रक अश्वजीत जानराव यांच्याशी या प्रकरणी चर्चा करुन चुक कोणाची ? आणि शिक्षा गावकऱ्यांना का? अशी विचारणा केली. बससेवा बंद झाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान व प्रवाशांना होणारा त्रास बंद व्हावा. यासाठी तात्काळ बससेवा सुरु करण्याच्या सुचना दिल्या. आगार प्रमुख शंकर स्वामी यांनी कोरंगळा गावात जावून गावकऱ्यांशी चर्चा केली. यानंतर बस सुरु केली. गावकऱ्यांनी विश्रांतीनंतर आलेल्या बसचे जंगी स्वागत केले. व आगारप्रमुख स्वामी, वाहक, चालक यांचा सत्कार केला.

यावेळी सरपंच उध्दव काळे, गोविंद ढोक, जगन्नाथ ढोक, सुग्रीव पाटील, संजय ढोक, दिगंबर माळी, हाणमंत तिडके, बालाजी तिडके, खंडू काळे, दत्तू सुरवसे, राजेंद्र कसबे, केरबा तिडके, आण्णाराव पाटील, हरिश्चंद्र तिडके आदी उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाचले...

या वादामुळे बससेवा बंद झाल्याने शिक्षणासाठी औसा, आलम ला, लातूर येथे दररोज ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष धोक्यात आले होते. यामुळे कोरंगळा व समदर्गा या दोन गावातील शंभराहून अधिक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य संपल्याचे चर्चिले जात होते. परंतू पंधरवाड्यानंतर का होईना तोडगा निघ्न बस सुरु झाली. यामुळे शैक्षणिक वर्ष वाचले असल्याची चर्चा होत आहे.

### पुन्हा घटना घडू देऊ नका : आगारप्रमुख स्वामी

कोरंगळा आणि समदर्गा या दोन गावात जाऊन गावकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी गावकऱ्यांनी स्वागत करुन कर्मचाऱ्यांसह सत्कार केला. परंतू अशा घडल्यानंतर तांत्रीक अडचणीत वाढ होते. यासाठी दुसऱ्यांदा घटना घडू देऊ नका असे आवाहन औशाचे आगारप्रमुख शंकर स्वामी यांनी उपस्थितांना केले.

# लातूर जिल्हा युवा पुरस्कार कुणाल बागबंदे यांना प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.४ फेब्रुवारी -**



क्रीडा व युवक सेवा संचालयना महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अधक्षयेतेखाली जिल्हा युवा पुरस्कार निवड समिती गठित असते जिल्हयाच्या युवा विकास काम मधे मोलाची काम गिरी करून जिल्हाचा मान वृधीगांत केल्याने उदगीर येथील युवा उद्योजक, युवा नेते कुणाल बागबंदे यांच्या कार्याची दखल घेत. महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत सन २०२४-२०२५ या वर्षीचा जिल्हा युवा पुरस्कार पालकमंत्री श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्या हस्ते जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, मुख्यकार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे यांच्या उपस्थित प्रदान करण्यात आला. त्यांच्या या निवडीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दर वर्षी महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्यामार्फत खेळाडू व खेळास प्रोत्साहन देणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देत येतो. यंदाचा जिल्हा युवा पुरस्कार कुणाल बागबंदे यांना जाहीर झाला आहे. ते गेल्या अनेक वर्षापासून मुलांमध्ये विविध कलागुण वाढीस लागावेत यासाठी प्रयत्नशील आहे. क्रीकेट, खो-खो, यासारख्या खेळाच्या स्पर्धा व विविध शिबीरे, राबवून मुला-मुलींमध्ये खेळाडूवृत्ती वाढवून, जास्त- जास्त खेळाडू कसे तयार होतील. यासाठी ते सतत प्रयत्न करीत असतात. युवा उद्योजक, खेळाडू व वृक्षप्रेमी म्हणून सर्वांना ते परिचित आहेत. कोविड काळात त्यांनी अनेक गरजू लोकांना किट वाटप केले, कोविड प्रतिबंधात्मक लस उपलब्ध करुन देणे, लहान बालकाना रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यासाठी सुवर्णप्राशन शिबिरे, रुग्णांना चांगली सुविधा मिळावी यासाठी डॉक्टांच्या भेटी घेवून रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची मदत केली. कोविड काळात आपला जिव मुठीत घेवून काम करणाऱ्या सर्व कोरोना योध्दांचा सन्मान केले. प्रतिवर्षी महापुरुषांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम राबवने ईद निमिताने उपक्रम घेणे सर्वधर्मीय सामाजिक सलोखा राखण्याचा ते प्रयत्न करीत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर देण्यात आला आहे.

हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## 'आद्यकवी मुकुंदराज मराठी साहित्य संमेलना'चे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) आणि महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या 'राजर्षी शाहू महाराज साहित्य नगरी'त राज्यस्तरीय पहिले 'आद्यकवी मुकुंदराज मराठी साहित्य संमेलना'चे आयोजन करण्यात आले आहे.

संमेलनाध्यक्ष म्हणून मराठीतील ज्येष्ठ व श्रेष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांची उपस्थिती असणार आहे. तर शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, माजी खा. गोपाळराव पाटील स्वागताध्यक्ष आहेत. संस्थेचे उपाध्यक्ष पी. आर. देशमुख, सचिव प्राचार्य अनिरुद्ध जाधव, गोपाळ शिंदे, ॲड. सुनील सोनवणे, मधुकर गायकवाड, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. श्रीधर नांदेडकर, डॉ. मार्तंड कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

संमेलनात ग्रंथदिंडी, निमंत्रितांचे कविसंमेलन, युवा मंचचे काव्यसंमेलन, कथाकथन, परिसंवाद, ग्रंथप्रदर्शन अशा भरगच्च कार्यक्रमाची साहित्य मेजवानी रसिक श्रोत्यांना मिळणार आहे. ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. शेषराव मोहिते, समीक्षक डॉ. पृथ्वीराज तौर नांदेड, प्रा. भास्कर बडे, श्री. विलास सिंदगीकर, डॉ. महेश खरात छत्रपती संभाजीनगर, उमरगा., डॉ. वैशाली गोस्वामी, नांदेड., डॉ. जयद्रथ जाधव यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. निमंत्रितांच्या कवी संमेलनात निवडक १७ कवींच्या बहरदार कवितांचे सादरीकरण होणार आहे. 'अभिजात मराठी भाषे'वर एक महत्त्वाचा परिसंवाद या संमेलनात समाविष्ट करण्यात आला आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## वधु - वर सुचक मंडळांनी नोंदणी करावी मनपाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन आणि विवाह नोंदणी अधिनियम १९९८ व नियम १९९९ अन्वये विवाह मंडळ चालवू इच्छिणारी किंवा चालविणारी कोणतीही व्यक्ति किंवा व्यक्तिचा गट यांनी स्थानिक कार्यक्षेत्रातील विवाह मंडळ व विवाह नोंदणी निबंधक यांचे कडे नोंदणी करणे अनिवार्य आहे व कायद्याने बंधनकारक आहे. तसेच नोंदणी न करणा-या विवाह मंडळ (वधु - वर सुचक मंडळ) यांच्या विरुध्द उचित व दंडात्मक कायदेशीर कार्यवाहीची कायद्यात तरतूद आहे.

विवाहासाठी इच्छुक असणा-या अविवाहीत व्यक्ति, घटस्फोटीत व्यक्ति, विधवा आणि विधुर यांना सुयोग्य जोडीदार मिळवून देण्यासाठी अशा व्यक्तीना एकत्र आणणे विवाह जुळविणे इत्या्दी प्रकारची मदत करण्याचे कार्य करणारी अर्थात विवाह मंडळ चालवू इच्छणारी किंवा चालविणारी लातूर शहरातील वधु- वर सुचक मंडळे अथवा व्याक्ति / व्यवस्थापक किंवा व्यक्तीचा गट यांनी विवाह मंडळ व विवाह नोंदणी निबंधक, लातूर शहर महानगरपालिका, लातूर यांचे कडे विहीत नमून्यात अर्ज करुन नोंदणी करण्याचे आवाहन पालिकेने केले आहे.

## केशवराज विद्यालयात गुणगौरव कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** श्री.केशवराज माध्यमिक विद्यालयात स्नेहसंमेलना निमित्त सर्व मंडळाच्या विविध स्पर्धा दिनांक २१ ते २५जानेवारी २०२५ या कालावधीत घेण्यात आल्या. या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण समारंभ पालकांसमवेत मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार असून हा कार्यक्रम दोन सत्रात घेतला जाणार आहे.

सकाळ सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौदागर तांदळे तहसीलदार, अध्यक्ष विष्णू सोनवणे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य भा. शि. प्र. संस्था, अंबाजोगाई आणि दुपार सत्रासाठी प्रमुख पाहुणे अविनाश देवशेटवार, प्रादेशिक उपायुक्त सामाजिक न्याय लातूर आयुक्त, लातूर. अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर तर प्रमुख उपस्थिती राम कुलकर्णी यांची उपस्थिती असणार आहे. या दोन्ही सत्रांना उपस्थित राहण्याचे आवाहन स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, स्थानिक समन्वय समिती कार्यवाह शैलेश कुलकर्णी, शालेय समिती अध्यक्ष गंगाधर खेडकर, मुख्याध्यापक महेश कस्तुरे यांनी केले आहे.

## युवा पुरस्कारासाठी १५ फेब्रुवारीची मुदत : अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका असून मोठ्या संख्येने युवावर्ग, संस्था राज्यात सामाजिक कार्य करीत आहेत. युवामध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव देणे, त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणे, त्यांचा गुणगौरव करणे आवश्यक आहे. राज्याचे युवाधोरण अंतर्गत युवांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य युवा पुरस्कार देण्यात येतो.

या पुरस्कारासाठी १५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सन २०२३-२४ या वर्षात राज्यस्तरावर राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रिय विभागस्तरानुसार प्रत्येक विभागातील एक युवक, एक युवती व एक नोंदणीकृत संस्थेला देण्यात येणार आहेत. या पुरस्काराचे स्वरुप युवक-युवती यांना रोख रुपये ५० हजार, संस्थेस रुपये १ लाख तसेच गौरवपत्र, सन्मानचिन्ह असे राहणार आहे.

## सरचिटणीसपदी मासूम खान यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** मासूमखान यांच्या माध्यम संभाषण कला, कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन याची दखल घेऊन, महाराष्ट्र प्रदेश अनिवासी भारतीय सेलच्या अध्यक्षा विद्या कदम यांनी त्यांची निवड केली.

या निवडीबद्दल त्यांचे अजय कल्याने, बाबा शेख, नितीन कांबळे, मारुती चव्हाण, राजाभाऊ गवळी, ॲड.देविदास बोरूले पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# 'कॉपीमुक्त' परीक्षेसाठी प्रशासन सज्ज: जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** जिल्ह्यातील १०० परीक्षा केंद्रांवर ११ फेब्रुवारी २०२५ पासून इयत्ता बारावीच्या परीक्षा सुरु होणार आहे. तसेच इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी २०२५ पासून १५२ परीक्षा केंद्रांवर सुरु होणार आहे. या दोन्ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात जिल्हा दक्षता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्राथमिक शिक्षणाधिकारी वदंना फुटाणे, योजना शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, माध्यमिक शिक्षणाधिकारी तथा समितीचे सदस्य सचिव नागेश मापारी यांची यावेळी उपस्थिती होती.

इयत्ता दहावी व इयत्ता बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने प्रभावीपणे उपाययोजना करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी दिल्या. सर्व परीक्षा केंद्र संचालकांनी निर्भयपणे व योग्य पर्यवेक्षकांची नियुक्ती करून परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात होतील, याची दक्षता घ्यावी. कोणतीही अडचण असेल, तर तातडीने प्रशासनास कळवावे. प्रत्येक परीक्षा केंद्रावरील सीसीटीव्ही कॅमेरे परीक्षा कालावधीत सुरु राहतील, याची खातरजमा करावी. तसेच परीक्षा कालावधीत जे केंद्र संचालक उत्कृष्ट परीक्षा संचालन करतील, अशा तीन केंद्र चालकांचा केला जाईल. एखाद्या केंद्रावर कॉपी आढळून आल्यास नियमानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

प्रारंभी माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांनी इयत्ता दहावी व बारावी परीक्षेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पूर्वतयारीची माहिती दिली. सूत्रसंचलन उपशिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर यांनी केले, उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार यांनी आभार मानले.

# समरस समाज, जागृत नागरिक घडवेल भारताला विश्वगुरू

### शहरात विराट शाखा दर्शन कार्यक्रम संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेबुवारी -** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित 'विराट शाखा दर्शन' या ऐतिहासिक कार्यक्रमाचे राजस्थान विद्यालयाच्या मैदानावर आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रय होसबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

शहरातील ६१ वस्त्यांतील ६३ शाखा एकाच वेळी एकाच मैदानावर उभ्या पहायला मिळाल्या. यात



विद्यार्थी, तरुण, व्यावसायिकांच्या शाखांचा समावेश होता. संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण होत असताना, संघाच्या कार्याच्या विस्तारासाठी पंच परिवर्तन या योजनेला महत्त्व दिले जात आहे. गेल्या तीन महिन्यांपासून संघाचे कार्यकर्ते आणि स्वयंसेवक हे या कार्यक्रमाची तयारी करत होते.

यावेळी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना सरकार्यवाह होसबाळे म्हणाले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेमध्ये आल्यामुळे मन, शरीर, बुध्दी सदृढ होते, विकास होतो. परिपूर्ण नागरिकाची निर्मिती या एक तासाच्या शाखेतून होत असते. प्रत्येक वस्तीत बालशाखा, तरुण शाखा, प्रौढ शाखा झाल्या पाहिजेत. प्रत्येक क्षेत्रात सामाजिक जाणीव असलेल्या बांधवांना संघ शाखांत जोडणे आवश्यक आहे. शताब्दी वर्षात पंच परिवर्तन संकल्पनेवर विशेष भर दिला गेला असून या संकल्पनेत समरसता, नागरिक कर्तव्य, स्वदेशी, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण यासाठी काम करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून महादेव डमणे, देवगिरी प्रांतसंघचालक अनिल भालेराव, लातूर शहर संघचालक उमाकांत मद्रेवार उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाला जिल्हाभरातून मोठ्या संख्येने महिला व नागरिक उपस्थित होते.

# दशकपूर्ती निमित्त 'जानाई'मध्ये रक्तदान शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** आर्थिक वृद्धी आणि विश्वासार्ह सेवेची परंपरा असलेल्या जानाई परिवारातील अर्थवर्धिनी जानाई महिला सहकारी पतसंस्था आणि श्री गुरुजी नागरी सहकारी पतसंस्थेचा दशकपूर्ती समारंभ सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला्. यानिमित्त वैचारिक व आरोग्याचे वाणही लुटण्यात आले .

या प्रसंगी रक्तदान शिबिर आणि आरोग्य मनाचे या विषयावर व्याख्यान तसेच हळदीकुंकू, तिळगुळ समारंभाचे आयोजनही करण्यात आले होते.

सेवाभावी नि:स्वार्थ व कार्यक्षम संचालक मंडळ ,सुरक्षित गुंतवणुकीसाठी विश्वसनीय संस्था म्हणून सर्वत्र परिचित असलेल्या जानाई परिवाराच्या अर्थवर्धिनी जानाई महिला सहकारी पतसंस्था मर्यादित लातूर आणि श्री गुरुजी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित लातूर या संस्थेच्या दशकपूर्ती समारंभ निमित्त मित्र नगर गीताई संकुल मधील जानाई फंक्शन हॉलमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळच्या सत्रामध्ये रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते .या रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला् सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. श्रीनिवास संदीकर यांनी दीप प्रज्वलित करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले.

यावेळी अर्थवर्धिनी जानाई महिला सहकारी संस्थेच्या अध्यक्षा गीता ठोंबरे, उपाध्यक्षा, डॉ. माधवी निरगुडे, संचालिका रोहिणी मुंडे, श्री गुरुजी नागरी पतसंस्थेचे सचिव संजय प्र. अयाचित यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम संस्थेचे सर व्यवस्थापक संजय कुलकर्णी तसेच प्रशांत भोसगेकर नामदेव पाटील, पंकज तेरकर, दत्ता झुंजारे, शेखर कुलकर्णी ,संकेत कुलकर्णी यांनी रक्तदान केले . इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या भालचंद्र रक्तपेढीच्या कर्मचाऱ्यांनी हे रक्त संकलन केले.

डॉ.श्रीनिवास संदीकर यांनी यावेळी रक्तदानाचे महत्त्व विशद करीत जानाई परिवारातील अर्थवर्धिनी व श्री गुरुजी पतसंस्था अल्पावधीतच नावारूपाला आली असून सातत्यपूर्ण सेवा देऊन या संस्थेने लातूरकरांची विश्वासार्हता जोपासली आहे ,असे गौरवोद्गार काढले. यावेळी गीता ठोंबरे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका कुलकर्णी हिने केले.

दुसऱ्या सत्रामध्ये आरोग्य मनाचे या विषयावर महिलांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी लातूरातील सुप्रसिद्ध वैद्य डॉ.उमा देशपांडे यांनी महिलांनी आपले आरोग्य संतुलित राखण्यासाठी व मन प्रसन्न ठेवण्यासाठी काय करायला हवे याच्या काही टिप्स देखील यावेळी दिल्या.

कार्यक्रम यशस्वि करण्यासाठी अनेकांनी परिश्रम घेतले.

# महर्षी मार्कंडेय ऋषी जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** जिल्हा पद्मशाली समाज संघटनेच्या वतीने महर्षी मार्कंडेय ऋषी यांची जयंती शनिवारी उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त अभिषेक सोहळा नागनाथ रामदिनवार यांच्या हस्ते पार पडला. तसेच दुर्गादेवी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

जयंतीनिमित्ताने महर्षी मार्कंडेय ऋषी चरित्र यावर सुरेश रब्बेवार यांचे प्रवचन झाले. अध्यक्षस्थानी हभप नामदेव माडेवार महाराज होते. यावेळी समाज संघटनेचे नूतन जिल्हाध्यक्ष श्रीनिवास नक्का व नूतन महिला अध्यक्षा निर्मलाताई तम्मलवार, लातूर तालुकाध्यक्ष वेंकटराव सुंकरवार, राम गुडेवार, महिला तालुकाध्यक्ष ज्योतीताई अडबलवार यांचा सत्कार करण्यात आला. महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. दुपारी महाप्रसादाचे वितरण झाले.

कार्यक्रमास कीर्तीकुमार गोरखे, सच्चिदानंद फुलकंठवार, अक्षय राहुलवार, प्रवीण नक्का, गुंडाप्पा संगम, पंढरीनाथ नक्का, राजेश आंबटवार, बालाजी चिटकलवार, डॉ. बाबूराव नक्का, मारुती आंचेवार, ज्ञानेश्वर संगम, अक्षय नक्का, अर्जुन नक्का, दत्तराज सुंकरवार, गुरुदत्त भंडारे, सत्यनारायण येमेवार, नागनाथ भंडारे, गणेश भंडारवार, विश्वनाथ अंचेवाड, दिगंबर चेवटेवार, संस्कार नक्का, राम मादासवार, प्रल्हाद सिरमवाड, अजय चिल्केवार, गजानन चेवटेवार, दिगंबर जिंदमवार, दत्ता येलगंधवार, सिद्धेश्वर उडतेवार, अनिकेत पालाकुडतेवार, शिवाजी तमलवार आदिंची उपस्थिती होती.

# चांडेश्वर येथील रासेयो शिबिराचा समारोप




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** दयानंद शिक्षण संस्थेद्वारा संचलित, दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर या महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागा तर्फे मौजे.चांडेश्वर येथे दरम्यान युथ फॉर माय भारत अँड युथ फॉर डिजीटल लिटरसी हा मौलिक उद्देश समोर ठेवून सात दिवसाच्या निवासी शिबिराचे आयोजन आले होते.

चांडेश्वर येथे शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले तर २ फेब्रुवारी रोजी याच प्रसंगी महात्मा गांधिजीं च्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून रासेयो विभागाच्या निवासी शिबिराचा समारोप करण्यात आला.

समारोप समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून स्वा.रा.ती.म.वि. नांदेड च्या रा.से.यो. चे संचालक डॉ.मल्लिकार्जुन करजगी तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ.समीप सोनवणे तसेच रा.से.यो.विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे,प्रा.राठी वैष्णवी यांची उपस्थिती होती.

शिबिराच्या समारोप समारंभा प्रसंगी बोलताना डॉ.मल्लिकार्जुन करजगी म्हणाले की महाविद्यालयाने चांडेश्वर येथे रा.से.यो.च्या माध्यमातून राबवलेला हा उपक्रम अतिशय उत्तम व समाज उपयोगी तरुण पिढी आणि युवकांसाठी मार्गदर्शक ठरलेला आहे.असे उपक्रम भविष्यात महाविद्यालया मार्फत आणखी घेण्यात यावेत असा आवर्जून उल्लेख केला. आज सर्वच युवकांचा ध्यास युथ फॉर माय भारत अँड युथ फॉर डिजीटल लिटरसी या दृष्टिकोनातून असावा तरच देश प्रगती करत राहील. महाविद्यालयाने रासेयो विभागातर्फे आयोजित सात दिवसाच्या शिबिरात विविध समाजोपयोगी कार्यक्रम यशस्वीरीत्याआयोजित केले.यात बरेच उपक्रम राबविण्यात आले. अशी माहिती कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी रासेयो विभाग प्रमुख प्रा.राहुल वाघमारे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन विद्यार्थी राधा लाहडे तर आभारप्रदर्शन जयश्री खंदारे यांनी केले. हे निवासी शिबिर यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयातील रा. से. यो.विभागाच्या ५० विद्यार्थी, विद्यार्थिनींचा, प्राध्यापकांचा, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग होता.

# थकबाकीदारावर मनपाची धडक कारवाई

## दिवसभरात ९ नळ खंडित व १ मालमत्ता जप्त



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने वर्षाच्या सुरूवातीपासूनच मालमत्ता धारकासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची योजना लागू करण्यात आल्या होती . त्यानंतर दि. १० फेब्रुवारी २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा करणा-या करदात्यास लातूर शहर महानगरपालिकेमार्फत प्रोत्सानपर बक्षीस योजना राबवण्यात येत आहे.

या उपरही जे मालमत्ताधारक थकीत मालमत्ताकराचा व पाणी पट्टीकराचा भरणा करणार नाहीत अशा मालमत्ताधारकांवर महानगरपालिकेच्या वसूली पथकामार्फत मालमत्ता सील करणे, आटकाणी करणे तसेच नळ जोडणी खंडीत करणे या स्वरूपाची कार्यवाही हाती घेण्यात आली असून आज दि.०३ फेब्रुवारी २०२५ रोजी क्षेत्रीय कार्यालय अ,क,मध्ये कर वसूलीसाठी कार्यवाही करण्यात आली आहे.

क्षेत्र क्रं.अः-रू,२७३६०६/ थकीत कराच्या वसूलीसाठी दोन नळ जोडणी बंद करण्यात आली तसेच जप्तीची कार्यवाही करताच एका मालमत्ताधारकांने रू,६४०६८/चा धनादेश प्राप्त झाला . क्षेत्र क्रं.क -रू,४१४७५१/ थकीत कराच्या वसूलीसाठी सात नळ जोडणी बंद करण्यात आली. तरी जे मालमत्ताधारक मालमत्ता सील करूनही मुदतीमध्ये कराचा भरणा करणार नाहीत अशा मालमत्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार मालमत्तांचा लिलाव महानगरपालिकेमार्फत करून वसूली करण्यात येणार आहे. तरी थकबाकीदार मालमत्ता धारकानी कर भरणा करुन सहकार्य करावे व होणारी जप्ती, लिलाव सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## महामंडळाची ५० टक्के व्याज सवलत योजना

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाच्या संपूर्ण थकीत रक्कमेचा एकरक्कमी भरणाऱ्या लाभार्थ्यास थकीत व्याज रक्कमेत ५० टक्के सवलत (ओटीएस) देण्याबाबत सुधारित एकरक्कमी योजना ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू करण्यात आली आहे. त्यानुसार थकबाकीदार लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेवून कर्जमुक्त व्हावे, असे आवाहन इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाचे लातूर जिल्हा व्यवस्थापक एस.एन. झुंजारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डालडा फॅक्ट्री कंपाऊंड, शिवनेरी गेटसमोर, लातूर येथे किंवा ०२३८२-२५३३३४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन श्री. झुंजारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे.

# आ. रमेश कराड यांनी केला सोसायटीच्या चेअरमनचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.४ फेब्रुवारी -** रेणापूर तालुक्यातील सर्वात मोठ्या असलेल्या खरोळा सेवा सहकारी संस्थेच्या चेअरमनपदी नुकतीच सुधाकर काळे यांची निवड झाली असून या निवडीबद्दल भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले.

पंधरा कोटीची वार्षिक उलाढाल असलेल्या आणि शेतकऱ्याच्या हितासाठी कार्यरत असलेल्या रेणापूर तालुक्यातील खरोळा सेवा सहकारी संस्थाची निवडणूक होऊन चेअरमन पदासाठी अडीच वर्षाचा कार्यकाळ ठरल्याप्रमाणे संस्थेचे चेअरमन मोहनराव राऊतराव यांनी राजीनामा दिला. या रिक्त झालेल्या चेअरमन पदासाठी सुधाकर काळे यांची नुकतीच सर्वानुमते निवड करण्यात आली.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात नवनिर्वाचित चेअरमन सुधाकर काळे यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे संचालक प्रभाकर कुलकर्णी, निवृत्ती आदुडे, माजी चेअरमन मोहनराव राऊतराव, मुकुंद कलूरे यांचा सत्कार आ. कराड यांच्यावतीने भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष ओमप्रकाश गोडभरले यांनी सत्कार केला.

प्रारंभी आ. रमेशआप्पा कराड यांचा ओमप्रकाश गोडभरले आणि सुधाकर काळे यांनी सत्कार केला. यावेळी माजी सरपंच बालाजी मानमोडे, माजी सरपंच चंद्रकांत अदुडे, किशोर कुलकर्णी, बाळकिशन आदुडे, रमाकांत फुलारी, जेष्ठ कार्यकर्ते अनिल येलगटे, मुस्तफा तासेवाले, संजय पिंपळे, बंडु पांचाळ, नंदकुमार वलमपल्ले, मधुकर राऊतराव, अँड पांडुरंग आदुडे, शिधु पिंपळे, नागनाथ आडतराव आदिंची उपस्थिती होती.